# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. ०६/१०/२००३

आज दि. ०६/१०/२००३ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची दि. १८/०९/२००३ रोजीची तहकुब मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सुचना क्र. ०६ दि. १०/०९/२००३ रोजीच्या विषय पत्रिकेवरील पुढील विषयांवर विचार विनीमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मेंडोसा मायरा गिल्बर्ट | महापौर |
| २) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सभापती |
| ३) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ४) | श्री. परशुराम दामोदर पाटील | विरोधी पक्ष नेता |
| ५) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | गटनेता |
| ६) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| ७) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ८) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| ९) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १०) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| ११) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १२) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १३) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १४) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १५) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १६) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १७) | श्रीम. गोहिल शानू | सदस्या |
| १८) | श्री. मदन उदितनारायण सिंग | सदस्य |
| १९) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २०) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २१) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २२) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २३) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २४) | श्री. हंसूकुमार पांडे | सदस्य |
| २५) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २६) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २७) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २८) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २९) | श्रीम. सावळे निर्मला बाबुराव | सदस्या |
| ३०) | श्री. माळी रविंद्र भिमदेव | सदस्य |
| ३१) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३२) | श्रीम. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३३) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३४) | श्री. आत्माराम बाळाराम गावंड | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३५) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ३६) | श्री. म्हात्रे परशुराम पद्‌माकर | सदस्य |
| ३७) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३८) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ३९) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ४०) | श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत | सदस्या |
| ४१) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | गटनेता |
| ४२) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४३) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४४) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४५) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ४६) | श्री. मेंडोसा स्टीवन जॉन | सदस्य |
| ४७) | श्री. पाटील रोहीदास आत्माराम | सदस्य |
| ४८) | श्री. कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ४९) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ५०) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सदस्या |
| ५१) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ५२) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |
| ५३) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५४) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५५) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ५६) | श्रीम. शहा रिटा सुभाष | सदस्या |
| ५७) | श्री. महेंद्रसिंग चौहान | सदस्य |
| ५८) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५९) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६०) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६१) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६२) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | गटनेता |
| ६३) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्य |
| ६४) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ६५) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६६) | श्री. मिलन गोंविंदराव पाटील | सदस्य |
| ६७) | श्री. ठाकुर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ६८) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ६९) | श्री. संजय नारायण पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७०) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७१) | श्री. परेरा टेरी पॉल | नामनिर्देशित सदस्य |

## अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | सदस्या |
| २) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ३) | श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा | सदस्या |
| ४) | श्री. अशोक पांडुरंग पाटील | सदस्य |
| ५) | श्री. जेम्स इजिदोर कोलासो | सदस्य |
| ६) | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| ७) | श्री. नरेंद्र मेहता | सदस्य |
| ८) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ९) | श्रीम. कैलाशबेन दिनेशचंद्र जानी | सदस्या |

१०) श्रीम. रक्षा एस. शाह — सदस्या
११) श्री. रमेश धरमचंद जैन — सदस्य

## रजेचे अर्ज आलेले सदस्य

१) श्री. सय्यद मुझफ्फर हुसेन — उपमहापौर
२) श्री. आसिफ गुलाम पटेल — सदस्य

वरील प्रमाणे महासभेकरीता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यांस सांगितले. त्यानुसार वंदेमातरम् या राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त, विरोधी पक्षनेते व उपायुक्त तसेच उपस्थित सदस्य व मनपा अधिकारी, पत्रकार बंधु आपल्या सर्वांचे स्वागत.

(प्रभारी सचिवांनी प्रकरण क्र. ३९ चे वाचन केले)

**रिटा शहा :-**

सभेला सुरूवात करण्या अगोदर आज नवनिर्वाचीत सभापतींची ही पहिलीच सभा आहे त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मी पास करते आणि बसायचे कुठे? ते तरी आपण सांगा.

**मा. महापौर :-**

पहिल्या रांगेत सभापतींचे मी देखील स्वागत करते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण आता सभागृहामध्ये येताना खाली बघितलेच असेल आपल्या या सभागृहाचे काही नगरसेवक काही विषयाला घेऊन उपोषणाला बसलेले आहेत. आणि उपोषणाला बसताना त्यांनी अनेक वेळा प्रशासकीय अधिकाऱ्याचा संपर्क करून या रस्त्याच्या नामकरण बाबत अनेक पुरावे दिले. विषय असा आहे की, जेव्हा प्रशासन कुठली गोष्ट लपवत असेल आणि ती आज उघड झालेले आहे. प्रशासनाने स्वतः ते नामकरण ग्रामपंचायत काळामध्ये जैन मंदिर मार्ग झाल्याचे पत्र नगरसेवकांना दिलेले आहे. अशा वेळी किमान प्रशासकीय अधिकारी त्यावर काय भुमिका घेणार आहेत? शेवटी या शहराची शांतता सुव्यवस्था राखणे हा नगरपालिकेच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आणि सर्व सन्मा. सदस्याचे कर्तव्य आहे. आणि अशा उपोषणामुळे शहराची कायदा सुव्यवस्था कुठे गमवू नये. म्हणून आपल्याला विनंती आहे. आता प्रशासनाने जे पत्र दिलेले आहे. त्या पत्रामध्ये जो उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये प्रशासनाची काय भूमिका असणार आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम आपण दिलेले रूलिंग गेल्या मिटींग मध्ये आपण सांगितले होते की गटनेत्यांच्या बैठकीमध्ये हा विषय आपण घेऊ आणि त्यानंतरच्या पुढील महासभेमध्ये आपण हा विषय घेणार आहोत तरी कृपया सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांना आमची विनंती आहे की आपल्या गटनेत्यांच्या बैठकीत हा विषय ठरलेला होता. कृपया त्यांनी दिशाभूल करू नये.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रशासनाकडून आम्हाला याचे उत्तर मिळाले पाहिजे. जेव्हा प्रशासनाकडे सर्व बाबींचा पुरावा होता तरी या विषयाला गोल गोल करून का फिरवत होते. आज आज जेव्हा उपोषणाला बसण्याची पाळी आली तेव्हा प्रशासन त्यांना पत्र देते म्हणजे या शहरामध्ये सुव्यवस्था बिघडवण्याचे काम आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर महोदय आम सभा मे जितने सबजेक्ट आते है वह जनहित के है। लेकिन यह कुछ हितके काम के लिए पुरी सभा का समय खराब करते है। स्वार्थ के लिए पार्टी के लिए यहा शहर के हितकी कोई बात नही करते। मै आपसे फिर एक बार निवेदन करता हुँ. महापौर मॅडम यह रूलिंग देके अगली मिटींग तक रोड का नामकरण क्या करना है, और आपका पुरा सुनना, हम लोग भी उसके बारेंमें बोलना सारा मौका उन्हौने दिया हूआ है उसके बाद आपने गेटके पास बिठाके कर दिया। ऐसे नगरसेवक ऐसी पार्टी के लिए कुछ कुछ करीए जो सभाका समय खराब करती है। यहॉ इम्पोर्टेन सबजेट है।

**मा. महापौर :-**

विषयांस सुरुवात करण्यात यावी. आपण

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम हा प्रशासनाचा भाग आहे. आम्ही सभागृहाच्या निर्देशनास आणतो हा विषय पुढच्या सभेला घेऊ. आज तो विषय याच्यामध्ये नाही आहे आणि महत्वाचा आहे.

**मा. महापौर :-**

महत्वाचा आहे हे मला माहीत आहे. मी तुम्हाला सांगितले की आपण पुढच्या सभेला घेऊ. आज तो विषय यांच्यामध्ये नाही आहे.

**रोहीदास पाटील :-**

सभेला विषय घ्यायचा हे तुम्ही मान्य केले व ते आम्ही सुध्दा मान्य केले याच्यामध्ये दुमतच नाही. प्रशासनाच्या कामकाजाच्या पध्दतीचा आपणा समोर मांडतो प्रशासनाने लिखीत लिहीले आहे आमची पहिल्या दिवसापासून अहिंसावादी मागणी होती. त्या ग्रामपंचायतीचा ठराव आहे आणि ग्रामपंचायतीच्या ठरावानुसार ते चालेले आहे. हा ठराव मिळत नाही. आपण आग्रह धरत राहिलो आणि काल प्रशासनाला तो ठराव मिळाला त्यांनी पत्र दिलय ते पत्र दिल्याच्या आधी त्यांनी पत्र दिलेले आहे त्यावर स्पष्ट लिहीलेले आहे की, जर ग्रामपंचायतीचा ठराव मिळाला तर तो बोर्ड आम्ही घेऊन येणार आणि मग महासभेपुढे विषय घेऊन नंतर नंतर त्या विषयाची चर्चा होणार या गोष्टीची नाईक साहेब आहेत, केळकर साहेब आहेत. त्यांनी दिलेले लेखी पत्र आहे. प्रशासकीय कामकाजाची पत्रव्यवहाराच्या अंमलबजावणीचा सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी यांचा आग्रह आहे.दुसरा कोणता वाद घालायचा आहे किंवा दिशाभूल करायची आहे. किंवा सभागृहाचा वेळ घ्यायचा आहे. असा प्रश्न नाही तुम्ही पत्र आम्हाला लिहून दिले आहे त्यांचे कार्यवाही कधी करणार? ते सांगा.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम सन्मा. सदस्य रोहीदास पाटील या विषयावर पुन्हा पुन्हा तेच तेच बोलत आहेत. मागच्या सभे मध्ये मा. महापौर मॅडम यांनी सांगितले की जैन समाजावर आपले तेवढे प्रेम आहे. त्याच्यापेक्षा १०० टक्के जास्त प्रेम आमचे आहे. आम्ही येथे सांगितले आहे आणि महापौरानी आश्वासन दिलेले आहे की सगळ्या गटनेत्यांची आम्ही बैठक घेऊन त्यामध्ये निश्चितपणे योग्य तो निर्णय घेऊ. आणि त्यावर देखील आपले सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी देखील सांगितले की मी संपुर्ण अभ्यास केला, ग्रामपंचायत ठराव बघितला, कायदे व सगळ्याबाबी पाहिल्या आणि जे योग्या वाटले त्या योग्यतेने निर्णय घेतलेला आहे. या सगळ्या गोष्टी क्लीअर झाल्या असताना पुन्हा वाद निर्माण करायचा वातावरण गढुळ करायच हे सन्मा. सदस्य रोहीदास पाटील आम्हाला देखील योग्य वाटत नाही. आम्ही सांगितलेले आहे.

**रोहीदास पाटील :-**

सन्मा.सदस्य आसिफ शेखजी हा वाद नाही आहे. तर ती या पत्राची प्रशासनाची अंमलबजावणी आहे.

**आसिफ शेख :-**

नाही पण महापौरांनी एकदा आश्वासन दिलेले आहे. पुन्हा पुन्हा तो विषय काढायचा. विषयपत्रिकेवर अत्यंत महत्वाच्या शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाचे विषय आहेत. त्यावर देखील चर्चा करायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

सदरच्या विषय पुढच्या सभेत घेण्यात येईल.

**शशिकांत शहा :-**

महापौर मॅडम ये सब अधिकारीयो के उपर जबरदस्ती लादने के बात है। जबरदस्ती लिखाकर लेने की बात है। जो बोर्ड महानगरपालिकाने लगाया वो कभी निकल नही सकता। जब की सामान्य सभा निर्णय करेगी तो ही उसके पहले इसको कुछ होना नही चाहिए और ये हमारी जनसमुदाय की लागणी है। उस लागणी को आप ध्यान मे लिजिए।

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, १८ तारखेची महासभा तहकुब झाली आणि त्या तहकुब सभेचे सभाशास्त्रामध्ये असे आहे की तहकुब सभेमध्ये जे पूर्वीचे विषय असतात तेच विषय घ्यायचे असतात त्या विषयाच्या पलिकडे आपल्याला तहकुब सभेमध्ये चर्चा करता येत नाही. तेव्हा पूर्वी जे सभेमध्ये

विषय आहेत. त्या विषयावर बोला आपण जे निर्णय घेतले आहेत त्या निर्णयानुसार आपण त्याच्या सभा घेऊ शकतात.

**रोहीदास पाटील :-**

महापौर मॅडम आमची विनंती एवढीच आहे की केळकर साहेब त्याची काय अमंलबजावणी करणार त्यांनी एका शब्दात निवेदन केले तर विषय संपला. विषय वाढवतो कुठे?

**मा. उपआयुक्त साो. (कल्याण केळकर) :-**

मा. महापौर मॅडम उपस्थित सभागृह महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमानुसार जरी भाईंदर ग्रामपंचायतीने त्यावेळी तो निर्णय घेतला असेल त्यानंतर नगरपालिका स्थापन झाली. महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ च्या ४९ सेक्शननुसार तत्कालीन नगरपालिकेला नावा मध्ये बदल करण्याचे किंवा नामांतर करण्याचे अधिकार होते. त्यामुळे भुतपुर्व ग्रामपंचायतीने घेतलेला निर्णय हा महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या ठरावानुसार सुपर शीट झाला आहे. त्यानुसार मा. महापौर मॅडम यांनी रूलिंग दिलेले आहे त्या रुलिंगमध्ये त्यांनी स्पष्ट सांगितले आहे की परत जर आपणाला या विषयावर चर्चा करून महाराष्ट्र मुंबई प्रांतिक १९४९ चे कलम ६३ नुसार पुन्हा आपण त्यावर चर्चा करू शकतो आणि हा संपूर्ण महासभेचा निर्णय महासभेला या बाबत निर्णय घेण्याचे अधिकार असल्यामुळे महासभेला याबाबत पुढील निर्णय घेण्यासाठी पुढील सभेवर त्यांनी ठेवण्याचे रुलिंग दिलेले आहे. त्यावर पुढील सभेत चर्चा होईल धन्यवाद.

**संजय पांगे :-**

सचिव साहेब मला एक मुद्दा उपस्थित करायचा आहे. सन्मा. पीठासन अधिकारी खामतकर साहेबांनी आयुक्त पदाचा चार्ज घतलेला आहे. आजच्या सभेला उपायुक्त म्हणून कल्याण केळकर आयुक्तांच्या जागेवर स्थानापन्न झालेले आहेत. आयुक्तांनी आपल्या अधिकारात उपायुक्तांना प्राधीकृत केले आहे काय? याबाबत आपण मला माहीती द्या.

**मा. उपआयुक्त साो. (कल्याण केळकर) :-**

सन्मा. खामतकर साहेब यांच्याशी मी सकाळीच फोनवर बोललो त्यांना कल्पना दिली कि आज महासभा आहे. परवा सुध्दा बोललो होतो मी महासभेला हजर राहू शकत नाही तुम्ही ते कामकाज बघावे. अशा मला दुरध्वनीवर सुचना दिल्या आहेत.

**संजय पांगे :-**

सचिव साहेब प्राधीकृत केल्याचे पत्र तुमच्याकडे आहे काय?

**प्र. सचिव :-**

मा. आयुक्त साहेंबांनी मा. उपआयुक्त साहेबांना दुरध्वनीवरून संदेश दिलेला आहे. कि माझ्या जागी तुम्ही सभेची कामकाज चालवावे.

**संजय पांगे :-**

तुमच्याकडे लेखी पत्र आहे, एवढेच उत्तर द्या.

**प्र. सचिव :-**

लेखी पत्र माझ्याकडे नाही.

**संजय पांगे :-**

मग ही सभा कायदेशीर ठरेल की बेकायदेशीर ठरेल.

**प्र. सचिव :-**

दुरध्वनीवरून दिलेल्या निरोपामुळे ही सभा कायदेशीर ठरेल.

**संजय पांगे :-**

ही सभा कशी कायदेशीर ठरेल याचा मला कलम दाखवा. सन्मा. पीठासन अधिकारी महानगरपालिका व त्यांचे कामकाज यामध्ये असे स्पष्ट म्हटलेले आहे की आयुक्तांच्या अनुपस्थितीत जर उपआयुक्तांना सभागृह चालवायचे असेल तर प्राधीकृत केल्याचे पत्र सचिवांकडे देणे आवश्यक आहे.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम माझ्या माहितीप्रमाणे जेव्हा सभेत पीठासन अधिकारी असतात ते पीठासन अधिकारी सभा सांभाळण्याचे आयुक्त किंवा उपआयुक्तांना ते आता देऊ शकतात.

**संजय पांगे :-**

मॅडम जरा ॲक्ट वाचा.

**मा. उपआयुक्त साो. (शिवमुर्ती नाईक) :-**

मा. महापौर मॅडम  पान क्र. ५० वर कलम ४३ अन्वये आयुक्तास त्यांच्य अनुपस्थितीत त्यांनी या बाबत प्राधीकृत केलेल्या उपआयुक्तास  किंवा सहाय्यक आयुक्तास, परिवहन व्यवस्थापकास किंवा त्यांच्या अनुपस्थितीत त्याने याबाबत प्राधीकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांस परिवहन समितीच्या किंवा उपसमितीच्या सभेत उपस्थित राहणाच्या किंवा त्यामध्ये होणाऱ्या चर्चेत भागघेण्याचा व अशा समितीच्या सदस्यास जो अधिकार असतो  तोच अधिकार असेल.  परंतु त्या सभेत कोणत्याही सभेवर मत देण्याचा किंवा प्रस्ताव मांडण्याची मोकळीक असणार नाही.

**संजय पांगे :-**

सन्मा. पीठासन अधिकारी जर आयुक्तांना प्राधीकृत करायचे असेल तर तसे लेखी पत्र त्यांना सचिवांकडे देणे आवश्यक आहे.

**मा. उपआयुक्त सो. (शिवमुर्ती नाईक) :-**

ऑक्टोबर मध्ये ज्या गोष्टी तरतुद आहेत अनुपस्थीत त्यामुळे लेखी देण्याची काही गरज नाही अनुपस्थिती आहे म्हणजे मा. आयुक्तांनी सांगितले आहे की मी हजर राहणार नाही तुम्ही सभेचे कामकाज चालवा.

**संजय पांगे :-**

अनुपस्थिती बाबतचे पत्र सचिवांना द्यावे लागते.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम मा. सहाय्यक आयुक्त नाईक साहेब यांनी आता ४३ क्रमांकाचा नियम जो सांगितला तो स्थायी समिती आणि परिवहन समितीला आहे. सर्वसाधारणपणे मा. महासभेला शेवटी सभा कोणाची असते याला जास्त महत्व आहे. सभा कोण बोलवतो आणि कोणाला सभेची निमंत्रण पाठविली जातात. आपण सभा बोलाविली आपण कोणाला दिली. सगळ्या सदस्यांना दिली ज्या व्यक्तीला एखादी व्यक्ती एखाद्या सभागृहाचा सदस्य असत नाही किंवा तो पीठासन अधिकारी असत नाही. त्याला कायद्याने येणे येथे बंधनकारक नसते तेव्हा कुठल्याही आयुक्तांना, उपआयुक्तांना किंवा हे सगळे बसलेले अधिकारी की जे दिवसभर येथे बसतात निदान ह्या दिवशी तरी ते येथे बसतात इतर दिवशी ते भेटतच नाहीत आजच चेहरे बघायला भेटतात त्यांनासुध्दा आमची इच्छा नसेल तर त्यांना बसण्याची गरज नाही आहे. परंतु मा. महापौर मॅडम यांना वाटते की मा. कमिशनर साहेब तुम्ही उपस्थित रहा तर तसे आदेश देऊ शकतात अन्यथा मा. कमिशनर, डेप्युटी कमिशनर, असिस्टंट कमिशनर यांना सभेस हजर राहण्याची सक्ती नाही त्याच्यासाठी कोणी प्रशासनिय कामकाज करण्यासाठी बघायला पाहिजे सभागृह चालविण्यासाठी मा. कमिशनर, डेप्युटी कमिशनर, अस्स्टिंट कमिशनर यांची उपस्थिती आवश्यक नसते.

**संजय पांगे :-**

सन्मा. सचिव महोदय मला एवढेच सांगा की आजची सभा ही कायदेशिर ठरेल अथवा बेकायदेशिर ठरेल.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम या ठिकाणी हा जो उपस्थित करण्यांत आलेला आहे आणि त्याचे शिवमूर्ती नाईक जेव्हा वाचन केले आणि सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील त्यांनी त्याच्यावरती जे आपले मत व्यक्त केले आणि जे विचार मांडले ह्या सभागृहाला पुढे जाण्यासाठी आणि चालना देण्यासाठी हे आवश्यक होते आणि ह्या ठिकाणी महत्वाचा मुद्दा असा आहे की जर मा. आयुक्त किंवा मा. उपआयुक्त केव्हा नसते आणि ऑब्जेक्शन त्यांच्या स्वतःचे कामकाजाने कुठे हरकत असती तर ह्या ठिकाणी सभागृहाला अंर्तमुख होऊन चिंतन करून याच्यासाठी विचार करणे आवश्यक असते परंतु आज जर दुरध्वनी करून मा. खामतकर साहेबांनी ही सभा चालविण्यासाठी उपआयुक्तांना प्राधिकृत केलेले असेल तर ह्या सभेचे कामकाज बेकायदेशिर असे काही वाटत नाही तरी हे कामकाज पुढे चालवावे अशी आपल्याला विनंती आहे.

**संजय पांगे :-**

सन्मा. पीठासन अधिकारी मला रूलिंग द्यावे कायदेशिर ठरेल अथवा बेकायदेशिर.

**मा. उपआयुक्त सो. (शिवमुर्ती नाईक) :-**

मा. महापौर मॅडम महाराष्ट्र महानगरपालिका जे ४३ सेक्शन ते महानगरपालिकेतील मा. महासभा. स्थायी समिती आणि परिवहन समिती आणि संस्थेची समिती महानगरपालिका म्हणजेच महासभा यांचे जे अधिकार अनुपस्थित वापरायचे आहेत त्याचे लेखी असण्याचे काही कारण नाही परंतु स्टॅंडिंग ऑर्डर मध्ये त्यांना ज्यावेळी कार्यालयीन आदेश दिलेले आहेत संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आज

दि. २५/०६/२००३ पासून मिरा भाईंदर महापालिकेत उपआयुक्त मा. कल्याण केळकर यांना हजर करण्यात येत असून खालील विभागाचा पदभार सोपविण्यात येत आहे सामान्य प्रशासन विभाग, जकात विभाग, वाहन विभाग, जाहिरात विभाग, भंडार विभाग, राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या सर्व योजना व बैठकांचे व्यवस्थापन यामध्ये स्थायी समिती आणि सर्वसाधारण सभा अग्निशामन विभाग व खास नेमून न दिलेले इतर सर्व विषय याचा अर्थ असा झाला की माझ्या गैरहजेरीमध्ये किंवा मी नसेल त्या त्या वेळेला तुम्हाला जे ॲक्ट मध्ये तरतुद आहे ४३ कलम (५) प्रमाणे ज्या ज्या वेळेला गैरहजर असतील किंवा विषय नेमुन दिलेले ह्यामध्ये स्थायी समिती आणि सर्वसाघारण सभा दिलेले आहे या ॲक्टची म्हणजेच ते ज्या वेळेला गैरहजर असतील त्या त्या वेळेला ह्याचा वापर करावयाचा आहे.

**संजय पांगे :-**

सन्मा. पीठासन अधिकारी हे जे वाचुन दाखविलेले आहे हे व्यवस्थापनाचे आहे. स्थायी समिती सभा आणि सर्वसाधारण सभेचे व्यवस्थापन आहे. सभा चालवणे नव्हे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण जो कलम ४३ सांगितला मा. नाईक साहेंब तो महानगरपालिका आमसभेचा नाही. तो स्थायी समितीचा आणि परिवहन समितीचा आहे. मा. महासभेला मा. कमिशनरनी हजर राहिलेच पाहिजे अशी कुठलीही सक्ती नाही आहे आणि तशा प्रकारचा दुसरा नियम आहे आपण जरा तो वाचा. कमिशनर निड नॉट अटेंड अनटील ही इंस्ट्रक्टेड बाय मेयर टू गिव्ह अ स्पेशल इंस्ट्रक्शन टू क्लिअर द क्वेशन्स रेझ बाय द कॉन्सिलर्स.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम याठिकाणी मा. उपआयुक्त शिवमुर्ती नाईक साहेबांनी आणि सन्मा. जेष्ठ सदस्य प्रफुल्ल पाटीलजी यांनी मला वाटत या विषयावर व्यवस्थितपणे खुलासा केलेला आहे आणि महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३ मध्ये स्पष्ट म्हटले आहे आणि उपाआयुक्त ती ऑर्डर त्यांच्या कामकाजासंदर्भात मा. आयुक्त साहेबांनी दिलेली आहे ती कायद्याशी सुसंगत अशी त्यामुळे आजची ही सभा कायदेशीरच आहे असे माझे ठाम मत आहे. तरी मला वाटत आजच्या सभेला सुरवात करावी.

**संजय पांगे :-**

सन्मा. सचिवसाहेब मला रुलिंग द्या.

**प्र. सचिव :-**

मा. आयुक्तसाहेबांनी मा. उपआयुक्त साहेबांना आदेश दिले आहेत त्यामुळे ही सभा कायदेशीर होईल.

**संजय पांगे :-**

असे लेखी पत्र तुमच्याकडे प्राधिकृत केल्याचे आहे का?

**प्र. सचिव :-**

हो लेखी पत्र आहे.

**संजय पांगे :-**

सभागृहाला ते पत्र दाखवा. वाचून दाखवा.

**शशिकांत शहा :-**

आता पत्र वाचून दाखवले आहे तर परत परत काय वाचून दाखवायचे? मला दाखवा म्हणजे काय. सभागृहाचे काही नितीनियम आहेत की नाही? एकदा रुलिंग दिलेले आहे कि सभा कायदेशीर आहे.

**संजय पांगे :-**

सभा चालवण्याबाबत नाही, सर्वसाधारण सभेचे व्यवस्थापन असे लिहिले आहे त्याच्यामध्ये.

**प्र. सचिव :-**

मा. आयुक्तांनी नऊ बाबीमध्ये उपआयुक्तांना आदेश दिलेले आहेत १) सामान्य प्रशासन अस्थापनासह २) जकात विभाग ३) वाहन विभाग ४) जाहिरात विभाग ५) भांडार विभाग ६) राज्य शासनाच्या व केद्र शासनाच्या सर्व योजना ७) बैठकांचे व्यवस्थापन स्थायी समिती व सर्व साधारण सभा ८) अग्निशामन विभाग ९) खास नेमुण न दिलेले इतर सर्व विषय.

**संजय पांगे :-**

त्याच्यामध्ये व्यवस्थापन लिहिले आहे. व्यवस्थापन म्हणजे सभा एकच का?

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम आपण रुलिंग दिल्यानंतर प्रश्न येतच नाही आपण रुलिंग दिलेले आहे कि सभा कायदेशीर आहे. त्यांनी कायदेशीर बाबी पडताळून पहाव्यात. आपण सभा सुरू करावी अशी मी आपणाला विनंती करीत आहे.

**मा. महापौर :-**

सभेला सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र ३९ चे वाचन केले)

**मा. महापौर :-**

सदरचा विषय नंतर घेण्यात यावा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम सदर विषय आपण आजच्या विषयपत्रिकेवरून तात्पुरत्या स्वरूपामध्ये मागे ठेवतोय ह्याचे प्रोव्हीजन काय? हे जरा सभागृहाला सांगून स्वतंत्र नळ कनेक्शन देण्याकरिता महानगरपालिकेतर्फे सर्व बाबीमध्ये जे धोरण ठरवायचे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम हा विषय एवढा महत्वाचा आहे आणि या विषयावर विस्तृत चर्चा करण्याची असल्यामुळे आपण हा विषय मागे टाकलेला आहे. सर्व सदस्यांना बोलायचे असल्यामुळे हा विषय आपण पुढे ढकलला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

याच सभेत ठेवणार आहात?

**मा. महापौर :-**

होय याच सभेमध्ये.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.४० चे वाचन केले )

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम या विषयावर बोलायला मला परवानगी द्यावी. विषय क्र. ४० महापालिकेच्य स्थायी समितीमध्ये तसेच महासभेमध्ये निरनिराळ्या विभागामध्ये लाखो रूपयाचे पाईप लाईन टाकण्याचे काम वारंवार सभागृहापुढे येते. पाईप लाईन टाकू नये असे आमचे म्हणणे नाही. परंतु ज्या पाईप लाईन टाकायच्या आहेत त्या त्या विभागाचे किंवा या अगोदरचे जे प्रस्ताव आहेत. याला पाणी विभागातर्फे प्रधान्य दिले जाते का? याचा विचार होणे आवश्यक आहे कारण आम्ही मागच्या वेळी देखील नगरसेवक असल्याने आमचे गेल्या वेळचे अनेक प्रस्ताव पाणी विभागामध्ये पेंडींग का ठेवले आहेत. अनिर्णित का आहेत? याचे उत्तर माझे भाषण संपल्यानंतर त्या विभागाच्या प्रामुख्याने दिले तर बरे होईल. तसेच अत्यंत महत्वाचे म्हणजे आपल्या पाणी विभागामध्ये जे गोडाऊन आहे. या गोडाऊनमध्ये कुठल्याही स्वरूपात जे छोटे रॉ मटेरियल असते. ते प्रत्येक नगरसेवकांच्या प्रभागात अत्यंत महत्वाचे असते. प्रत्येकाला त्याची गरज असते. कुठल्याही प्रकारचे रॉ मटेरियल आजच्या तारखेला गोडाऊनमध्ये आज उपलब्ध नाही. भाईंदर स्मशानभूमीमध्ये गेल्या दीड दोन महिन्यापूर्वी सतत पंधरा वीस दिवस पाण्याचा तुटवडा होता. पाण्याचे कनेक्शन चोकअप होते. बंद होते की काय? माहिती नाही. परंतु ते नवीन टाकण्याकरिता एका खाजगी दुकानदाराला विनंती करून उधार खात्यामध्ये जवळ जवळ चार साडेचार हजाराचे मटेरियल आम्हाला आणायला लागले आणि ते मटेरियल आणून मिरा भाईंदर मालकीच्या असलेल्या स्माशानभूमीला मला ते कनेक्शन करून रितसर आदेश करून घ्यावे लागले सांगायचा दृष्टीकोन असा आहे की, जे महत्वाचे मटेरियल आहेत. छोटे छोटे आहेत जास्त खर्च त्यांना लागणार नाही पण मिरा भाईंदर सारख्या एवढ्या मोठ्या शहरात जवळजवळ सव्वीस वॉर्ड आहेत आणि ८४ नगरसेवक आहेत. या सर्व लोकांना अत्यंत गरजेचे आणि आवश्यक असलेले कुठलेही पाणी विभागाचे पार्ट गोडाऊनला उपलब्ध नाहीत. अनेक वर्षानुवर्षे आम्ही विनंती करून कुठेतरी प्रशासनाच्या आपल्या विभागाच्या संपूर्ण कार्यप्रणालीमध्ये बदल आणणे गरजेचे आहे. आपल्याकडे बजेट नाही आहे का? बजेट असूनसुध्दा हे विषय बाजुला ठेवले जातात आपल्याकडे टी. सी.एल पावडरचा तुटवडा आहे. अनेक ठिकाणी पाण्याचे पंप अजून आणलेले नाही. कुठेही लिकेज झाल्यावर पंपाची आवश्यकता असताना देखील पंप उपलब्ध नसतात. या गोष्टीकडे आपण दुर्लक्ष करून चालणार नाही मागच्यावेळी सभागृहात देखील हा विषय येऊन गेल्यावर देखील मटेरियल मंजूर करण्यात आलेले नाही आणि आणले देखील गेले नाही याचा विचार करावा. या अगोदरचे जे प्रपोजल

आहेत ते का घेतली गेली नाही? त्याच्या मध्ये काही कमी आहे का? तुमच्याकडे काय कमी आहे का? यांच्यापेक्षा लहान लहान प्रपोजल आहेत पण अजून ती मंजूर झालेली नाहीत. माझ्याकडे सर्व प्रपोजल आर्थिक, प्रशासकीय मंजूरी मिळाल्याचे ऑर्डरस आहेत मी नियमाबाह्य जाऊन काम करा असे बिलकुल सांगत नाही. माझ्याकडे तत्कालीन नगरपालिकेच्या आर्थिक, प्रशासकीय मंजूरीच्या ऑर्डरस आहेत त्याकामी तुम्हाला रिपोर्टपेन्टला लवकरच देणार आहे. याच्यावर मला रुलिंग द्या.

**दशोरे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सांगितले की, मी वेळोवेळी सुचना दिली साहित्य उपलब्ध राहत नाही. त्यांची ही सूचना लक्षात घेता आणि जस मागे पण आम्ही बघितले की, दोन वर्षापासून मटेरियल घेतले नव्हते तर आता आम्ही चार चार लाखाचे दोन एस्टिमेट तयार करून मंजूरी मिळालेले आहे आणि ठेकेदाराला वर्क ऑर्डर देण्यांत आलेली आहे आणि तरी ते मटेरियल उपलब्ध करण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

दोन वर्षामध्ये जे ठराव पास झाले. टेंडर निघाले आणि मटेरियल घेतो असे भासवले गेले ते मटेरियल का आले नाही? दोन वर्ष नाहीत हे आपण कबुल केलय आणि बजेटमध्ये जी तरतुद होती त्याचे काय झाले? ती कुठे वर्ग केली गेली? त्या मटेरियल करिता तरतुद ठेवण्यात आली होती मागच्या बजेटमध्ये.

**दशोरे :-**

मागच्या बजेटमध्ये नाही आता जे बजेट तयार करण्यात आलेले आहे. त्याची साडेपाच कोटीची नवीन कामासाठी तरतुद आहे आणि मेन्टेनन्ससाठी दीड कोटीची तरतुद आहे. त्याप्रमाणे आपण एस्टिमेट तयार करून आठ लाखाच्या मटेरियलची वर्क ऑर्डर देण्यात आलेली आहे आणि लवकरात लवकर ती उपलब्ध होईल आणि दुसरे म्हणजे आपण जे म्हटले की स्माशानभूमी पाईप लाईन टाकाणे हे सर्व बांधकाम खात्याचे काम आहे. तरीसुध्दा समाज मंदिरला आम्ही लाईन टाकून दिली होती.

**मिलन म्हात्रे :-**

मला एक सांगा हे जर तुमच्याकडे काम नसेल तर तस आम्हाला एक पत्र द्या मग आम्ही तुम्हाला कशाला पत्रव्यवहार करणार? बील मी तुम्हाला आणून दिलेले आहे. तुम्ही सांगायला पाहिजे तुम्ही माझ्याकडे आणून देऊ नका. तुम्ही बांधकाम विभागाला द्या. मॅडम आपले यावर रुलिंग काय आहे? हे अधिकाऱ्यांचे संभाषण झाले.

**मा. महापौर :-**

विभागाने काम तात्काळ करून घ्या.

**जोजफ घोन्सालविस :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की अनुक्रमांक ४ मध्ये पाली पतन धक्का असे लिहीले आहे तर ते ठिकाण कोणते?

**दशोरे :-**

आम्ही पाईप लाईन करताना हे सगळे पाली करीपाडा हे सगळे आम्ही एकत्र घेतलेले आहे. आम्ही जे लोकेशन घेतले त्याच्यामध्ये पाली बंदर हे घेतलेले आहे.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय विषय क्र. ४० जुन्या जलवाहिन्या बदलणे हे गरजेचे आहे. कारण सिमेंटच्या जलवहिन्या आपण पूर्वी टाकलेल्या आहेत त्याच्यामध्ये अनेक लिकेज आहेत तसेच बऱ्याचशा त्रुटी आहेत परंतु याच्यामध्ये जवळ जवळ तीन ते साडेतीन करोडची अंदाजित रक्कमेला मंजूरी मिळण्यासाठी हा विषय आलेला आहे किती लांबीला किती पैसे खर्च होणार आहेत याचे काही डिटेल याच्यामध्ये नाही. कुठली जलवाहिनी किती व्यासाची टाकणार आहोत. काही आम्हाला माहित नाही फक्त साडेतीन करोडला आम्ही मंजूरी देत आहोत. हे होणे गरजेचे आहे हे मला मान्य आहे. पण त्याचे कुठल्याही तऱ्हेचे डिटेल या ठिकाणी नाही. १५०० ते १८०० कनेक्शन नविन जलवाहिन्यांना लागणार आहेत. म्हणजे लागणार म्हणण्यापेक्षा ते ट्रान्सफर होणार आहेत. जे जुने लावलेले कनेक्शन आहेत किंवा आणखी काही नविन लागतील तेव्हा जुने कनेक्शन ट्रान्सफर आम्ही नवीन लाईनवर करतो तेव्हा त्या लोकांना पुन्हा सहा हजाराचा भूर्दंड पडतो. सरासरी पाच हजारापासून बाकिचा इतर खर्च पकडला तर सहा हजारापर्येत तो खर्च येत असतो. आणि मी सभागृहाला विनंती करतो की खेडे गावातील बरंचशे कनेक्शन आहेत खेडे गाव जे आहेत उत्तन किंवा इतर ठिकाणी. पण जे जुने कनेक्शन

त्याच्यावर ट्रान्सफर होणार आहेत त्यांना अल्प किंमतीमध्ये त्यांना चार्जेस लावावेत अशी माझी आपल्याला विनंती आहे. कारण हा सरासरी सहा हजाराचा रेट जास्त होतो. त्यामुळे लोकांना त्याचा काही फायदा होत नाही. तेव्हा माझी सभागृहाला विनंती आहे की, पुर्वी चार्जेस भरलेले आहेत. पूर्वी ज्यावेळी त्यांनी कनेक्शन घेतले जेव्हा त्यांनी चार्जेस भरलेले आहेत. आता आपल्या सोयीसाठी आपल्या ज्या काही पालिकेच्या चुका आहेत त्या म्हणजे आपल्याला जुनी पाईप लाईन बदलायच्या आहे आणि त्याच्यावर त्यांना घेणे गरजेचे आहे. जुन्या पाईप लाईन आपण बंद करणार म्हणजे महापालिका बंद करणार आणि त्यामुळे त्याच्यवर ट्रान्सफर होणे गरजेचे आहे. तेव्हा त्यांना एवढे चार्जेस न लावता संपूर्ण महानगरपालिका हद्दीत कमी प्रमाणात चार्जेस लावावेत अशी आपल्याला विनंती आहे.

**मा. उपआयुक्त (कल्याण केळकर):-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील कालच स्थायी समितीने निर्णय घेतला आहे मा. सभापती साहेब या ठिकाणी सभागृहामध्ये आहेत पाचशे रुपये फक्त ट्रान्सफर चार्जेस द्यायचे आणि बाकी इतर खर्च माफ करायचे असे ठरले.

**प्रभात पाटील :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते हा निर्णय संपूर्ण मिरा भाईंदर शहरासाठी आहे का?

**मा. उपआयुक्त :-**

जे जुन्या लाईन वरून ट्रान्सफर होणारे कनेक्शन आहेत त्याकरिताच हा नियम लागू आहे कालच स्थायी समितीच्या सभागृहामध्ये हा निर्णय झाला आहे.

**रतन पाटील :-**

पाणी अधिकारी यांनी कृपया याची सविस्तर माहिती द्यावी.

**दशोरे :-**

जुनी पाईप लाईन जर पूर्णपणे महानगरपालिका बंद करत असेल तर त्यानाच फक्त हा नियम लागू आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे. आता बरेचसे अंदाज चार ते साडेचार कोटीची पाईप लाईन महापालिकेच्या वतीने टाकण्यासाठी इथे मंजूरीसाठी आपल्याकडे आज हे प्रकरण आलेले आहे. पण बऱ्याचशा वेळेला आपल्याकडून मंजूरी घेतली जाते आणि आपण सभागृहात देतो पण त्याच्यानंतर त्याचा फॉलोअप करताना त्याच्यावर अधिकारी जातीने लक्ष ठेवत नाहीत. याच्यामध्ये अजूनही बऱ्याचशा त्रुट्या आहेत कारण याच्यामध्ये किती इंचाची लाईन, किती व्यासाची लाईन टाकली जाते किती जाडीची आहे त्याची टेस्टिंग क्षमता किती आहे याचा जरादेखील गोषवरा नाही आहे कारण हलक्या प्रतीच्या पाईप लाईन आणल्या जातात आणि प्रेशरने फुटल्या जातात आणि वारंवार पाईप लाईन फुटून असे प्रत्येक वेळेला मिरा भाईंदर मध्ये येणारे पाणी खंडीत झालेले आहे आणि त्या वेळेला अशी आंदोलन उभी झालेली आहेत म्हणून माझी मा. महापौर मॅडमना नम्र विनंती आहे की जातीने याच्यावर लक्ष असणे गरजेचे आहे त्याची क्षमता ही पुरेपुर मोजली पाहिजे. तसेच महापालिकेच्या वतीने आता जे हे प्रस्ताव आलेले आहे अजून बरेचशे प्रस्ताव पाईप लाईनचे प्रस्ताव एकत्रित करून त्याला एकत्रित मंजूरी द्या. अशी मी मा. महापौर मॅडमना विनंती करतो परत दुसरा एक तसाच मुद्दा आहे की हे काम करताना पाईप लाईन टाकताना एखाद्या ठेकेदाराला काम दिले जाते आणि एखाद्या ठेकेदार वाटेल तसे दिवस रात्र काम करुन पाईप लाईन टाकल्या जातात आणि आजपर्यंत तेच काम झालेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये टाकलेल्या संपुर्ण पाईप लाईनचे जॉईन्ट पुर्णपणे बंद झालेले नाहीत आणि आपल्या कर्मचाऱ्यामार्फत ते बंद करावे लागतात त्याला ज्या शिसाने जॉईन्ट होते ते शिसे लावले जात नाही दशोरे साहेब, मी म्हणतो की पाईप जॉईन्ट ठेकेदाराकडून पुर्णपणे बंद होत नाहीत हे बरोबर आहे का? आपले पाणी विभागाकडून त्याच्यावर लक्ष ठेवल जात नाही म्हणून ही दिरंगाई होते आणि याचा भुर्दंड महापालिकेला होऊ नये. महापौर मॅडमना अशी की विनंती आहे की त्या पाणी विभागावर देखरेखीसाठी एक सर्व पक्षीय सक्षम कमिटी नेमून करावी. आपण जनतेचा पैसा खर्च करतो. तर ह्याचा पुरेपुर व्यवस्थित वापर झालेला नाही तर उद्या जनताच आपल्याला दोषी ठरवेल म्हणून महापौरांना विनंती आहे की मी मांडलेल्या काही मुद्यांवर विचार करावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सिमेटच्या जलवाहिन्या बदलून नवीन बीडाची जलवाहिनी टाकण्यासंदर्भात ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर मॅडमच्य परवानगीने बोलते, ठराव होण्यापुर्वी मला थोडासा खुलासा पाहिजे आहे . यामध्ये प्रकरण ४० अनुक्रमांक ८ काशी गावठण असा जो उल्लेख केलेला आहे पंधरा लाख पंच्याऐंशी हजार सहाशे त्रेचाळीस रुपयाची ही रक्कम दाखविली आहे काशी आणि काशी गावठण म्हणते नेमकी कुठे पाईप लाईन टाकणार याचा जरा खुलासा अधिकाऱ्यांनी करावा.

**दशोरे :-**

भटाचा पाडा, महाजनवाडी जो विभाग राहिलेला आहे. तिथे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

भटाच्या पाड्याला पाईप लाईन टाकलेली आहे. येथे स्पष्ट उल्लेख नाही.

**दशोरे :-**

महाजन वाडीला पण आपण घरले आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख करा कुठे तुम्ही टाकणार? काशीमिरा वेगळे आहे आणि काशी गावठण वेगळे आहे.

**दशोरे :-**

काशीमिरा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

काशीमिरा फार मोठा आहे. काशीमिरामध्ये कुठे टाकणार? तुम्हाला माहिती नसेल तर मी सांगते त्या ठिकाणी टाका बाकी ठिकाणी पाईप लाईन टाकलेली आहे त्या ठिकाणी तुम्ही परत टाकणार आहे भटाचा पाडा, माशाचा पाडा तिकडे तुम्ही आधीच पाईप लाईन आणून ठेवली आहे. जनतानगरवरचा टप्पा या ठिकाणी पाईप लाईन नाही, मोमीन कॉलनीला पाईप लाईन नाही, तसे पत्र पण दिलेले आहे मंजूरी घेण्यासाठी तुम्ही म्हणाला महासभेंपुढे विषय येणार तर त्याच्यामध्ये असा उल्लेख नाही.

**दशोरे :-**

मोमीन कॉलनीची जी पाईप लाईन आहे. स्थायीला ठेवली आहे त्यामध्ये मंजूरी देखील मिळाली आहे मोमीन कॉलनी आणि जनतानगर वरचा टप्पा याच्यामध्ये समाविष्ट केलेली आहे ती आता मंजूरीसाठी स्थायीला दिलेले आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आणि काशी गावठण.

**दशोरे :-**

दहा लाखाच्या आत असल्यामुळे ती स्थायीला गेली आहे आणि त्याला पण मंजूरी मिळाली आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर मॅडमच्या परवागीने बोलतो, सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी ठराव मांडलेला आहे अधिकाऱ्यांना स्पेसिफिकेशन त्याच्यावर देता आले नाही की आपल्याला नक्की कुठे लाईन टाकत आहे सन्मा. नगरसेवक जयंत पाटील यांनी सांगितले की यामध्ये डिटेल असे काहीही दिलेले नाही आणि ते स्पष्ट दिसते. त्याच्यामध्ये लिहीतात की जुन्या लाईन सात ते आठ फुट खोल आहेत तर अशा लाईन नक्की कुठे आहेत संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये या गोष्टी नक्कीच नाहीत काशीमिराच्या बाबतीत आपण प्रत्यक्ष खुलासा व्यवस्थित करू शकलो नाही. तर ज्या ज्या ठिकाणी या लाईन टाकायच्य आहेत तसे प्रस्ताव आहेत महापौर मॅडम आपण गटनेत्यांना घेऊन ज्या लाईन जिथे टाकायच्या आहेत तिथे सर्वे करा आणि मगच आवश्यकतेनुसार या लाईन टाकायला आपण परवानगी द्यावी असा आता सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी जो ठराव मांडला त्यामध्ये थोडीशी दुरूस्ती करून या ठरावाला मी अनुमोदन देत आहे.

**लिओ कोलासो :-**

महापौर मॅडम आपल्या परवा ानगीने बोलतो की सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी ठरावाला जी दुरूस्ती सुचविली तर तशा स्वरूपाचा काही प्रश्न आहे का? की जेव्हा हा गोषवारा आपल्यासमोर येत आहे तो पूर्णपणे त्याचा टेक्निकल रिपोर्ट तयार करून त्याच्या सर्व बाबीचा नकाशा सहित मेजरमेंटसहित कुठल्या स्वरूपाची पाईप लाईन त्या ठिकाणी टाकायची आहे हे सगळे तपशिल करूनच हा प्रस्ताव सभागृहापुढे आलेले अशी आमची धारणा आहे तर त्यामुळे सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांना ही भीती वाटत असेल की, अशा स्वरूपाची खरोखर परिस्थिती आहे. आम्ही मुद्दाम आपल्याला सांगतो उत्तन जो भाग आहे ते सागरी किनारपट्टीचा भाग आहे त्या ठिकाणाच्या पाईप लाईन जवळ जवळ आठ फुट खोल गेलेल्या आहेत. त्यामुळे अशा स्वरूपामध्ये या ठरावाला बदल करण्याची काही आवश्यकता वाटत नाही फक्त हे जेव्हा सभागृहात व्यक्त होते की त्याचे टेक्निकल रिपोर्ट नाहीत, मेजरमेंट नाहीत कुठपासून कुठल्या अंतरापर्यंतचा भाग घेतलेला आहे तर खात्याने ही माहिती तयार ठेवलेली असेल तर सदस्यांनी सभागृहात येण्यापूर्वी सर्व घेणे आवश्यक असते म्हणून हा जो ठराव ज्यांनी मांडलेला आहे हा जशाचा तसा ठराव मंजूर होईल अशी सन्मा. सदस्यांना विनंती आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, सदर पाईप लाईनचा ठराव घंतलेला आहे आणि पास झालेला आहे त्याबाबतीत जी पाईप लाईन दिडशे फूटीचा जो रस्ता आहे त्याच्यामधून आपण जी पाईप लाईन काढली इतर ठिकाणी आपण पाईप लाईन टाकतो आणि नवीन पाईप लाईन काढली इतर ठिकाणची आपण पाईप लाईन टाकतो त्याचा हिशोब आपल्याकडे आहे का? आणि आता आपण जी पाईप लाईन टाकली हे पाईप व्यवस्थिशीर निघालेले आहेत तर त्याची ठेवण बरोबर झालेली नाही ३६९२ नंबरची गाडी पाईप भरत होती ते पाईप कॉन्ट्रक्टरने कुठे नेऊन टाकले नगरपालिकेने नेऊन टाकले कि अन्य कुठे ती गाडी भरून गेली हे कोणालाही सांगता येणार नाही तर ह्याचा हिशोब आपल्याकडे मिळेल का? नविन पाईप लाईन जेव्हा फुटतात तेव्हा आपण नवीन वापरतो कि जुने काढलेले पाईप वापरतो. ह्याचा अधिकाऱ्यांनी खुलासा केला तर बरे होईल.

**दशोरे :-**

२८ ते ३० वर्षेपूर्वीची जी लाईन आहे तिचे आपण नवीन लाईन टाकतो.

**मिलन पाटील :-**

१५० फुटाचा रोडवरचे पाईप लाईन काढली ती कुठे गेली रस्तारुंदीकरणासाठी पाईप लाईन काढली ती गेली कुठे?

**रतन पाटील :-**

रस्तारंदीकरणामध्ये पाईप लाईन काढली गेली आहे.

**दशोरे साहेब :-**

ती लाईन काढून त्याच बाजुला काढलेली आहे रस्तारूंदीकरणामध्ये गेली होती लाईन काढून परत त्याच बाजूला टाकलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

गाडी नं. ३६९२ मध्ये भरलेले पाईप कुठे गेले?

**दशोरे :-**

ती माहिती आपल्याला सभा संपल्यानंतर सांगतो.

**मिलन पाटील :-**

ती माहिती मला लेखी द्यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

गाडी नं. ३६९२ महापालिकेच्य गाडीतुन महापालिकेचे चोरीचे सामान जाते.

**मिलन पाटील :-**

चोरी झाली की नाही माझा आरोप नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एका सन्मा. सदस्याने आरोप केलेला आहे की महापालिकेचे पाईप गेलेले आहेत ते कुठे गेले ते नंतर एकट्यांना सांगणार असे चालणार नाही या महासभेमध्ये तुम्हाला त्याचे उत्तर द्यावे लागेल ती गंभीर बाब आहे अशापध्दतीने महापालिकेत दोनप्रकार झालेले आहेत म्हणून तुम्ही यांना एकट्यांना नाहीतर संपूर्ण सभागृहाला माहिती देणार असे सांगा.

**दशोरे :-**

अशी कोणती बाब माझ्या लक्षात आली नाही माहिती करून माहिती देतो.

**शुभांगी नाईक :-**

महापौरांच्या परवानगीने बोलते इक्विटी हॉटेल ते अनंत स्मृतीपर्यंत जी पाईप लाईन लिकेज झालेली होती. दशोरे साहेबांना माझी एक विनंती आहे आणि अद्यापपर्यंत दशोरे साहेबांनी या गोष्टीकडे दुर्लक्ष केलेले आहे आणि मला सांगितले आहे का? मला सांगितले पाईप लाईन बदली करणार. माणूस मेल्यानंतर तुम्ही रिपेरिंग करणार का? असा त्यामध्ये उल्लेख आहे का? या गोष्टीला चार महिने होऊन गेले तरी तुमच्याकडे फ्रॉड अजून मिळत नाही तो फ्रॉड आहे कुठे?

**दशोरे :-**

आपण जे म्हटले त्याचे एस्टिमेट तयार आहे. तर एस्टिमेट पास झाला आहे नंतर त्याचे टेंडर पण काढले. टेंडर पण ओपन झालेले आहे.

**शुभांगी नाईक :-**

त्या ठिकाणाच्या पाण्याला तेलाचा तरंगदेखील येतो असे मी पत्र देखील दिलेले आहे डॉ. बावीस्करांनी तुम्हाला विनंती देखील केलेली होती तिथे जाऊन पाणी चेक करून घ्या. अद्यापपर्यंत कोणीही अधिकारी त्या ठिकाणी गेलेले नाहीत.म्हणजे मेल्यानंतर तुमही सगळ्यांना पाणी पाजणार का? आणि मी तुम्हाला त्याच्यावर पत्र देखील टाकलेले आहे.

**दशोरे :-**

त्याची निविदा काढण्यात आलेली आहे आणि पुढच्या स्थायी समितीला ठेवून निविदा फायनल करता येतील.

**शुभांगी नाईक :-**

पुढच्या म्हणजे अजून तुम्ही सहा महिने घालवणार पुढच्या पुढच्या करुन.

**दशोरे :-**

सहा महिने नाही. आपण जसे पत्र दिल्यानंतर लगेच प्रोसेसमध्ये घेतलेले आहे.

**शुभांगी नाईक :-**

आता तो विषय आहे का?

**दशोरे :-**

याच्यामध्ये नाही आहे. स्थायी समितीने पास केलेलें आहे. आणि त्याची निविदा पण आपण काढलेली आहे याच्यामध्ये हा विषय आला नाही पण हा स्थायी समितीचा विषय आहे.

**शशिकांत भोईर :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो हा जो विषय घेतला प्रकरण क्र. ४० या विषया संदर्भात मी एक गोष्ट तुमच्या निदर्शनास आणू इच्छितो की जेव्हा आपली मागे १८/०८/०३ ची महासभा होती त्यावेळी सदर हा विषय घेतलेला होता. या संदर्भात आम्ही पत्रव्यवहार केलेला की आता सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी ठराव मांडला मंजूर झाला त्यात आमचे सन्मा. सदस्य लिओ कोलासो म्हणतात की त्यांचे नकाशे केले असतील त्यांनी मंजूरी दिली असेल पण मी पत्र दिलेले आहे. २२/०८/०३ रोजी पण त्या पत्राचे अद्यापपर्यंत उत्तर दिलेले नाही. याचा अर्थ हे नकाशे मंजूर झाले नव्हते की त्यांची तांत्रिक मंजूरी घेतली होती का? याचा खुलासा का केला नाही? मी प्रशासनाच्या समोर जाऊन बोललो आहे त्याच्याशी चर्चा केली आणि सांगितले की साहेब माझ्यापत्राची उत्तर दिलेली नाही का दिली नाहीत? तर आम्ही तुम्हाला देऊ. अद्यापपर्यंत माझ्या दोन तीन पत्राची उत्तरे दिलेली नाहीत तर प्रशासनाने नक्की नकाशे केलेले आहेत का? की करायचे आहेत? आपण अगोदरच त्याला मंजूरी देत आहेत त्याचा खुलासा कृपया प्रशासनाने द्यावा.

**जयंत पाटील :-**

आपल्याच विषयाला धरून मी आहे. तुमच्या अगोदर मी हा विषय विचारला होता. त्याच्यानंतर सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी हा विषय विचारला आणि उत्तर आम्हाला महापौर मॅडमकडून पाहिजे होते किंवा अधिकाऱ्याकडून पाहिजे होते त्याचे उत्तर आमचे सन्मा. नगरसेवक लिओ कोलासो यांनी दिले.

**लिओ कोलासो :-**

मी उत्तर दिलेले नाही माझ्या पध्दतीने खुलासा केलेला आहे.

**जयंत पाटील :-**

आता या ठिकाणी क्र. २ आणि ३ उत्तन येथे सिमेंटची जलवाहिनी बदलून नवीन बीडाची जलवाहिनी टाकणे ३६ लाख आणि उत्तन येथे मुख्य वितरण जलवाहिनी बदलून नवीन बीडाची जलवाहिनी टाकणे दोन्ही उत्तनचे आहेत. याच्यामध्ये कसलेही डायमेंन्शन नाही. किती व्यासाची आपण जलवाहिनी टाकणार आहोत ते तीन साडे तीन करोडची जेव्हा आम्ही मान्यता देतो तेव्हा या सभागृहातील सर्व नगरसेवकांना त्याची संपूर्ण असणे आवश्यक आहे आणि ती माहिती देणे गरजेचे आहे कारण. आम्ही माहिती देतो. आम्हाला माहिती घेण्याचा अधिकार आहे. मग ते प्रशासनाने केले असेल तांत्रिक मेजरमेंन्ट झालेले असेल ही माहिती कोणीही नगरसेवक आम्हाला देत असतील अर्थात त्यांनी केलेला खुलासा असेल पण तो खुलासा आम्हाला पटलेला नाही. किती व्यासाची जलवाहिनी आपण टाकणार आहात त्यातील किती लोकांना पाणी मिळणार आहे किती कनेक्शन त्याच्यावर ट्रान्सफर होणार आहेत? किती कनेक्शन त्याच्यावर घेतले जातील? आणि एका फुटामागे त्याची किंमत किती असेल? ही जर माहिती आम्हाला मिळत नसेल? तर तीन साडेतीन करोडला मान्यता देताना आम्हाला ह्याचा विचार करावा लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम विषय क्र. ६ याच्यावर प्रकरण क्र४० चा (६) शिवार गार्डन ते उड्डाणपुलापर्यंत जलवाहिनी टाकणे सिमेंटची पाईप लाईन आपण बदलता, सी. आय. ची बदलता की एस. एस. ची बदलता?

**दशोरे :-**

शिवार गार्डन ते उड्डाणपुलापर्यंत तिथे मुख्य लाईन आहे. चारशे, साडेचारशे आणि तीनशेची मग तिथे झोनचा प्रोबलेम होती त्यासाठी आपण पॅरेलल लाईन व्यवस्थित झोन होण्यासाठी टाकत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण सभागृहाला हे उत्तर देत आहात ही जी पाईप लाईन आहे ही सिमेंटची आहे का? की एम.एस. ची आहे.

**दशोरे :-**

बीडाची लाईन आहे आणि ती सी. आय लाईन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बीडाची लाईन बदलली का नवीन टाकली. नाही नवीन टाकायची आहे. ती टाकुन तुम्ही काय करणार?

**दशोरे :-**

झोनींगसाठी समांतर लाईन टाकणार आणि आता मेन लाईन कनेक्शन आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

पुन्हा एकदा विचारतो सिमेंटची पाईप लाईन बदलून आपण दुसरी टाकणार आहात का?

**दशोरे :-**

नाही बदलून दुसरी टाकणार नाही समांतर नवीन लाईन टाकणार.

**मिलन म्हात्रे :-**

बीडाची लाईन आपण बदलणार.

**दशोरे :-**

बदलणार नाही. आपण नवीनच लाईन तिथे टाकणार.

**मिलन म्हात्रे :-**

वर तूम्ही ठरावामध्ये म्हटलेले आहे. पाईप लाईन बदलायच्या आहेत गोषवाऱ्यामध्ये. मला एक खुलासा करा मी कुठलाही आपल्यावर आरोप करित नाही. तिकडे एक्झेस्टींग पाईप लाईन आहे का?

**दशोरे :-**

बदलणार नाही तर आपण समांतर लाईन टाकणार आहे दोनशेची.

**मिलन म्हात्रे :-**

तर ती लाईन डिसकनेक्ट करणार आहात.

**दशोरे :-**

ती लाईन ठेवणार आहे. आणि दोनशेची समांतर लाईन टाकणार आहे. ती डिस्ट्रीब्युशन साठी वापरणार आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

ती पाईप लाईन तुम्ही नव्याने टाकणार आहात.

**दशोरे :-**

हो दोनशेची नव्याने टाकणार.

**मिलन म्हात्रे :-**

ठरावात नव्याने असा उल्लेख आहे का? नव्याने हा कुठेही उल्लेख केलेला नाही आणि दुसरी गोष्ट पाईप लाईन आज येतो. हे पुर्ण झालेले आहे की व्हायचे आहे का नव्याने सुरुवात व्हायची आहे.

**दशोरे :-**

नव्याने सुरुवात व्हायची आहे अजून याच्यावर काही झालेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आझाद नगरकडे तो मोठा पाईप काढून ठेवला आहे. तो कुठचा आहे? तो ६१० चा आहे. एम.एस. चा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग याच्यामध्ये नव्यनेचा उल्लेखा नाही? हे काम नवीन करता आहात ना? मग त्याचा उल्लेख आपण का केला नाही आम्ही तुम्हाला दुरूस्ती आणि रिपेरिंगला मंजूरी देणार आणिरिप्लेसमेंट करणार ना नवीन कामाला आम्ही मंजूरी देणार नाही. तुमचा गोषवाराच तसा बोलतो आहे.

**दशोरे :-**

शहराच्य पाणीपुरवठ्यात वाढ झाली असून ज्या विभागात जलवाहिन्या नाहीत त्या विभागात जलवाहिन्या टाकणे गरजेचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जलवाहिन्या टाकणे गरजेचे आहे. नवीन जुन्या, बदल वैगरे काही त्यामध्ये पाहिजे ना नवीन त्यामध्ये टाका तुम्ही तसे म्हणत ना की या विभागात नवीन पाईप लाईन टाकतो.

**शशिकांत भोईर :-**

मी आताच प्रशासनाला प्रश्न विचारला होता की मी जे पत्र दिलेले होते त्याचे उत्तर मिळाले नाही तर आपण आता जी मंजुरी देत आहोत. ती तांत्रिक मंजुरी झालेली आहे का? त्याचे नकाशे केलेले आहेत का? याची जरा मला माहिती द्यावी कारण पत्राचे उत्तर दिलेले नाही कृपया सभागृहाला माहिती दिली तर बरे होईल.

**दशोरे :-**

डिटल एस्टिमेट झालेले आहेत त्यावर मुख्य लेखापरिक्षा मुख्यलेखाधिकारी यांची सही होऊन आयुक्तांची सही घेऊनच हे प्रपोजल या ठिकाणी आपण आलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

दशोरे साहेबांना विनंती आहे की, माझ्यापत्राचे उत्तर तुम्ही का दिलेले नाही? तुमचे सर्व नकाशे मंजूर होते तुमच्या लेखापरिक्षकांनी तुमचा अहवाल दिलेला होता.

**दशोरे :-**

आपल्याला तीन दिवसात देण्यात येईल.

**शशिकांत भोईर :-**

आता २२/८/०३ रोजी पत्र दिलेले आहे. आणखी तीन दिवस म्हणजे आपल्या प्रशासनाचा कारभार कसा चालू आहे. आज दोन महिने झाले. तुम्ही पत्राचे उत्तर देऊ शकत नाही. मग तुम्ही लोकांना पाणी तरी कसे देणार? आणि आपण झोपडपट्टींना स्वतंत्र कनेक्शन देणार आहोत. कोणत्या परिस्थितीमध्ये आपण तसे देऊ?

**मा. उपआयुक्त सो. (कल्याण केळकर) :-**

दशोरे साहेब यानंतर प्रत्येक सभागृहामध्ये विषय येताना जी पाईप लाईन टाकणार ती किती व्यासाची आहे? त्यापासून किती लोकांना पाणीपुरवठ्याचा लाभ होणार आहे? या संबंधीची माहीती सभागृहासमोर ठेवावी आणि आताच सन्मा. सदस्य शशिकांत भोईर आणि सन्मा. सदस्य जयंत पाटील यानी आपल्याला विचारले की आपण सर्व या ठिकाणी जलवाहिनी टाकणे आहे असे बोलता तर याच्यामध्ये किती व्यासाची पाईप लाईन टाकायची आहे याचा यामध्ये कुठेही उल्लेख नाही. याचा आपण सभागृहाला आपण खुलासा करावा. कोणत्या भागामध्ये किती व्यासाची पाईप लाईन टाकणार आणि त्यापासून किती लोकांना लाभ होणार आहे.एवढी माहिती आम्हाला द्या.

**शशिकांत भोईर :-**

मा. उपायुक्तांना विनंती आहे की, माझ्या पत्राचे उत्तर आज पर्यंत का दिले गेले नाही याचा जरा मला खुलासा करावा तुमचे नकाशे, मंजूर होते तांत्रिक मंजूरी झालेली होती. मध्यंतरी सार्वजनिक स्टँडपोस्ट ताबडतोब कापले गेले त्याचीही माहिती विचारलेली कुणी आदेश दिले त्याचा देखील खुलासा केला नाही की प्रशासन असेच चालेल की आम्ही पत्र द्यायचे आणि तुमचे उत्तर येणारच नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर आपल्याला दशोरेजींनी सांगितल की पत्राचे उत्तर दिले जाईल.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, या अगोदर मी त्यांना पंधरा दिवसापुर्वी भेटलो होतो तेव्हा तीन दिवसात उत्तर देतो असे बोलले होते.

**मिलन म्हात्रे :-**

कुठल्याही सभासदाच्या पत्राचे उत्तर मिळत नाही. ही परिस्थिती फार चुकीची आहे कुठेतरी प्रशासनामध्ये बदल आणा. सन्मा. सदस्यांनी कधी पत्र दिल. त्यावर टाईम ऑफ परियड द्या ए आठवड्यामध्ये फूलफील करा आमच्यासुध्दा पत्रांनी काही उत्तर नाही आणी जी उत्तरे दिली जातात त्याच्यामध्ये चुकीची माहिती असते.

**मुक्ता रांजणकर :-**

आम्हाला सांगितले तीन दिवसात आम्ही उत्तरे देतो. आमच्या पत्रांना इथे तीन तीन महिने उत्तरे दिलेली नाहीत कूठलेही अधिकारी इकडे बसलेले असतील तर त्यांनी आमच्या पत्रांना कधीच उत्तरे दिलेली नाहीत अशी काही तरतुद आहे का नाही? की सदस्यांनी एकदा पत्र लिहिल्यानंतर त्याची उत्तरे दिली जातील की नाही?

**शुभांगी नाईक :-**

ज्यावेळी पत्र दिले जाते आम्हाला उत्तर द्या ताबडतोब असे सांगितले जाते त्यावेळी अधिकारी सहा सहा दिवस आमच्याकडे पत्र येत नाही. आम्ही तुम्हाला उत्तरे कोणत्या हिशोबाने देणार ते पण लिहून द्या कारण ह्या लोकांचे मी ज्या ज्यावेळी पत्र टाकते आणि सांगते की आम्हाला हिशोब द्या आणि सांगा की कुठचे काम चालु आहे? लेखी स्वरूपात द्या. प्रत्येक अधिकाऱ्याने आमच्याकडे दुर्लक्ष केले आहे. आम्हाला उत्तर देत नाहीत.

**मुक्ता रांजणकर :-**

सदस्याच्या पत्राची उत्तरे मिळावी अशी तरतूद कायद्यामध्ये आहे का? आणि असल्यास सचिवांनी ती महासभेपुढे वाचुन दाखववी.

**शशिकांत भोईर :-**

माझी महापौरांना विनंती आहे की कृपया प्रशासन आपल्याशी काहीतरी हलगर्जीपणा करीत आहे. आणि याला जबाबदार आपण राहणार आहोत. कोणतेही आपण मंजूरी करताना ते आपल्यावर बोटे दाखवतील की तुम्हीच मंजूरी दिलेली आहे आणि तुम्हीच बघा. ते लोक सह्या करतील आणि निघून जातील आणि बदली त्यांची दुसऱ्या ठिकाणी होईल त्यांना काहीही होणार नाही. फक्त नागरिकांना आपण कोणत्याही परिस्थितीत तोंड देऊ शकणार नाही. त्यांना तीन वर्षानंतर जायचे आहे. कारण आपल्या अधिकाऱ्यामध्ये लिहिलेले आहे की त्यांची बदली तीन वर्षानंतर होईल. जी मंजूरी आपण देणार आहोत त्याचे नकाशे तयार करा नसतील केले तर आता करा. तांत्रिक मंजूरी घ्या त्यानंतर मंजूरी द्या.

**लिओ कोलासो :-**

मी आपल्या निदर्शनास आणू इच्छीतो की या शहरासाठी प्रचंड अशी मोठी पाणीपुरवठा योजना मंजूर झाली. त्या योजनेचे ९८ टक्के काम मिरा भाईंदर शहरी भागात पुर्ण झालेले आहे. आपल्याला ३५-३६ एम.एल.डी वरून ६८ एम.एल.डी पाणी येत आहे आणि एवढी परिस्थिती असताना केवळ एकुण बजेटच्या दोन अडीच टक्के फक्त पाणीपुरवठा योजनेच्या निधीमधील जी काही कामे आहेत आपल्याला या कामाच्या नियोजनाबद्दल अर्थशास्त्राबद्दल काही शंका असतील तर आमची आजदेखील त्या भागाची तयारी आहे. अशी तयारी आहे की हा विषय आणखी चार महिने तुम्ही पेडींग ठेवा स्वतः या स्वतः मेजरमेंट घ्या आणि स्वतः मेजरमेंट घेऊन पुन्हा एस्टिमेट तयार करून पुन्हा या सभागृहापुढे या त्याला आमची तयारी आहे परंतू केवळ तुमच्या पत्राला उत्तर मिळाले नाही तुमच्या भागात सर्वकाही ठिक आहे चालले असताना १९९० पासून त्या भागाला पाणीपुरवठ्यामध्ये आपण सतत दुजाभाव दाखवत आला आहात. १९९० पासून त्या भागामध्ये पाण्याचे एक इंचाचे देखील कनेक्शन दिले गेले नाही. १९९० पासून त्या भागात पाणीपुरवठ्यामध्ये अर्धा किंवा पाव एम.एल.डी ने देखील वाढ केलेली

नाही तिकडे जी एक्झीस्टिंग जुनी योजना होती त्या योजने मधून लोकांना २४ तास ते २८ तासामध्ये पाणी मिळत होते म्हणून ही सर्व परिस्थिती विचारात घेता आपण असा आग्रह धरणे योग्य होणार नाही त्या भागाच्यावतीने मी आपणास विनंती करतो त्या भागातील लोकांनी भाईंदरच्या पाणीपुरवठ्याच्या सगळ्या आंदोलनामध्ये सक्रियपणे भाग घेतला आहे ही सगळे परीस्थिती विचारात घेता आपण केवळ खात्याने आणलेले आहे. घाईने असे बोलून त्यापेक्षा आपण स्वतः सक्षम पाहणी करा त्याबद्दलची काही डिटेल्स लागत असतील तर तपासून घ्या परंतू हा विषय स्थगीत ठेवू नका अशी मी आपणाला विनंती करतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांमध्ये परवानगीने बोलतो. दोन विषय एकत्र करून चालेले आहेत उत्तनच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने हा जो जलवाहिनीचा प्रस्ताव आलेला आहे अधिकाऱ्यांच्या कर्तेपणा, नाकर्तेपणा किंवा अधिकारी सर्वांना समजून घेतात. त्यांना त्यांची कदर वाटत नाही त्यामुळे सभागृहाला वेळ जातो एक तर हा जो प्रस्ताव आहे.ज्या ज्या ठिकाणी पाईप लाईन टाकणे आहे. त्या पाईप लाईन टाकण्याला ही सभा एकमताने मंजूरी देत आहे. अशा पध्दतीचा प्रस्ताव व्हायला पाहिजे. हा कुठेही पेंडींग राहता कामा नये त्या प्रभागामध्ये पाणी गेले पाहिजे. हे पाणी नेते वेळी त्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट लिहायला पाहिजे होते मघाशी बोलले की पाईप लाईन बंद करणार आहात. ती पाईप लाईन बंद करून नवीन पाईप लाईन टाकायची आहे खरोखरच असा नियम आहे का? की सी.सी. पाईप लाईन खरोखरच बंद करायची आहे सी. सी पाईप लाईन बेद करण्याचा कुठेही नियम नाही सिमेटच्या पाईप लाईन चालू राहतील त्या पाईप लाईनमध्ये ज्या ज्या ठिकाणी प्रेशर मिळत नाही. त्याला मेन रायडर म्हणून मोठ्या पाईप लाईन टाकायच्या आहेत आणि त्या जोडायच्या आहेत. आता मगासपासून याच्या आधी हा विषय आला होता की अधिकारी एकतर्फे कोणती लाईन बंद करायचा निर्णय घेतात आणि त्या सोसायटीच्या लोकांना किंवा त्या प्रभागातील लोकांना वेठीस धरतात आणि मग तो चार पाच हजाराचा रेट लावतात. स्थायी समितीच्या अध्यक्षांनी तो चांगला निर्णय घेतला की पाचशे रुपये पण त्याही ठिकाणी पाचशे रूपये किंवा तो रस्ता तोडणे खरोखर आवश्यक आहे का? याच्यावर त्या एक्झिक्युटिव्हंचे मत असले पाहिजे. मी त्यावेळी तीन ठिकाणी सांगितले होते की कास्ट लाईन आहेत त्या लाईन तुम्ही बंद केल्या कास्ट लाईन कुठेही बंद करण्याची गरज नाही ज्या ठिकाणी सी. सी.लाईन आहेत आणि पाच फुट खोल आहेत. त्या ठिकाणी ही बंद करणे ते योग्य आहे व नवीन कनेक्शन जोडणे किंवा त्यातून होणारे लिकेज हे मिळत नाही म्हणून आताचा जो ठराव आहे की उत्तन साठी म्हणून डोंगरी मोर्वाच्या पलिकडील लोकांना किंवा काशीच्या भागातील ज्या लाईन आहेत आज पर्यंत महापालिकेमध्ये पाणीपुरवठ्याचा कोणताही प्रस्ताव कोणीही विरोध करून नाकारलेला नाही त्यामुळे हा पोस्टपोन करा मागे ठेवा पुढे ठेवा हा विषय नाही आणि कामकाजाची देखील शहाहनशा आहे. जसे आता सगळे नगरसेवक ज्या गोष्टी विचारतात ते अधिकाऱ्यांनी त्यांना नीट उत्तर द्यायला पाहिजे समाधान करायला पाहिजे एवढी जी बारा प्रपोजल होती त्या बारा प्रपोजलच्या त्यांच्या बारा नोटस सेपरेट पाहिजे होत्या या ठिकाणी ही जी पाईप लाईन बदलायची आहे. इतक्या इंचाची टाकायची आहे त्याची लांबी एवढी आहे. त्याच्यावर उपभोक्ते एवढे आहेत. असे काही न करता पाईप लाईन टाकणे ह्या ज्या दोन्ही, तिन्ही गोष्टी आहेत. आता सभागृहात चालले आहे ते सर्व ठिकाणी चालले आहे. त्याच्यासाठी खरोखरच हे प्रभारी कार्यकारी अधिकारी आहेत त्यांना आहे तेवढी साडे तीन कोटींची परवानगी द्यायची प्रायोरिटी आहे किंवा नाही किंवा ते शहर अभियंत्याचे नाही हा वाद न करता या कामाला तुम्ही मंजूरी द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो आणि आपले जे प्रश्न आहेत ज्या ज्या पध्दतीने ज्याने ज्याने विचारले अधिकाऱ्याना धारेवर धरले की नाही त्यांना काय वाटत असेल तर फरक काय पडणार आहे अशी स्थिती निर्माण होत चालली आहे महापौर मॅडम आमची तुम्हाला सभागृहाला विनंती आहे की ज्या पध्दतीने कामकाज चालले आहे ते सभाशास्त्राला धरून होत नाही आणि अधिकाऱ्यांपुढे आपण आणखी मोकळीक देत चालले आहोत हे सगळे सभासद जाऊन बाहेर बोलतात काही खरे नाही सगळे बिघडलेले आहे म्हणजेच आपलीच आपण बदनामी करत राहतो त्यापेक्षा याला अत्यंत चिंतन करून अधिकाऱ्यांना सुचना द्याव्यात जे जे प्रस्ताव येतील त्याची योग्य ती टिपणी आल्याशिवाय तुमच्या आता लक्षात आले असेल आयुक्त साहेब आता नाही आहेत आयुक्त साहेबांनी सांगितले की हे सर्व महापौरांचे अधिकार आहेत. कशासाठी महापौरांनी बदनाम व्हायचे तुम्ही विचारात नसतील तर तुमचा स्वभाव वेगळा आहे. पण जें आलेले प्रस्ताव प्रशासकीय व्यवस्थित आहेत कायद्यात बसणारे आहेत ही प्रशासनाची जबाबदारी तूम्ही त्यांच्याकडून बजावून घ्या. आवश्यक त्या ठिकाणी तुमच्यासाठी पक्षामध्ये आवश्यक मान्यवर जे सदस्य आहेत. त्यांचा सल्ला घ्या. पण हे असे उगाच होत आहे. आणि शहराची

बदनामी होते असे करू नका पुन्हा या प्रस्तावाला आणखी कुणाच्या शंका कुशंका असतील त्या विचारून प्रस्ताव मागे ढकलू नका. जसा असेल तसा मंजुर करा.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम या ठिकाणी कार्यवाही अभियंता दशोरे साहेब यांनी समाधानकारक उत्तर न दिल्याने काहिसा गोंधळ निर्माण झालेला आहे माझ्यासोबत बरेचसे सदस्य मागच्या सभागृहात काम केलेले सदस्य आहेत माझ्या आठवणीप्रमाणे एकही विषय असा आलेला नाही की ज्या पध्दतीने आजच्या सभेवर हा विषय आहे. अशा प्रकारे विषय मागेदेखील येऊन गेलेले आहेत. त्यावेळेला कोणी कधी किती पाईप लाईन खोल आहे, किती व्यासाची आहे. बदलण्याची आवश्यक्ता आहे का? कधी कुणी प्रश्न विचारला नाही प्रश्न साहेब आमच्या भागाचा महापौर मॅडम गेल्या १९९३ पासून ऑक्टोबरमध्ये मागच्या बॉडीमध्ये ठराव केलेला त्या ठरावापासून आजपर्यंत एकही नळ कनेक्शन अनधिकृतपणे डोंगरी, उत्तन मध्ये लावलेले नाही कारण आम्ही मताशी प्रामाणिक होतो. शहरामध्ये शेकडो हजारे अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत केले गेले आजचा हा जो विषय आहे आमच्या भागाकडून जवळ जवळ १५०० ते १८०० अर्ज नवीन नळ कनेक्शनसाठी आजही पेंडींग आहेत शहरामध्ये गेल्या वर्षभरात हजारो नवीन नळ कनेक्शन लावले गेले आमच्या परिसरामध्ये एकही कनेक्शन लावले गेले नाही. कामाची क्रायटेरीया बघा त्याचे इम्पोर्टंट बघत मी तुम्हाला अजिबात दोष देणार नाही परंतु ज्या पध्दतीने हा विषय या ठिकाणी हाताळला गेला आहे त्याचेच दुःख वाटते कारण अशाप्रकारचे विषय मागच्या सभागृहामध्ये शेकडोंच्या संख्येने निघुन गेलेले आहेत त्या वेळेला कधी कुणही ओब्जेक्शन घेतले नाही प्रश्न ओब्जेक्शन नाही थोडीसी अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे दिले गेले नाही म्हणन ही गफलत झालेली आहे. दशोरे साहेब प्रत्येक ठराव किंवा प्रत्येक विषय आपण घेतो ह्या प्रत्येक कामाची आपण सविस्तर टिपणी बनविता त्यांनंतर ती सन्मा. आयुक्त, उपआयुक्तांकडे जाते त्याच्यावर आपण मंजूरी घेता. नंतर ती इंटरनल ऑडीटरकडे जाते मला वाटत नाही लाखोंच्या संख्येने ही ती कामे आहेत आपल्या सविस्तर टिपणीशिवाय ही कामे सभागृहासमोर येऊ शकतील. तरी तुमच्या जवळ आजही माहिती असेल तर ती सभागृहाला द्यावी. या शिवाय मी सांगतो की सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांनी जो विषय काढला. आजही जर सभागृहाची गफलत होत असेल आजही आम्ही तयार आहोत हा विषय एक महिना पुढे ठेवा कारण एवढी वर्ष आम्ही थांबलो अजून एक महिना थांबण्यास आमची हरकत नाही. तरी आपल्याकडे जरी टिपणीची माहिती असेल तर आपण सभागृहापुढे सादर करावी.

**मिलन म्हात्रे :-**

उत्तन विभागातील कामे हा ठराव पेंडींग ठेवल्याने थांबविली जातात असे जे सांगितले जाते. प्रश्न कुठलाही आमचा आकसाचा नाही आहे. कुठल्या सभागृहाचा मी पहिल्यांदा उठल्याबरोबर बोलले की हे काम थांबवा असे मी नाही म्हणत कृपा करून असा संभ्रम जरा पसरवू नका आपण आणि आपण जे दरवेळेला बोलतात की आमच्याकडे कनेक्शन लागलेली नाहीत. मेहरबानी करून ह्या सभागृहामध्ये मी सांगतो आपण असे बोलताना लेखी स्वरुपाचे चार ओळीचे पत्र मा. आयुक्तांनी मा. महापौरांना द्या. आमच्या विभागामध्ये चोरीचे नळ कनेक्शन एकही लागलेले नाही त्यानंतर तिकडच्या कनेक्शनची माहिती देण्याची जबाबदारी माझी आहे. उगीच काहीतरी पसरावयाचे का?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे तुमच्य जवळ जर माहिती असेल तर तुम्हीच सादर करा.

**मिलन म्हात्रे :-**

नाही तुम्ही द्यावी अगोदर माहिती आणि मग कुठच्या हिशोबाने सांगता की आमच्या विभागात एकही कनेक्शन लागलेले नाही त्याबाबत तुम्ही लेखी द्यावे. तुम्ही हमी घेऊ नका.

**हॅरल बोर्जीस :-**

आमच्या माहितीप्रमाणे लागलेले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य बोर्जीस साहेब उत्तर दिलेले आहे की गावठण मध्ये १०४ इनलिगल कनेक्शन हे प्रशासनाचे उत्तर माझ्याकडे आहे. १०४ कनेक्शन गावठण भागामध्ये असे अधिकृत आहे.

**लिओ कोलासो :-**

गावठण म्हणजे कुठले आहे. आपण व्यवस्थित नाव घेऊन सांगावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

भाईंदर पश्चिम.

**लिओ कोलासो :-**

या शहरामध्यें किती बेकायदेशीर कनेक्शन आहेत सर्व शिवमुर्ती नाईक साहेबांनी सांगितले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

या विषयपत्रिकेमध्ये फक्त पाच तुमच्या उत्तन भागाची आहेत आणि सहा बाकीच्या विभागाचे आहेत आम्ही हे म्हणत नाही की हे पेंडींग ठेवा रितसर ठराव आणा आणि आम्ही दुसऱ्या सभेत तुम्हाला मंजूरी देतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

महापौरांच्य परवानगीने बोलतो संपूर्ण भाईंदरमध्ये असे किती अनधिकृत नळ कनेक्शन आहेत तिथे पण तुम्ही पाईप लाईन टाकल्या आता धातुरमातुर करणे पुढे करून उत्तनचे हे काम तुम्ही पुढे का ढकलता हेच मला कळत नाही. उत्तनचे काय असे पाप केले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

या विषयपत्रिकेवर पाच विषय फक्त उत्तनचे आहेत आणि सहा विषय अन्य भागातील आहेत. आणि सारखाच निर्णय अन्य भागाला पण आहे.

**मोहन पाटील :-**

महापौर मॅडम सदर विषय मंजूर झालेला आहे ठराव पारीत केलेला आहे. अवलोकन झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

चर्चा होण्या अगोदरच मंजूर कसा करता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठराव झाला म्हणजे बोलायचे असे आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

ठरावात नवीन लिहिलेले नाही आणि तुम्ही मंजूर करून टाकताना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सर्वांना शुध्द पाणी मिळाले पाहिजें असेच आमचे मत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम आमची एकच विनंती आहे ठराव यापुर्वी आणताना गोषवारा व्यवस्थित द्यावा. आमच्या काही विरोध नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर मॅडम एक गोष्ट नक्की झालेली आहे. प्रतिनियुक्तीवर जें अधिकारी आलेले आहेत त्यांना या शहराचा विकास करायचा आहे की वाटोळे करायचे आहे. हे नक्की आहे प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्यांनी या शहराचा विकास करायचा नाही आहे. फक्त कसाही सभागृहामध्ये विषय आणा आणि ठेकेदाराला ठेके द्या आणि काय काम होते काय नाही? याची चिंता त्यांना काहीच नाही. आता अनेक नगरसेवकांनी विषय काढला आमच्या पत्राचे उत्तर दिलेले नाही. मी स्वतः १४/०८/२००३ ला पत्र दिलेले आहे. नगरपालिकेच्या काळामध्ये ८ कोटीची अंर्तगत लाईन ज्या ठिकाणी लाईन टाकली गेली नाही त्या ठिकाणी लाईन टाकण्याचे काम या सभागृहामध्ये मंजूर केले. ८ कोटीची मंजूरी दिल्यानंतर अनेक विषय स्थायी समितीमध्ये आले इकडे पाईप लाईन टाकायची तिकडे टाकायची मी प्रोसिडींग वाचलेली आहे. स्थायी समितीत त्यामध्ये सन्मा. नगरसेवकांनी विचारलेले आहे तुम्ही रोज रोज पाईप लाईनची आमच्याकडून मंजूरी घेतात. कुठे टाकतात ती प्रत्यक्ष जागा आम्हाला दाखवा. नाहीतर कल्याण आणि ठाण्याला ते चालले आहेत नंदलाल रिपोर्ट आणि ते रिपोर्ट आम्हाला कुठे ठेवू नका. पण अधिकारी ते करत नाही या सभागृहामध्ये ऐकतात आणि सोडून देतात महापौर मॅडम आज बारा जलवाहिन्या टाकण्याचा विषय आहे. १५०० ते २००० कनेक्शनची मागणी कुठल्या भागात किती आहे? कोणी पाणी देण्याचा या सभागृहामध्ये नकार करत नाही पाणी आलेले आहे. यापूर्वी या सभागृहात विषय आला झोपडपट्टीना स्वतंत्र नळ कनेक्शन देण्याचा कशी टिपणी दिली.

**(सभागृहात गोंधळ)**

**महेंद्रसिंग चौहान :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल हे सभागृहाचा वेळ उगाच वाया घालवतात.

**शिवप्रकाश भुदेका :-**

जब भी सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी बोलते है आप बिचमे बोलने के लिए खडे हो जाते है।

**(सभागृहात गोंधळ)**

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे म्हणे एवढेच आहे की जे प्रतिनियुक्तीवर अधिकारी येतात.

**शिवमुर्ती नाईक :-**

महापौर मॅडम सरसकट सर्वांना एकाच माळेत मोडणं बरोबर दिसणार नाही. नावानिशी त्यांनी टिका करावी नाहीतर तुम्ही आम्हांला परत पाठवायचा ठराव करा. आम्हाला शासनाने पाठविलेले आहे आम्ही वठेबिगारी नाही आहोत आम्ही जर नको असतील आणि ज्या दिवशी ठराव होईल त्याच्य दुसऱ्या दिवसापासून आम्ही येणार नाही सरसकट सर्वांना बोलणे हे संयुक्तीक ठरणार नाही. व्यक्तीशः ज्यांचे ज्यांचे काम आहे त्यांनी बोलावे. तुम्ही आजपासून म्हणा की नाईक साहेब तुम्ही येऊ नका तर आम्ही येणार नाही शासनाने आम्हाला पाठविलेले आहे म्हणून आम्ही डेप्युटेशनवर आलो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब आपण जें बोलतात हा पाण्याचा विषय चाललेला आहे आणि तो पाण्याचा अधिकाऱ्यावर चाललेला आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

इनको बोलणे का अधिकार नही कृपया उनको बिठाईये.

**जेन्वी अल्मेडा :-**

मां. महापौर चा अपमान चाललेला आहे. मा. महापौरांनी तुम्हाला बसायला सांगितले तरी आपण बसावे. मा. महापौर रूलिंग देतील.आमचे सर्व सदस्य बसलेले आहेत आपणसुध्दा बसावे.

**(सभागृहात गोंधळ)**

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर से विनंती करता हुँ की आप सब सदस्य को बिठाईये ऐसे झगडा करनेसे कुछ नही होगा अपने को शहर का विकास का काम करने का है।

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब या ठिकाणी मला वाटते पाण्याच्या विषयावर अत्यंत ज्वलंत अशी चर्चा या ठिकाणी झालेली आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

आज सभा होण्यापूर्वी मा. महापौर मॅडमनी सुचना दिलेली होती की सभागृहाची शिस्त पाळावी आणि सभा चालवावी.

**रतन पाटील :-**

हा विंषय पुढे ढकलून टाका पुढच्य मिर्आीगला घ्या.

**हॅरल बोर्जीस :-**

विषय कशाला पुढे ढकला.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हा विषय जसा आहे तसा मंजूर करा.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, सभागृहातील वातावरण निरर्थक वेगळ्या तऱ्हेने चालले आहे एका अधिकाऱ्याला वाचविण्यासाठी एवढा गोंधळ झालेला. कधीही पाहिला नाही. मागच्या सभेत सन्मा. नगरसेवक प्रफुल्ल पाटील यांनी चपलेने मारायचा उल्लेख केला होता आणि खरोखर या दृष्टीनेच व्हायला पाहीजे. चपलेने मारणे हा सभागृहाचा विषय घेऊच शकत नाही परंतु त्यांच्या रागाचा आविष्कार आपण त्या वेळेस पाहिला तर त्यांची भुमिका चुकीची होती असे वाटत नाही कारण एवढ्या गोधळाच्या अशा वाईट टिपण्या या लोकांनी दिलेल्या आहेत कुठल्या तऱ्हेची माहिती न देता दिलेल्या आहेत आणि त्यांच्या चुकीचे समर्थन सभागृहातील काही जेष्ठ नगरसेवक करीत आहेत. कदाचीत या सभागृहामध्ये ५६ टक्के नगरसेवक नवीन निवडून आलेले आहेत. आणि ४४ टक्के नगरसेवक जुने आहेत. ५६ टक्के नगरसेवकांपैकी किती लोकांना हा विषय कळतो मला माहित नाही. परंतु अतिशय जेष्ठ नगरसेवक असेलेले काही सभासद यांना वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत. आमचे त्याबद्दल दुमत नाही आणि इथे आलेल्या बारा विषयापैकी फक्त सहा विषय उत्तनचे आहेत आणि बाकीचे विषय

भाईंदर पुर्वचे आहेत म्हणजे अर्धे विषय भाईंदरमधील आहे. तेव्हा उत्तन विरोधी झगडतो आहे अशातील भाग नाही. साडेतीन करोडमधील जवळजवळ दिड करोडच्यावर हे भाईंदर पुर्वचे विषय आहेत आम्ही सर्व विषयासंबंधी बोलतो या विषयाची टिपणी देऊ नये असे आपले मत आहे का? त्यांनी द्यायला पाहिजे आणि सभागृह व महापौरांचे मत आहे त्यांनी संपुर्ण माहिती द्यायला पाहिजे. उत्तनला पाईप लाईन टाकु नये असे आमचे मत नाही आम्ही तर असे म्हणतो की मिरा भाईंदर शहरातील ७ लाख लोकसंख्येतील प्रत्येक नागरिकाला पाणी मिळणे हे गरजेचे आहे आज उत्तन मधील आपण जो विषय काढता किंवा भाईदर (पुर्व) मधील अनेक इमारतींना पाणी नाही आज देखील ते टँकरचे पाणी पित आहे परंतु आपण तो विषय घेत नाही आपण फक्त उत्तन पाहता आम्ही उत्तन बघत नाही आणि उत्तन आमचेच आहे. उत्तनचे मासे आम्ही आवडीने खातो. तेव्हा आमचे उत्तनबद्दल काहीही वाईट मत नाही आमचा अजिबात विरोध नाही पाईप लाईन आज टाकायला सुरूवात करावी परंतु आमची माहिती अशी की साडे तीन करोडचा आपण जेव्हा मंजूरी देतो तेव्हा त्या विषयाचे संपूर्ण माहिती सभागृहाला असणे गरजेचे आहे या मताशी आपण वेगळे असाल असे मला वाटत नाही परंतु त्यांनी कूठल्याही तऱ्हेची माहिती दिलेली नाही. उत्तनमधील मी दोन विषय दाखविले २ नंबर, ३ नंबर आणि उत्तनचे आहेत आणि त्यांनी फक्त उत्तनच लिहिलेले आहे पण किती डायमेन्शनचे पाईप लाईन टाकणार आहात? ते त्यांनी लिहायला पाहिजे त्यांची चुक आहे ती त्यांचे तुम्ही समर्थन करू नका. आपण एकच आहोत गेली अनेक वर्षे आपण सभागृहात आहोत. पुढे ही कदाचीत राहणार आहोत. तेव्हा आमचे उत्तनबद्दल वाईट मत नाही. असायचे कारण नाही ती जनता आमचीच आहे मिरा भाईंदर महानगरपालिकेची जनता आहे. मघाशी सांगितलें विषय वोटींगला टाकावा. तो ही प्रकार नाही आम्ही विषयाला विरोधात नाही. अधिकाऱ्यांनी केलेल्या चुकांच्या विरोधी आहेत. तेव्हा कृपया गैरसमज होऊ नये.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो असे विषय पहिल्या सुध्दा सभेत आले होते तेव्हा आपण असे पुढे ढकलले नव्हते. सन्मा. सदस्यांनी ज्या काही सुचना केल्या आहेत त्या सुचना आपण स्विकाराव्या पण हा पाण्याचा ज्वलंत विषय असल्यामुळे तो आहे तसा पास करावा असे मला वाटते सभागृहाचे ह्यांची नोंद घेऊन ह्या विषयाला मंजूरी द्यावी.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम मला मागील सभेचे शेवटचे क्षण आठवले माझी अशी इच्छा होती की आज ह्या विषयावर आतिशय शांत चर्चा व्हावी म्हणजे माझ्या तोंडून जे काही शब्द निघाले ते पुन्हा निघू नये परंतु अधिकाऱ्यांच बाबतीत म्हणायचे झाले तर त्यांची तशी तयारीच नसते मुळात सभागृहात भांडण लावायला अधिकारीच कारणीभुत असतात कारण ते वेगवेगळ्या प्रकारची माहिती लोकांना देतात. विषय कुठलाही सभागृहापुढे आणला चर्चेला आणि मंजूरीला तर ती सभागृहाची जबाबदारी ठरते मग त्याला महत्व राहत नाही. की अधिकाऱ्यांनी त्यावेळी माहिती दिली होती ती चुकीची होती की बरोबर होती आम्ही एकदा कुठल्या पाशामध्ये अडकलो कि ते अधिकारी बोलायला मोकळे की हा ठराव बॉर्डाने करून दिलेला आहे त्याचे आम्ही काय करणार असे दशोरे बोलणार मला तीन चार प्रश्न अजून विचारायचे आहेत. कुणाला बोलायचे असेल तर बोलून घ्या. मला फक्त अधिकाऱ्यांना ह्या विषयावर प्रश्न विचारणार आहे त्याचे स्पष्टीकरण ह्या ठिकाणी क्लिअरपणे द्यायचे आहे कारण या विषयाला आपल्याला मंजूरी द्यायची आहे सर्व प्रथम आम्ही तांत्रिक मंजूरी आपण घेतली आहे का असे आपल्याला पत्र पाठवले २२ ऑगस्ट रोजी त्या गोष्टीला आता दीड दोन महिने होत आले हा विषय तिसऱ्यांदा आलेला आहे हा महत्वाचा विषय असताना सभागृहात आला त्याच्या नंतर सभागृह तहकुब झाले. आणि एवढ्या कालावधीत तांत्रिक मंडळ बाबत अधिकाऱ्यांना उत्तर देण्याची दखल वाटली नसेल. पण आमच्या दृष्टीने जसे लिओ सर बोलले की एका पत्राचे उत्तर दिले नाही म्हणून तुम्हाला एवढे करायचे कारण नाही. मला उत्तन बाबत किंवा लिओ सरांबाबत कुठलाही विरोध नाही किंबहूना माझी जी भुमिका आहे जी आता मांडणार आहे त्यानुसार तुम्हाला उत्तनला पाणीसुध्दा मिळेल अश्याप्रकारची असणार आहे पण त्याच्यासाठी असे करता येणार नाही की, एकाचे भले करण्यासाठी दुसऱ्याचे वाईट करा आणि ते कश्याद्वारे चालले आहे ते तुम्ही किंवा मा. महापौर मॅडम नाही करत आहोत ते अधिकारी करत आहेत आणि म्हणून माझा पहिला प्रश्न असा आहे तीन कोटी तेतीस लाखाच्या कामांना मंजूरी देतांना निश्चितपणे ही बाब मोठ्या खर्चाची आहे तेव्हा आपण त्याचे गांभिर्य लक्षात घ्यायला पाहिजें कि तीन कोटी तेतीस लाखाला मघाशी दशोरे यांनी असे स्पष्टीकरण केले की लेखा विभागाने याला मंजूरी दिलेली आहे. मला आता लेखा विभागातील अधिकारी जे आहेत कदाचित ते कॅफो म्हणून काय करतात. त्यांचे नाव काय? आणि त्यांना कशासाठी शासनाने या ठिकाणी पाठवले आहे? त्यांच्या पॉवर्स

काय आहेत? या सभागृहाला सांगितल्यानंतर माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर मला मिळणार आहे. म्हणून मी विनंती करतो की मॅडम या प्रस्तावाला गोषवाऱ्यामध्ये म्हटले आहे त्यांनी कि लेखा विभागाचे त्यांना मंजूरी दिलेली आहे असे दशोरेनी कथन केलेले आहे या ठिकाणी तर त्यांनी या ठिकाणी कशी काय मंजूरी दिली? दिली असेल तर कोणत्या कायद्यान्वये हे पहिल्यांदा त्यांनी स्पष्ट करावे.

**सुधीर नाकाडी :-**

सुरुवातीपासून या महापालिकेमध्ये बायलॉज झालेले नाही कोणी मंजूरी कुठे द्यावी हे पुर्वी तुमच्या एम.एस.सी ॲक्टमध्ये महाराष्ट्र अकाउंट कोड या मध्ये पुर्वी ज्या पध्दतीने बांधकामाने मंजूरी द्यायचे पुर्वी प्रशासकीय मंजूरी घेऊन तांत्रिक मंजूरी दिली जात होती.

**प्रफुल्ल पाटील :-**

स्पष्ट ऐकायला येईल असे बोला पहिले आपले नाव सांगा? क्वालीफिकेशन सांगा? शासनाने आपली कुठल्यापदावर नियुक्त केली ते सांगा आणि प्रत्यक्ष आपण इथे काय काम करता ते सांगा आणि मग माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या.

**सुधीर नाकाडी :-**

मी सुधीर नाकाडी मी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग १ या पदावर महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा ह्या विभागाकडून मुख्यलेखाधिकारी अशी नेमणूक झालेली आहे. सध्या मी मुख्य लेखा परिक्षक या पदावर काम करीत आहे मा. प्रफुल्ल पाटील यांनी जो प्रश्न विचारला आहे त्या प्रश्नाचे उत्तर मी देऊ इच्छितो पुर्वी या महाराष्ट्र अकाउंट कोड ॲक्ट जो आहे त्यामध्ये बांधकामाच्या मंजूरीची कार्यपध्दती होती त्याला प्रशासकीय मंजूरी घेऊन तांत्रिक मंजूरीसाठी पाठविले जात होते परंतू अजूनपर्यंत या महानगरपालिकेने बायलॉज तयार केलेले नाहीत. उपनियम व पोटनियम तयार केलेले नाहीत. त्यामुळे अजून तीच पध्दत तशीच चालू आहे. परंतू आता की परवा स्थायी समितीमध्ये अशा प्रकारच्या तक्रारी आल्या त्यामुळे परत मुख्य शहर अभियंता यांच्याकडे सर्व प्रस्ताव मंजूरीसाठी पाठवावेत असे ती सगळ्यांना सुचित केलेले आहे त्याच्या नंतरची गोष्ट म्हणजे जो एम.एस.सी. ॲक्ट आहे तो नगरपालिका झाल्यानंतर किंवा नगरपालिका अस्तित्वात आल्यावर तो ते जे नगरपालिकेचे नियम आहेत. त्यामुळे महानगरपालिकेने पहिल्यांदा बायलॉज तयार करुन घ्यावेत अशी माझी मा. महापौरांना विनंती आहे आणि कुणी काय करावे याचे सुरुवातीलाच पुर्वी जस महाराष्ट्र अकाउंट कोड असा होता आणि पुर्वी महानगरपालिकेला पॉवर्स आहेत की पोटनियम करून कोणाला किती अधिकार द्यावेत काय द्यावेत आणि कुठे द्यावेत हे पुर्ण महानगरपालिकेला अधिकार आहेत आणि त्यानुसारच कारवाई करावी असे वाटते आणि आता संबंधितांना सुचना आहे की याची तांत्रिक मंजूरी पुर्वी होती तेव्हा नगर अभियंता होते नगर अभियंता हे एक्झिक्युटिव्ह दर्जाचे होते त्यामुळे त्यांना पूर्ण अधिकार होते सर्व बांधकाम विभागाला शहर अभियंता एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, कार्यकारी अभियंता आहेत त्यामुळे त्यानंतरच हे निर्णय घ्यावेत असे मी सभागृहाला आणि मा. महापौरांना विनंती करतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता तुम्ही जी मंजूरी दिली असे त्यांनी सांगितले तर तुम्ही कुठल्या कायद्याच्या कुठल्या कलमानुसार तूम्ही मंजूरी दिली.

**सुधीर नाकाडी :-**

सदरच्या बांधकामना मंजूरी देण्याचे मुख्यलेखापरीक्षकाचे निर्णय आहेत लेखापरीक्षकांचे फक्त अभिप्राय जातात आणि कुठलीही मंजूरी ही फक्त स्थायी समितीच मंजूरी देऊ शकते त्यांच्यानंतर लेखा परीक्षण म्हणजे लेखे विषय जे तांत्रिक गोष्टी आहेत हे बघणे त्या इंजिनिअरचे काम आहे आणि ज्या लेखा संबधित गोष्टी आहेत या गोष्टी फक्त लेखा परिक्षणासाठी येतात आणि फक्त बजेट आहे का? किंवा त्या गोष्टीला फक्त तशी मंजूरी घेतली की नाही हे फक्त बघणे लेखा परिक्षकाचे काम आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण अतिशय छान उत्तर दिलेत म्हणजे दशोरेनी आमची अशी दिशाभुल केली की आपण त्याला मंजूरी दिली असे ते बोलले रेकॉर्ड आले असेल तर ते स्टेटमेंट एका बाजूला काढावे. दशोरे यांच्यावर आरोप क्रमांक एक सभागृहाला चुकीची माहिती देणे. दुसरी बाब आपण आता सांगितली की लेखा परिक्षण विभागाचे काम काय तर एखादी गोष्ट कायद्यात बसते की नाही? म्हणजे त्याला आर्थिक मंजूरी द्यायला त्याला बजेट प्रोव्हीजन आहे की नाही हे पहावे. म्हणून आपण त्याला पुढे चाल दिली असे आपले म्हणणे आहे. मग आता बजेट प्रोव्हीजन आहे आपण सांगू शकाल का? ३ कोटी ३३ लाखाला आपण मंजुरी देतो आहे. त्यामुळे बजेट प्रोव्हीजन ही महत्वाची बाब आहे.

**सुधीर नाकाडी :-**

नवीन पाईप लाईन टाकणे व साहित्य खरेदीसाठी पाच कोटी नव्वद लाखची तरतुद आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण आता असे गृहीत धरू या की या चालू आर्थिक वर्षात एकही नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम आपण घेतलेले नाही आणि कॉन्ट्रॅक्टरला एकही बील अदा करायला बाकी नाही, असे धरायला हरकत नाही का? लेखा विभाग आपण प्रोव्हीजन दाखवताना तर ती प्रोव्हीजन किती वापरली ही एक सांगायचे तुमचे काम आहे.

**सुधर नाकाडी :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी माझी विनंती आहे की थोड्या वेळानंतर ह्याचे उत्तर दिलेतर चालेल का?

**प्रफुल्ल पाटील :-**

असं जर मी म्हटले की थोड्या वेळाचे या विषयावर चर्चा केली तर चालेल का? आपण तीन वेळा हा विषय पुढे ढकलतो आहे. एकीकडे सभागृहात सदस्यांचे असे म्हणणे झाले की आम्ही जाणूबुजून विरोध करतो उत्तनला आम्हाला पाणी द्यायचे नाही आणि पाणी विभागाची किती बिले आपल्याकडे पेंन्डींग आहेत. कामाची तुम्ही वर्क ऑर्डर काढली आहेत. तेवढे सगळे या पाच कोटी नव्वद लाखातुन वजा होऊन केवढी प्रोव्हिजन आपल्याकडे उरली आपण वित्त विभागातून आलात. आपण प्रॉपर ॲथोरिटी आहेत. आपण मुख्य लेखा विभागामध्ये मुख्य लेखा परिक्षक म्हणून तुम्ही काम करता म्हणजे तुमची कॅफो आहेत का?

**सुधीर नाकाडी :-**

चार्ज हा मुख्य लेखा परिक्षकाचा दिलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्हाला वरच्या पोस्टचा चार्ज दिलेला आहे.

**सुधीर नाकाडी :-**

दोन्ही पोस्ट सारख्याच दर्जाच्या आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

महापालिकेने जेव्हा पोस्ट तयार केल्या तेव्हा त्या स्पष्टपणे केलेल्या आहेत महानगरपालिका स्थापन झाल्यानेतर त्या पोस्ट तयार करायचा याचा प्रस्ताव पाठवला त्याच्यामध्ये जी पदे निर्माण करायची ती केलेली आहे तत्कालीन आयुक्त साहेब इथे आहेत. आम्हाला तूमच्या बद्दल कोणतेही दुमत नाही. पण या ठिकाणी पार्वसचा प्रश्न आहे आम्ही जर आयुक्तांच्या जागेवर बसुन आम्ही शिपायांकडून आयुक्ताच्य दर्जाचे काम करुन घेऊ शकतो का? की आयुक्तांच्या जागेवर बसल्यावर शिपायाला आयुक्ताचे अधिकार प्राप्त होतात हा एक वेगळा विषय आहे. मला फक्त एकच म्हाणायचे आहे की जर तुम्हाला पावर्स दिल्या दोन्हीच्या चीफ ऑडीटर आणि कॅफोच्या तर दोन्ही तूमच्याकडे पॉवर्स आहेत तर फायनान्स ऑफिसर म्हणून तुम्ही याला आर्थिक मंजूरी दिली कशी? तुम्ही कशाला तपासले नाही. की पाच कोटी नव्वद लाख रुपये आमच्याकडे तरतुद त्यापुर्वी एवढी बिले आमच्याकडे पेन्डींग आहेत. तुम्ही एकतर पाणी विभागातुन माहिती मागविली नसेल की किती बिले स्थगित आहेत. किती नवीन कामे चालु आहेत त्याची बिले येणार आहेत. नंतर आमच्याकडे एवढे पैसे उरणार आहेत हे तुम्ही मागीतले नाही आणि पाणी खात्याच्या दशोरेजी तुम्हाला जाणूबुजून माहिती दिलेली नाही कारण त्यांना मिसलीड करायचं आहे. त्यांनी सांगितले की एवढ्या लाखाची बिले बनवायची आहेत. वेळ मिळत नाही म्हणून हॉटेलमध्ये जाऊन आम्ही कॉन्ट्रॅक्टरांची बिले बनवितो तसाच दशोरेनां वेळ नसतो. आपण चांगले काम करता. हॉटेलमध्ये जाऊन बिले बनविण्याचे दशोरेचे काम चालु असते म्हणूनच मी बुट काढले होते. ते परत निघू नयेत.

**सुधीर नाकाडी :-**

पाच कोटी नव्वद लाखामधुन जी खर्च आलेला आहे. त्याची तरतुद जेवढी शिल्लक आहे तो पाणी पुरवठा विभागाला ते रजिस्टर ठेवलेले आहे आणि याच्यातुन देखील खर्च आलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हाणजे तीन कोटी तेहतीस लाख रुपये तुच्याकडे नाहीत आणि तरीसुध्दा हा विषय तुम्ही मंजूरीला आणला या ठिकाणी विशेष महत्वाची बाब अशी आहे. सभागृहामध्ये हा दोष तुमचा ना आमचा आहे. कोणाचाच दोष नाही फक्त आम्हाला कशा पध्दतीने मिसलिड करण्याचे काम हे अधिकारी करतात याचे हे जातीवंत उदाहरण आहे. तुम्हाला मानसिक त्रास झाला असेल त्याबद्दल मी क्षमा

मागतो आणि पत्रकारांना पण विनंती करतो. तुम्ही हे क्षमा मागितल्याचे छापा. असा प्रकार अकाउंटच्या बाबतीत आहे की, जेव्हा महानगरपालिकेचे कुठलेच बायलॉज नाहित. विचित्र प्रकार आहे. आजपर्यंत महानगरपालिका स्थापन होऊन पोस्ट लवकर तयार झाल्या पदे लवकर भरली गेली आणि बायलॉज सभागृहाचे कामकाज कसे चालवायचे मंजूरी कशा घ्यायच्या आर्थिक त्याचे कूठलेही कायदे नाहीत आणि त्याच्यामुळे नाकाडी साहेब आम्हाला म्हणतात आमचे हे कामकाज चालले आहे ना हे नगरपालिकेच्या कायद्याप्रमाणे चाललेले आहे. नगरपालिकेच्या कायद्याने किती वर्षे चालवायचे ते आपण ठरवले पाहिजे परंतु महाराष्ट्र अकाऊंट कोड हा जो त्यांनी सांगितला तो नगरपालिकेचे आहे आणि त्या नगरपालिकेच्या नियमाने सुद्धा हे जात नाही सगळ्यात पहिल्यांदा आर्थिक तरतूद नाही म्हाणून ह्यांनी तांत्रिक मंजूरी घेतली नाही. आता ते म्हणतात की तांत्रिक मंजूरी घेतलेली आहे तर मग त्यांनी आमच्या पत्राना उत्तर द्यायला पाहिजे होते. म्हणून आर्थिक तरतुद नसताना हा विषय मंजूरीला आणला आहे. ही पहिली बाब दुसरी बाब तांत्रिक बाबी बाबत मी एक प्रश्न अधिकाऱ्यांना विचारू इच्छितो की तांत्रिक मंजूरी देण्याचे पॉवर्स कोणाचे? आणि या तीन कोटी तेहतीस लाखाला कोणी तांत्रिक मंजूरी दिलेली आहे आणि कशा पध्दतीने दिलेली आहे. त्यासंबंधी जो येथे अधिकारी प्राधिकृत केला असेल किंवा शिपायाला कमिशनराचे अधिकार दिले असतील तर त्याला उभे करुन येथे सांगावे की ह्याला आम्ही तांत्रिक मंजूरी दिलेली आहे आणि कशा पध्दतीने दिलेली आहे.

**दशोरे :-**

सगळ्या कामाना तांत्रिक मंजूरी दिलेली नाही ते प्रशासकीय वित्त मान्यता नंतर अकाऊंट कोड प्रमाणे. नंतर तांत्रिक मंजूरी देण्यात येईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण जर छान उत्तर दिले. काय बोलतात की तांत्रिक मंजूरी दिलेली नाही. प्रोसीडींगला नोट करा तांत्रिक मंजूरी दिलेली नाही आता प्रशासकीय मंजूरी मागितली आहे. म्हणून तांत्रिक मंजूरी दिली नाही आणि विषय काय सांगतो मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत जलवाहिनी टाकण्याच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणे. आर्थिक मंजूरी कधी देतात याचे दशोरे उत्तर मला देऊ शकाल का? आणि उत्तर देण्या अगोदर आपण काय पदावरून आलात. म्हणजे आपले शिक्षण काय? आणि आपण कुठल्या पदावर काम करता हे पाहिल्यांदा सांगा आणि आर्थिक मंजूरी या ठिकाणी विषय असताना आपण फक्त प्रशासकीय कसे म्हणालात हे तुम्ही मला सांगा.

**दशोरे :-**

माझे शिक्षण डी. सिव्हल आहे आणि मी उपअभियंता या पदावर आलेला आहे आणि मला अतिरिक्त कारभार कार्यकारी अभियंता दिलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

कार्यकारी अभियंता कारभार दिला आहे. आता गमत पाहीली मी मघाशी बोललो ना. शिपायाला कमिशनरचा चार्ज, तुम्ही शिपाई नक्कीच नाही. तुम्ही उपअभियंता आहात म्हणजे डेप्युटी इंजिनिअर तुमची साईड कुठली?

**दशोरे :-**

सिव्हीलची आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणजे तुम्हाला पाण्याच्या टाक्या कशा बांधायच्या, आर.सी.सी. प्रमाण काय असावे, वाळू, रेती, सिमेंट किती असावे, लोखंड किती असावे याची तुम्हाला जास्त माहिती आहे. तुम्ही पाईप लाईनचा डायमिटर काढू शकता का? हे काम तुम्ही केलेले आहे का ? पाईप लाईनचा डायमिटर किती असावा? किती इंचाची पाईप लाईन आसावी. पाईप एम.एस.चे असावेत सी.आय चे असावेत का स्टीलचे असावेत का एस.सी. पाईप लाईन असावी याबद्दल तुम्हाला काही माहिती आहे का?

**दशोरे :-**

तांत्रिक बाबी लक्षात घेऊन आम्ही हे काढलेले आहे. मग आता तुम्ही म्हणालात तांत्रिक मंजूरी दिलेली नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता हे म्हणाले तांत्रिक मंजूरी दिली नाही तरी तांत्रिक बाबी यांनी विचारात घेतल्या आहेत म्हणजे आम्हाला समाधानासाठी तुम्ही असे सांगता की तुम्ही तांत्रिक बाबी विचारात घेतल्यात लेटस अॅडरस्टॅड दॅट यु हॅव कम्पलीट नॉलेज ऑफ इट यु वेअर कम्पलीट नॉलेज ऑफ दॅट आता तुम्ही मला सांगा का की तुम्ही डेप्युटी इंजिनिअर म्हणून या ठिकाणी आलात तुम्हाला एक्झिक्युटिव्ह इंजिनिअरचा

चार्ज दिलेला आहे. कुठल्या एक्झिक्युटीव्ह इंजिनिअरच्या अधिकाराद्वारे तुम्ही तीन कोटी तेहतीस लाख मंजूरी देऊ शकतात तसा नियम कुठे आहे? तो मला सांगा.

**दशोरे :-**

याला तांत्रिक मंजूरी दिलेली नाही प्रचलित नियमानुसार आता जे बांधकाम खात्याचे पण जेवढे एस्टिमेट झाले तांत्रिक मंजूरी नंतर देतात आणि एम.पी.डब्ल्यू मॅन्युअल प्रमाणे पंचवीस लाखापर्यंत कार्यकारी अभियंता यांना पावर्स आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता तुम्ही काय म्हणालात की तांत्रिक मंजूरी दिली नाही एस्टीमेट केले याचा अर्थ अंदाज पत्रक तुम्ही तयार केलेत म्हणजे तुम्हाला माहिती आहे की उत्तन विभागामध्ये कुठल्या डायमिटरची पाईप लाईन टाकावी म्हणजे एवढ्या दाबाने पाणी मिळेल आणि कुठल्या ठिकाणी ए.सी.च्या ऐवजी सी.आय. लाईन टाकावी मग तुम्ही असे अंदाज पत्रक तयार केल्याची कॉपी तुमच्याकडे आहे का?

**दशोरे :-**

आहे कॉपी.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग ते आपण ठरविले कसे आपण सांगू शकाल की या ठिकाणी आठ इंचाचीच डायमिटर आहे. की दहा इंचाचीच आहे. आपण कसे ठरविले? काय बेसीसवर आपण वर्कआऊट केले.

**दशोरे :-**

त्या विभागाची लोकसंख्या आणि तसे जे सी.एस चे रिपोर्ट आमच्याकडे आहे त्याप्रमाणे आम्ही पाईप लाईनचे एस्टिमेट करू..

**प्रफुल्ल पाटील :-**

चौथी बाब आपण सी.एस.चा रिपोर्ट या सभागृहामध्ये सादर केलेला नाही. मॅडम अकाउन्ट कोडप्रमाणे अंदाज पत्रक त्यांनी सभागहापुढे सादर केलेले नाही. अंदाज पत्रक त्यांना जे नॉलेज आहे ते बी.ई. आहेत. सिव्हील साईड म्हणजे सिमेंटच्या टाक्या बांधणे पाईप लाईन नाही, पाईप लाईनच्या डायमिटर ठरविल्याचे त्यांना नॉलेज असेल तर ती एकच प्रश्न विचारतो त्यांनी मला सांगावे की या ठिकाणी हेड किती आहे तो विचारू का? मग तुम्ही जर उत्तर दिले नाही तर आताच सभागृहातुन तुमची हकालपट्टी करणार का? तुम्ही स्वतःहून जाल का?

**दशोरे :-**

तुम्ही प्रत्येक गोष्टीला असे म्हणता हकालपट्टी करणार मी जायला तयार आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी प्रत्येक गोष्टीला नाही. मी एकच गोष्ट बोललो.

**दशोरे :-**

आता पर्यंत जेवढे गोषवारे झाले ते या फॉरमॅट मध्ये येतात या महानगरपालिकेची जी पध्दत आहे त्याप्रमाणे मी हे दिलेले आहे आणि तांत्रिक मंजूरी ते नंतर घेतात हा प्रश्न मला पण होता पण इथे नंतर घेतात त्याप्रमाणे मी सादर केलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही आम्हांला कायदा सांगता आम्ही जेव्हा नळ कनेक्शन मागायला आलो तेव्हा तुम्ही जी.आर. मला दाखवला की अनधिकृत बांधकामाना नळ कनेक्शन देता येत नाही. मग हा कायदा तुम्हाला कसा विसर पडला तुम्हाला हायड्रोलीक इंजिनिरींगचे काहीही माहिती नाही असे असताना तुम्ही हे कायद्याच्या बाहेर मी परत बोलतो तुम्ही जास्त बोलता असे मला वाटते. तुम्ही माझ्यापेक्षा जास्त बोलता. अधिकाऱ्यांनी आपले संयम ठेवले पाहिजेत. मी तुम्हाला एकाच गोष्टी बाबत विचारलेले आहे. दुसरा कुठलाही विषय येईपर्यंत मला वाटत नाही तुम्हाला या ठिकाणी रहावेसे वाटले कारण तुमची उल्हासनगरवरून पण अशीच हकालपट्टी झालेली आहे. ज्याप्रमाणे तुम्ही वागत होतात विषय महत्वाचा म्हणजे सभागृहाने निर्णय घ्यायचा. आम्ही सगळा दिला तीन कोटी तेहतीस लाखचा उद्या ऑडीट झाल्यावर जबाबदार कोण आहे? तुम्ही ॲफीडेव्हीट देता का? बॉन्ड लिहून देता का? की उद्या जर तांत्रिक बाबी बाबत जर ऑडीट परिक्षणामध्ये हे निघाली तर त्याला तुम्ही जबाबदार असाल जिथे असाल तिथून तुमच्या सर्व्हिसवर टाच येईल तुमचे पेन्शन थांबविले जाईल. तुमच्या पगार ताब्यात घेतला जाईल असे आम्हाला द्या. हमी पत्र लिहून आणि लेखा विभागाकडे आर्थिक मंजूरी बाबत आर्थिक तरतुद नसताना हा विषय पुढे आणला येथील नियम असा आहे की? आहे? म्हणजे येथील पूर्वीचे लोक वेडे होते का? इथला नियम काय? प्रचलीत नियम आहे असे कुठल्या पुस्तकामध्ये लिहिलेले आहे का?

की तांत्रिक मंजूरी घ्यायची नाही आर्थिक मंजूरी पहिली घ्यायची नंतर प्रशासकीय घ्यायची तांत्रिक मंजूरी नंतर तयार करायची. तुम्हाला स्पष्टीकरण करण्याची मला गरज आहे असे वाटत नाही. मॅडम दशोरे या व्यक्तीशी माझे काही वैयक्तिक असे काही नाही पण त्या प्रकारे हा विषय ट्वीस्ट केला गेला. सर्व सभागृहातील सदस्यापैकी आपल्याला भावना मांडल्या कोणाचा विरोध पाईप लाईनला असायला पाहिजे कोणाचाच नसायला पाहिजे पण मुळात ते आता हे तरी सांगतील का हा पैसा नगरपालिकेच्या तिजोरीतून खर्च होणार का? हे तरी सांगा तुम्ही स्वतः पैसे देणार.

**दशोरे :-**

हे बजेटमध्ये प्रोव्हिजन आहे त्याप्रमाणे खर्च करणार.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता ह्यांची दुसरी बाब पाहा हे जेव्हा सी.एस.चा रिपोर्ट सांगतात की सी. एस च्या रिपोर्ट प्रमाणे आम्ही बनविला आम्ही मान्य करतो सी.एस.चा रिपोर्ट आमच्याकडे नाही आहे. पण यांना माहिती नाही की या सभागृहामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाच्या अधिकाऱ्यांनी उत्तनची पूर्ण स्कीम त्यांनी मला टोटल स्कीम कितीची आहे ते सांगावे म्हणजे ह्यांना अधिकाऱ्यांना म्हणजे सन्मा. महोदय आदरणीय श्री. महागुरू दशोरे यांना किती नॉलेज आहे याची आपल्याला अंदाज येईल. उत्तनच्या पूर्ण प्रोजेक्टची मंजूरी प्रशासकीय झालेली आहे. आर्थिक झालेली आहे एम.जे.पी.ने त्याच्या योजनेमध्ये हा संपूर्ण भाग समाविष्ट करण्याचे ठरविले आहे आणि त्याच्यासाठी सध्या जी योजना चालु आहे ज्याचे ९८ टक्के काम झाले आहे. सन्मा. सदस्य लिओ सर यांनी सांगितल्याप्रमाणे त्याच्यामध्ये एकही पैसा वाढ न करता एकशे दहा कोटीमध्ये संपूर्ण उत्तनला पाईप लाईन आणि पाणी देण्याचे प्रयोजन असताना पुन्हा तीन कोटी तेहतीस लाखाचा खर्च आमच्या महानगरपालिकेच्या माथ्यावर मारायचा याच्या मागे दशोरे काय कारण आहे की, पहिलेच तुमचे कॉन्ट्रॅक्टरबरोबर ॲडव्हान्स सेटलमेन्ट करायचे झालेले आहे. कारण तुम्ही बऱ्याच सभा कॉन्ट्रॅक्टरबरोबर घेता मी स्वतः तुम्हाला पाहिलेले आहे, हॉटेलमध्ये पार्ट्या करित असताना. कॉन्ट्रॅक्टरचे ही नाव सांगेन आणि त्या दिवशी तुम्ही नगरपालिकेत असे सांगितले की मी एम.जे.पी च्या सभेला जातो आहे आणि एम.जे.पी.मध्ये त्या दिवशी तुमची सभा नव्हती. मी स्वतः जाऊन एम.जे.पी.मध्ये चेक केले. ती ह्यांची सभा नव्हती ह्यांची सभा तिसऱ्या दिवशी होती आणि हे आयुक्त साहेबांना सांगून गेले की मी सभेला चाललो आहे शांतीनगरला पाणी द्यायला मला माहिती नाही असे लोक असतील तर शांतीनगरला पाणी मिळेल की नाही? म्हणून कोर्टाला ठरवावे लागते जेव्हा आमच्या पावर्स असतात तेव्हा हा विषय कोर्टापुढे का जातो? हा प्रश्न बाजूला राहतो. पण प्रश्न असा आहे की, या व्यक्तीला हे माहिती नाही की इथे एम.जे.पी.च्या अधिकाऱ्यांनी या सभागृहामध्ये आपल्या उपस्थितीमध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की हा सगळा खर्च उत्तन पाणी पुरवठ्याचा खर्च हा ११० एम.एल.डी च्या पाण्याच्या स्कीममध्ये एकही पैसा वाढ न करता ते करून देणार आहेत असे असताना सुध्दा यांना हे स्वप्न का पडले की तीन कोटी तेहतीस लाखाचा ॲडीशनल खर्च किबहूना कितीतरी जलवाहिन्या टाकण्याची कामे तुमच्याकडे येतील आता कसे उत्तनचे सहा आहेत म्हटल्यानंतर भाईंदरचे सहा आहेत किंवा आणखी खारीवाले, गोडदेव वाले, नवघर वाले सगळेच येणार तुमच्याकडे कारण पाणी ही वस्तु अशी आणि ते तुम्हाला तुम्ही मनाने दानशुर आहोत आणि तुम्ही सर्वांचे प्रस्ताव पास करणार हे पण मला माहित आहे पण हे काम कुठल्या पध्दतीने आम्ही काम करतो आहे आणि सभागृहाला कशाप्रकारे मिसडायरेक्शन केले जाते ते मिसडायरेक्शन करण्यापेक्षा आम्हाला कायद्याच्या अडचणीत टाकले जात आहे. त्यांना माहिती आहे कल्याण महानगरपालिकेला काय झाले ते? डोंबिवलीत काय झाले ते ज्या ठिकाणी पाईप लाईन टाकण्याचे प्रस्तावीत नव्हते त्या ठिकाणी पाईप लाईन टाकल्या. महाशयांना अटक होणार होती त्यापूर्वी ते पळाले अनेक अधिकाऱ्यांना अटक झाली. त्यांनी स्पष्ट सांगावे आपला पुर्व इतिहास आपण सांगितला तर काही वाईट नसते. किबहुना अनेक गुन्हेगार हे सद्‌गृहस्थ झालेले दिसतात आपल्याला कशाला नाही? वाल्मीकी झाला ना. वाल्या कोळीचा वाल्मीकी झाला तसे ते होतील दशावतारी पण सभागृहाची दिशाभुल मी या ठिकाणी कधीच करू देणार नाही जरी सभागृहाचे मत एका साईडला पडले. या अधिकाऱ्यांच्या बाजूने तरी तांत्रिक दृष्ट्या आर्थिक दृष्ट्या कुठल्याही मंजूरी कायद्याच्या याच्याने न जाता त्यांनी या ठिकाणी समोर आणलेल्या आहेत. उलट सभागृहाला खोटी माहिती दिलेली आहे एकदा सांगतात तांत्रिक मंजूरी झालेली आहे आणि एकदा सांगतात तांत्रिक बाबीचा विचार केलेला आहे एकदा सांगतात डाएमिटर मी फिक्स केलेत अहो त्याला हायड्रोलिक इंजिनिअर असावा लागतो. दशोरे यु जस्ट डोन्ट गो ॲन्ड इमॅजीनींग दॅट यु आर इंजिनिअर यु आर सिव्हिल इंजिनिअर ॲन्ड यु आर नॉट हायड्रोलिक इंजिनिअर नायदर यु आर इलेक्ट्रिकल इंजिनिअर नायदर यु आर मेकॅनिकल इंजिनिअर सो यु डोन्ट हॅव टू डू

ऑल दिस थिंग. हे तुमच्या कक्षेत येत नाही एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर केला म्हणजे काहीही करू शकतो आणि पंचवीस लाखाच्या तरतुदी पंचवीस लाखाच्या पावर्स तुम्हाला आहेत. एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर पी.डब्ल्यु.डी मॅन्युअल आहेत. रोज बघत असाल किती लाखाची मंजूरी आहे त्यामध्ये तीन कोटी तेहतीस लाखाची आहे किंवा पंचवीस लाखाची आहे किंवा दहा लाखाची आहे तुम्हाला नसलेल्या पावर्स सुध्दा तुम्ही वापरतात म्हणून मघाशी जेवढे चार्जेस त्याच्यावरती ठेवले तर हा एक दुसरा चार्ज आहे. त्याच्याशिवाय तुम्ही सभागृहाची दिशाभुल करतात सभागृहाला तुम्ही फसावतात आणि नगरपालिकेच्या आर्थिक ज्या बाबी आहेत तो नगरपालिकेच्या जनतेचा पैसा हा अन्य ठिकाणी अवैध मार्गाने तुम्ही डायवर्ड करता हा सुध्दा माझा तुमच्यावर आक्षेप आहे. आणि म्हणून मघाशी मांडलेल्या ठरावामध्ये मी उपसुचना मांडत आहे की अकाऊंट कोडच्या नियम १५९, १६०, १६१, १५८ कामाचे अंदाज पत्रक तयार करणे या तरतुदीस अधीन राहून अर्थसंकल्प त्याच्या तरतुदीस अधीन राहून सर्व प्रथम सी.ई.एस. कन्सलटिंग इंजिनिअर सर्व्हिसेस या तांत्रिक दृष्ट्या सक्षम असलेल्या एजन्सीने उत्तन आणि डोंगरी विषयी जो प्रस्ताव ठेवलेला आहे तो प्रस्ताव विचाराधीन घेऊन यासाठी होणारा सगळा खर्च एकशे दहा कोटीच्या योजनेमधून सक्षम प्राधिकारी हे एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर यांच्याकडे चार्ज आहे बरे झालं आपल्याकडे चीफ इंजिनिअरचा चार्ज नव्हता. पोस्टच नव्हती नाहीतर चीफ इंजिनिअरचा पण चार्ज यांना दिला असता. चीफ इंजिनिअर ही सगळ्यात वरची पोस्ट आहे त्यांना नो लिमीटस पावर्स आहेत आणि म्हणून या लिमीटच्या बाहेरच्या पावर्स हे वापरतात इव्हन ही इज एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर देन जस्ट टेक इट ग्रॅन्टेड दॅट ही इज एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर देन टू ही डजन्ट बेअर दॅट पॉवर बीकॉज इट इज एकसीस मोर दॅन ट्वेन्टी फाईव्ह लॅक्स रूपिज बट इट इज ॲक्च्युली टेन लॅक्स रुपिज ॲज पर पी.डब्ल्यु.डी. मॅन्यूअल. सो ही इज नॉट फोलो द प्रोसिजर अंडर पी.डब्ल्यु.डी. मॅन्युल. ही इज नोट बॉथर टू सी प्रोव्हिजन ऑफ द अकाउन्ट कोड १९७१ अँड ही इज नॉट बॉथर टू सी द प्रोव्हिजन ऑफ द बी.पी.एम.सी. ॲक्ट इन ॲबसेन्स ऑफ द बायलॉज व्हीच आर नॉट फॉर्म बाय दिस काउन्सील बाय द कार्पोरेशन एवढ सगळ असतना या गोष्टीच्या अधीन राहून या ठरावाला आम्ही उपसुचना मांडत आहोत मॅडम आपल्या माहितीसाठी उत्तन विभागासाठी राई, मुर्धा येथे ०.५ एम.एल.चा आहे. उत्तन येथे १.५ चा ई.एस.आर. आहे. चौक येथे ०.३५ एम.एल.चा ई.एस.आर. आहे. पाली येथे सम्प ०.०६५ आहे. या सगळ्याचा खर्च ६ कोटी ८६ लाख आहे. सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांना वाटले की लवकर पाणी येईल पण तसे होत नाही यु हॅव टू लोकेट ई.एस.आर. ॲन्ड संम्स एव्हरी व्हेअर हा झाला मेन सिव्हील वरचा याचे त्यांना सांगितले असते की टाक्या बांधकाम एवढा खर्च तर आम्ही मान्य केले असते ही बेअर्स दॅट नॉलेज बीकॉज ही बी सिव्हिल इंजिनिअर. दुसरी बाब आहे मेन ट्रान्समिशन लाईन. तुम्ही उत्तन भागात पाईप लाईन टाकणार. ट्रान्समिशन लाईन तुमच्याकडे नाही म्हणजे मेन ट्रान्समिशन लाईन मधुन तुम्ही फिडर लाईन जाईल. फिडर लाईन मधुन सप्लाय लाईन जाईल. ट्रान्समिशन लाईन आहे आणि ट्रान्समिशन लाईनला उत्तन विभागाचा खर्च आहे २ कोटी ६ लाख रुपये आज सगळा सी.एस.चा रिपोर्ट मी सांगतो. मी काय स्वतः तयार केला नाही हा सी.एस.चा रिपोर्ट हायड्रोलिक थेअरीवर तयार केलेला रिपोर्ट आहे. त्या ३ कोटी ४३ लाखाच्या डिस्ट्रिब्युशन सीस्टम आहे म्हणजे या महाशयांनी उत्तनचे संशोधन केले. राई मुर्धाचे संशोधन केले आणि त्यांना फक्त ३ कोटी ३३ लाख वजा ६ गेले किती उरले दिडच कोटीचा त्यांना पाईप लाईन तुम्ही देणार. म्हणजे तुम्ही उत्तनचे विभागाची मागणी पण पूर्ण् केलेली नाही हे देवून मुळात नुसता उत्तन, राई मुर्धा विभागासाठी तीन कोटी ४३ लाखाची डिस्ट्रिब्युशन सिस्टम आहे असे असताना या महाशयांनी फक्त दीड कोटी म्हणजे मुद्दाम लोकांना भांडणे लावायची म्हणजे हे यांच्याबरोबर भांडतील. कदाचित त्यांना ते चालू ठेवायचे असेल ३ कोटी ४३ लाखाची डिस्ट्रिब्युशन सिस्टम आहे आणि या सगळ्यांचा खर्च जो आहे तो सहा कोटी एकोणीस लाखाची प्रोव्हीजन जेव्हा तुम्ही कराल त्याचे आधीच अंदाजपत्रक तयार आहे. तांत्रिक मंजूरी केलेली आहे. सी.एस.चा रिपोर्ट आहे काम करायचे एम.जे.पी.ने मान्य केलेले आहे हे सगळे काम चालू असताना सुध्दा सभागृहाची पुर्ण दिशाभुल करून एम.जे.पी.ला सभागृहाने काम करण्याची मंजूरी दिली या सभागृहाने तर करू द्या या अधिकाऱ्यानां कदाचीत तिकडे वर्ग करायचे झाले तर त्यांनी स्वतःहून जावे मी काही सांगत नाही की तुम्ही जा. जर तुम्हाला रहायचे असेल तर हे सगळे करा नाहीतर मी कोण सांगणार मा. महापौर मॅडम बसलेले आहेत ते ठरवतील तुम्हाला रहायचे किंवा जायचे आहे ते आणि त्या सहजा सहजी कोणाला घालवत नाही आणि ज्याला घालवतात त्याला परत बोलवत नाही तर अर्थात त्याच्यात नावातच मेयर आहे. हा विषय ठरावाला आम्ही जी उपसुचना मांडली ती उपसुचना स्वीकारून कारवाई चालू करा पण दुसरी बाब अशी आहे की महाशयांनी जे सांगितले की २०० एम.एम ची पाईप लाईन टाकली आहे. त्यांना खरे

म्हणजे काही माहिती नाही पाण्याच्या स्कीमचे काय चालले आहे. एकदम त्याला स्वप्न पडले की शिवार उद्यान ते ब्रम्ह मंदिर मघाशी कोणीतरी चांगला प्रश्न विचारला अतिशय महत्वाचा तो प्रश्न आहे. गाडीमधून पाईप कुठे गेले ते मला माहिती नाही. ती त्यांचा संशोधनाचा विषय आहे कृपया शिवार उद्यान आणि ब्रम्हमंदिर सगळ थोतांड काढून ठेवलेले आहे. समोर डावीकडे तसेच उजवीकडे पण काढून ठेवले आहे ही कुठे न्यायची आहे. दुसरी गंमत म्हणजे ते सांगतात ५०० एम.एम.ची लाईन ती मेन ट्रान्समिशन लाईन राहणार म्हणजे मोठ्या लाईन मधून छोट्या लाईनमध्ये जायचे छोट्या लाईनमधून गल्लीमध्ये पाईप टाकायचा आणि गल्लीमधून बिल्डिंगमध्ये लावायचे असे एकंदरीत तंत्र आहे. कृपया या विषयावर सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेब घाई करू नका कारण काय मागे सुध्दा हा विषय आपण पुढे नेला उलट पाहिजे ते सहकार्य आम्ही करायला तयार आहोत आम्ही कंम्प्लेटली तूमच्या फेवरचे आहोत आमचे सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील ने सांगितले आहे परंतू अशा प्रकारे चुकीच्या पध्दतीने कुठलीही गोष्ट करुन सभागृहाला अडचणीत आणू नये मा. महापौर मॅडमनी माझे निवेदन शांतपणे ऐकुन घेतले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो आणि सभागृहात सुध्दा सदस्यांना एक विनंती करतो की आपण स्वतःची दिशाभूल करून घेऊ नये आणि उगाच दुसऱ्याशी भांडण्यात काय अर्थ आहे. आम्हाला ज्याच्याशी बोलायचे आहे ज्यांनी बोलले पाहिजे आणि त्यांनीच कारवाई केली पाहिजे एवढे बोलून सगळ्यांना धन्यवाद देतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील यांनी फार महत्वाची आणि सर्व सभागृहातल्या नवीन नगरसेवकांना एक नव्याने माहिती मिळेल अशी माहिती मिळेल अशी माहिती उपस्थित करून दिली ते स्वःत माजी नगराध्यक्ष होते. अनेक लेखी दस्तऐवज, अनेक पुस्तके त्यांच्याकडे आजही आहेत. आज ज्याचे वाचन केले तो सी.एस. रिपोर्ट मी स्वतः या महापालिकेमध्ये तत्कालीन नगरपालिकेत अनेक वेळा लेखी स्वरूपात मागितला. नगरपालिकेचेही पत्र मला आलेले आहे की हा रिपोर्ट आमच्याकडे उपलब्ध नाही. एम.जे.पी कडे आहे आणि एम.जे.पी.चे उत्तर मला आलेले आहे की हा रिपोर्ट आमच्याकडे नाही हा नगरपालिकेकडे आहे तर हा रिपोर्ट आज आम्हाला ऐकायला मिळाला. एवढे वर्षे हा रिपोर्ट असूनसुध्दा आम्हाला न मिळाल्याने आम्ही ज्ञानापासून वंचित राहिलो आहे हे आमचे दुर्भाग्य आज जो ठराव मांडलेला आहे. या सगळ्याचा सार दोन चार ओळीमध्ये मी सांगतो मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८६ नगरपालिका निधीतून खर्च करण्याबाबत निर्बंध यापुढे तरतुद केली असेल त्याखेरिज खर्च करायच्या कोणत्याही रक्कमेचा चालू अर्थसंकल्पीय अनुदानात समावेश नसेल तर आणि अशा अर्थसंकल्पीय अनुदानाची पुरेशी शिल्लक रक्कम त्यावेळी उपलब्ध नसेल तर आयुक्तांनी नगरपालिका निधीतुन कोणीही रक्कम ती नियमान्वये कोणत्याही प्रकारे कमी प्रमाणात कमी करण्यात किंवा हस्तांतरीत करण्यात आली असली तरीही देता कामा नये या कलमाचा उल्लेख करून या ठरावा वर निर्णय घ्यावा.

**मा. महापौर :-**

हा विषय मंजूर.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम आपण आता जो निर्णय दिला त्यांनी जी उपसुचना मांडली आणि मी या सुचनेचे आपण काय केले. मॅडम आम्ही सुचना करायच्या नंतर ठरावाची वाक्यरचना जर दरवेळेला सर्वानुमते मंजुर असे असते. येथे मी जो सेक्शन वाचून दाखविला आहे. त्याची तरतूद तुमच्याकडे नाही आहे. हे अगोदरच्या भाषणामध्ये क्लिअर झालेले आहे. दशोरेच्यासुध्दा आणि त्या ऑडिटरसाहेबांच्यासुध्दा क्लिअर केले की बजेटमध्ये तरतूद नाही आहे आणि हा सेक्शन क्लिअर म्हणतो आहे. त्याकरिता आमची सुचना आपण फेटाळता किंवा स्विकारता. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलसाहेबांनी अगदी महत्वाचे सांगितले, ते तुम्ही स्विकारता की नाकारता याचे रुलिंग तुम्ही आम्हाला द्या आणि त्यानंतर जर विषय मंजुर करायचा असेल तर हा विषय मताला टाकावा.

**प्रफुल्ल पाटीलः-**

उपसुचना विचारात घेउन मंजुर करायला हरकत नाही. कारण जी काही तुमची प्रोसेस आहे ती चालू ठेवा. तुम्ही दोन्ही गोष्टी पडताळून पहा.

**मा. महापौरः-**

आपण विचार करुया.

**मिलन म्हात्रेः-**

मा. महापौर मॅडम, मघाशी आपण जे क्लिअर कट रुलिंग दिले विषय मंजूर, आता आपले फ्रेश रुलिंग काय आहे? आपण हा विचारविनिमय करुन हा ठराव पास करणार आहात किंवा आम्ही जे सांगितले.

**रिटा शाहः-**

मा. महापौर, मला असे वाटते की, आता माजी नगराध्यक्ष श्री. प्रफुल्ल पाटीलसाहेब आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेसाहेबांनी तसेच दशोरेसाहेब आणि आपले जे ऑडीटर आहेत लेखापरिक्षक. त्यांनी जे आपल्याकडे जे मुददे नजरेसमोर आणलेले आहेत. त्याच्यामध्ये संशय निर्माण झालेला आहे. तर मला असे वाटते की, त्याची आपण शहानिशा करा आणि हा विषय आपण पुढिल सभेत घ्या.

**मिलन म्हात्रेः-**

महापौर मॅडम, यामध्ये आम्हाला मेहेरबानी करुन कोणावरही आकस नाही. कारण कालच्या स्टँडिंगच्या सभेतदेखील असा ४० लाखाचा विषय आला होता. तो तुमच्या उत्तन विभागातील नव्हता. तरीसुध्दा त्या ठरावावर आम्ही बोललो आहे. त्यांना जे डेझिग्नेशन दिले आहे. हे एम.जे.पी.चे नोकर्स आहेत. तिकडून आपल्याकडे मागवलेले आहेत. त्यांचे पद घटविणे, वाढविणे हे सगळे एम.जे.पी.चे अधिकार आहेत, असे असतानासुध्दा ते प्रभारी आहेत. हे कालच्या संपूर्ण सभागृहात केळकर साहेबांनी वाचन केले. त्यांच्या भाषणामध्ये झाले ते प्रभारी अभियंता आहेत. पण हे असे असताना सुध्दा कार्यकारी अभियंता म्हणून त्यांनी सह्या केलेल्या आहेत. कालसुध्दा ४० लाखाचा ठराव झाला तो सुध्दा आम्ही पेन्डींग ठेवलेला आहे व तो चाळीस लाखाचा हा साडेतीन करोडचा म्हणजे जवळजवळ चार करोड रुपयाची तरतूद आतापर्यंत दोन दिवसात झाली आहे. ह्या सगळ्याचा मॅडम, जरा विचार करा. त्यांनी ते सर्व कबुल केले. कालच्या स्थायी समितीच्या सभागृहामध्ये बरेचसे वादंग झाले त्याची प्रोसिडिंग तुम्ही जरा बघा. माझी आपणाला विनंती आहे आणि नंतर तुम्ही या विषयावर निर्णय घ्या. जेणेकरुन त्यांच्यामध्ये कोणी अडचणीत येऊ शकत नाही.

**रोहित सुवर्णाः-**

मा. महापौर मॅडम, या विषयावर सभागृहात अनेक नगरसेवक बोलले. आपआपले विचार मांडले. सन्मा. नगरसेवक मिलन म्हात्रेजीनी जो कहा सेक्शन ८६ के बारेमे उस ८६ मे उसी कलम को अंर्तगत रखकर ८७ मे देखेंगे क्लॉज नं. इ.एफ.जी.एच. सब सेक्शन टु ऑफ ८६ इस सेक्शन के बारेमे विचार किया जाय तो अच्छा है । क्योंकी पानी का विषय है और गोषवारेमे माहिती जो दी है नगरसेवको को वहाँ पर क्वान्टीटी, क्वालीटी के बारेमे कोई प्रकारकी जानकारी नही है । अगर आप अनुक्रमांक ७ पर देखेंगे, नवीन पेट्रोल पंपापासून घोडबंदर नाक्यापर्यंत जलवाहिनी टाकणे, अभी यह नवीन पेट्रोलपंप कौनसे रोडपर है । काशीमिरा भाईंदर रोडपर है या फिर हायवे पर है । कहाँ पर नया पेट्रोल पंप बन रहा है । इसकी हमे कोई जानकारी नही है । क्योंकी शांतीनगरको जो पानी आ रहा है वो घोडबंदरसे रोड के माध्यमसे नही आ रहा है । बल्की घोडबंदरसे लेकर एस.के. स्टोन तक लोगो के खेती के माध्यमसे आता है । उसको पॅरेलल आप लाईन डालनेवाले हो या डॉ. हेडगेवार रोडपर डालनेवाले हो इसका भी खुलासा मा. आयुक्त साहेबने इस गोषवारे मे नही किया । इसलिए मैं चाहता हूँ कि, इस विषयपर सविस्तर चर्चा हो जाय । टेक्निकली सॅक्शन और ॲडमिनिस्टेटिव्ह पॉवर्स का कही ना कही मिसयुज हुआ है । हमारे मित्र सन्मा. प्रफुल्ल पाटीलजीने सभागृहमे बहुत अच्छी माहिती दी । कही ऐसा न हो कि बॉम्बे लोकल फंड ऑडिट ॲक्ट के अंडर हम लोग सब नगरसेवक अदालत मे पेश होने का समय आ सकता है । क्योंकी मुंब्रामे जो लॅन्ड ठाणे महानगरपालिकाके अंर्तगत नही थी उस रोड को रिपेअर किया गया और उस रोड को रिपेअर करने के लिए लाखो करोडो रुपये का पब्लिकका पैसा इस्तिमाल किया गया । अंत में देखा गया कि, मुंब्रा का रोड किसी अन्य विभाग का था । ठाणे महानगरपालिका के अंडर मे नही था । जो रोड अपना नही है । वहाँपर खर्चा किया गया । नंदलाल समितीमें उसके बारे में आया । उस वक्त के तत्कालीन आयुक्त डी. के. शंकरन और जे.पी. डांगे उनपरभी नंदलाल समितीने कडे अक्षरोंमें अपने विचार उन्होने रखे । कभी ऐसा न हो कि, मिरा भाईंदर में भी अधिकारी नगरपरिषदके हिसाबसे काम कर रहे है । एक जमाना था नगरपरिषदमें ये सब चल रहा होगा लेकिन महानगरपालिका मे हम चाहते है यहॉपर टेक्निकल स्टाफ हमे बहुत मिला हुआ है । क्यो नही हम सब काम टेक्निकल माध्यमसे करे । जल्दबाज कोई न करे क्यों कि, महानगरपालिका के नियम के अनुसार हर नगरसेवक भी पब्लिक सर्वन्ट है । ॲन्ड पब्लिक सर्वन्टवाले भी हेल रिस्पॉन्सिबल अंडर मेनी अदर ॲक्टस फॉर मिस ॲप्रोप्रिएशन ऑफ फंड ॲन्ड ए मेजरमेन्ट ऑफ फंड इसलिए मै चाहता हुं कि, जिन अधिकारीओने

यहाँपर महासभाको, जनताको, पत्रकारोको गुमराह किया ।  ऐसे अधिकारीओ पर आप कडे से कडे कारवाई करे ये मेरी आपसे रिक्वेस्ट है ।

**लिओ कोलासोः-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय,  उत्तन आणि परिसरातील त्याचप्रमाणे भाईंदर भागातील एकंदरीत बारा प्रस्तावाबद्दल या सभागृहात चर्चा होताना अत्यंत वैधानिक स्वरुपाचे मुददे आणि विचार करायला लागणाऱ्या बाबी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत.  सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी एकंदरीत ११० कोटी रुपयांच्या योजनेमध्येच उत्तन परिसरातील साडे सहा कोटी रुपयांची कामाचा अंर्तभाव आहे.  ही गोष्ट निदर्शनास आणून दिलेली आहे.  त्याबददल खात्याच्या अधिका-यांशी चर्चा करताना खात्याच्या अधिका-यांनी दिलेली माहिती अशा स्वरुपाची होती कि, ही जी सहा कोटी पन्नास लाखाची जी कामे आहेत.  याच्यामध्ये सम्प, पंप आणि मेजर मेन लाईन्स, ट्रान्समिशन लाईनचा समावेश आहे आणि त्यांच्यामध्ये डिस्ट्रीब्युशन लाईन्स या योजनेमध्ये नाहीत, अशा स्वरुपाची जेव्हा माहिती देण्यात आली कि, जेव्हा डिस्ट्रीब्युशन लाईन्स नाहीत तर नुसते संम्प आणि पंप उभे करुन त्या परिसरात पाणीपुरवठयात कुठे सुधारणा होणार आहे, अशा स्वरुपाचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे त्या प्रस्तावाचा आम्ही सातत्याने पाठपुरावा केलेला आहे आणि त्याचमुळे अधिकाऱ्यांची बाजु घेताना दिसतो.  तशी वस्तुस्थिती नाही.  आम्ही मतदारांना, आमच्या भागाला बांधले गेलो आहोत. अधिकारी येतील आणि अधिकारी जातील. अधिकारी दिशाभुल करणारी माहिती सभागृहाला आणि सदस्यांना देत असतील तर ती फार गंभीर गोष्ट आहे.  माझ्यासमोर अशावेळी श्री. दशोरे किंवा अधिकारी नाही.  परंतु, त्या परिसरातील पाणी प्रश्नाबददल चर्चा होताना जेव्हा सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे हयांनी एक प्रश्न उपस्थित केलेला आहे.  आपला अकाउन्टस कोड वाचून कि सेक्शन ८६ खाली जर प्रोव्हीजन नसतील तर मा. आयुक्तांना या खात्यातून त्या खात्यात प्रोव्हीजन पालटण्याचा पण अधिकार नाही.  तर अशा स्वरुपाचे जर वैधानिक मुददे निर्माण होतात आणि या विषयाबददल सभागृहामध्ये संचित वातावरण निर्माण होते.  सन्मा. सदस्या रिटा शाह म्हणाल्या की, संशयातीन काहीतरी शब्द वापरला.

**रिटा शहाः-**

मा. माजी नगरराध्यक्ष प्रफुल्ल पाटील, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे, दशोरे साहेब व इंटरनल ऑडीटर यांनी जे मुददे आपल्यासमोर आणले.  त्यांची संपूर्ण शहानिशा करुन विषय पुढील सभेत आणावा असे मी म्हटले होते.

**लिओ कोलासोः-**

म्हणजेच संशयास्पद वातावरण या सभागृहापुढे नसायला पाहिजे.  पाणीपुरवठयासारखी एक चांगली गोष्ट आपण सर्वानुमते समविचारांनी आपण करणार आहोत.  तर त्यामुळे हया संपूर्ण विषयावरती परिपूर्ण माहिती आल्याशिवाय आपण घेऊ नये.

**मिलन म्हात्रेः-**

मा. महापौर मॅडम, आता जे सन्मा. सदस्य  कोलासोसाहेब बोलले, सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलसाहेबांनी जी सुचना केली आहे.  ११० कोटीच्या रक्कमेमध्ये ही तरतुद एम.जे.पी.च्या अधिका-यांनी केली आहे.  हा प्रस्ताव आपण त्या रक्कमेमध्ये त्यांच्याकडून करुन घेत असु तर बजेटच्या तरतुदीचा काही प्रश्नच उद्‌भवत नाही.  त्या अनुषंगाने आपले जवळजवळ साडेतीन कोटी रुपये त्या बजेटमधून वाचतील आणि त्यांची ती बाकी राहिलेली तरतुद पण वापरुन होईल.  दोन्ही कामे एकत्र होतील.

**प्रफुल्ल पाटीलः-**

मी ते का बोललो? सुरुवातीला प्रश्न विचारताना मी पहिला असा प्रश्न विचारला की, आपल्या तिजोरीतून खर्च करणार आहेत का? जर आपल्या तिजोरीतून खर्च करायचा नसता तर हयाला मंजुरी दयायला आपल्याला काही हरकत नसते.  कारण सगळया टेक्निकल सॅन्क्शन त्यांच्या असतात.  मग मी एवढे प्रश्न त्यांना विचारले नसते आणि एवढा वाद झाला पण नसता.  आता मला दुसरे सांगायचे आहे की, आता त्यांनी सी. आय. पाईपलाईन जी तुमच्याकडे प्रपोज केली.  सन्मा. सदस्य लिओ कोलासो आपण जरा ह्यामध्ये जास्त समजा एसी. पाईपलाईन आठ-नउ फुट खाली गेलेली आहे. त्यामध्ये लिकेज वाढलेले आहे.  म्हणजे लिकेज आहे असे म्हणायला हरकत नाही आणि त्या बदली तुम्हाला सी. आय. पाईपलाईन दिली.  मला माहिती नाही त्यांनी काय थेअरी वापरली पण माझ्या हिशेबाने आम्ही तांत्रिक विभागाकडून ज्यावेळी हे प्रस्ताव तयार केले.  माझ्याच कारकिर्दीत हे तयार केले.  त्यावेळी तिथे डायकन आयर्न पाईपलाईन टाकावी.  त्याला डी.आय. लाईन म्हणतात.  तर हा

तेवढा पाण्याचा फोर्स असणार आहे. कास्ट आयर्नचे पाईप तुटण्याची भीती असते. आतादेखील नवीन योजनेमध्ये काही ठिकाणी पाईप फुटले. कारण त्यांनी हायड्रोलिक सीस्टीम अजून अंमलात आणलेली नाही. म्हणून नवघर रोडला सतत पाईप फुटतात. ते म्हणतात पाईप बरोबर जॉइन नाही. म्हणून नाहीतर त्यांनी हायड्रोलिक प्रेशर जुन्या सीस्टीमबरोबर मॅच केलेले नाही. आता तुमच्याकडे अर्धी लाईन एक कोटी त्रेचाळीसची टाकणार आणि अर्धी ए.सी.ची राहणार. म्हणजे उत्तन विभागात चढ-उतार आहे. डोंगर विभाग आहे. त्या ठिकाणी कायम कमी-जास्त प्रेशर राहणार आहे. आपण मोठया पाईपलाईनला रिंग लावतो. पण छोटया पाईपलाईनला थोडी रिंग लावायला जाणार आहे. तेव्हा एखादया स्लोपवरुन पाईपलाईन जाईल. तेव्हा ठराविक स्टेजला ज्याला प्रेशर जास्त येईल. नॉर्मली २.६ पॉण्ड पर स्केअर इंच जो प्रेशर असतो. त्यापेक्षा ते जास्त जाईल आणि तिथे पाईप लाईन फुटतील म्हणून डी.आय. पाईप लाईनचा आपण प्रस्ताव ठेवा आणि अधिकाऱ्यांनी सांगितले आहे की, तुम्ही फक्त प्रस्ताव द्या. तुमचे कर्ज १३२ कोटी एकूण मंजुर आहे आणि ७५ ते ८० कोटीपर्यंत तुम्ही कर्ज घेऊ शकता. तर चालू योजनेत तुम्हाला करायला काय हरकत आहे. आणखी तुम्ही चांगले करा आणि हे तर जागेवर आहेत. तुम्हाला नवीन काही करायला नको. फक्त फॉलोअपच आहे. एम.जे.पी.चा तो केला तर मला वाटत नाही. यामध्ये काही अडचणी येतील.

**मा. महापौरः-**

आता विषय संपला. सदर विषय पुढच्या सभेत घेऊ.

**प्रकरण क्र. ४० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत जलवाहिन्या टाकणेच्या कामांस आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देणे.

**ठराव क्र. :-**

मा. महापौरांच्या आदेशनुसार सदरचा विषय पुढील महासभेत घेण्यांत येईल.

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण ४१ चे वाचन केले.)

**मोहन पाटीलः-**

महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो, प्रकरण क्र. ४१ आता विषय वाचलेला आहे. सदरच्या जागा संपादित करुन विकसित करण्याकामी जो विषय आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी आलेला आहे. मी महापौरांना या ठिकाणी विनंती करतो की, सदर विषयाची संपूर्णपणे टिपणी आपल्याकडे आलेली नाही आहे. कारण काही जागा न्यायप्रविष्ठ प्रकरण आहेत. तर कृपया आपण याची संपूर्ण माहिती आणून सदर विषय पुढच्या सभेला घ्यावा, अशी मी विनंती करित आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**महेन्द्रसिंग चौहानः-**

मै अनुमोदन देता हुँ ।

**प्रफुल्ल पाटीलः-**

स्थायी समितीचे माजी सभापती तुम्ही लगेच ठराव मांडलात. मग तो विषय एवढा खटाटोप करुन आणायचा कशाला? हा विषय एकंदरीत निर्णय घेण्यासारखा आहे, असे वाटले म्हणून घेतला आणि आता लगेच आपण बोलता की, तो आपण पुढच्या सभेत घ्यावा. सगळेच जर पुढच्या सभेत करणार मग सभा कशाला घेतली? म्हणजे याचाच अर्थ या ठिकाणी मांडा की, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी माहिती तुम्हाला बरोबर दिलेली नाही आणि खरोखरच ती भुसंपादन करायचे काय हे तुम्ही मांडा.

**रिटा शहाः-**

मा. महापौर मॅडम, हा विषय आरक्षणबद्दलचा ह्यापुढे आपल्या महासभेत आला होता. तेव्हा मी उठून बोललेली होती. तेव्हा आरक्षण ज्या ज्या भूसंपादनावर आहे. तिथे बोर्ड लावायचा असा विषय होता. तेव्हा नाईक साहेब, मला वाटते आयुक्त होते. तेव्हा गंमत काय झाली की, हा विषय आपल्या सभेपुढे येण्याअगोदर म्हणजे मंजुरी मिळण्याअगोदर मंजुरी मिळालीच नव्हती. मंजुरी मिळायच्या अगोदर आपल्या महानगरपालिकेचे बोर्ड उचलून हा जो आपण सर्वे नंबर दिला तो सर्वे नंबर रात्रीच्या

रात्री कोणी जाउन लावला आणि महासभेत मी विचारले तर त्या माणसाचे नाव द्या. तेव्हा नाईकसाहेब बोलले की, मी नाव देणार आहे. कारण आज जो सर्वे नंबर आणला आहे. नेमका एकच सर्वे नंबर आणला आहे आणि त्या माणसाने आपल्याकडे पत्र दिलेले आहे. नकाशा पुट अप केला आहे. यु.एल.सी.ची ऑर्डर आताच धनेगावे साहेबांकडे दिलेली आहे. मग हा नेमका सर्वे नंबर कशाला? कोणाला त्याच्याशी वैयक्तिक दुश्मनी आहे आणि रात्री महानगरपालिकेचे बोर्ड उचलून जावून बोर्ड लावतात. तेव्हा पहिली माणसाची नावे दया. कारण हे फार चुकीचे प्रकरण चाललेले आहे आणि आपल्याकडे मॅडम, पहिला तुम्ही डेप्युटेशनचा विषय आणणार होते. ते डेप्युटेशनचा विषय आपण कॅन्सल केला आणि नंतर त्या डेप्युटेशनचा विषय आपण परत घेउ अशी मला तुम्ही आश्वासनही दिले होते. आजपर्यन्त डेप्युटेशनवरचा विषय आला नाही. तेव्हा डेप्युटेशनवरील कुठल्याही अधिकाऱ्याशी मला घेणं-देणं नाही. पण तेव्हा मी धनेगावेबददल पत्र टाकले होते की, हा माणूस एल.पी.सी. जमा नाही इथे. तर सहा महिने आपल्याकडे कामावर आहे. तर त्यांनी केलेली कामे व्हॅलीड आहेत की, इन व्हॅलीड आहेत. हा प्रश्न मी विचारला होता. तर हया धनेगावेवर मी आता आरोप करते. कारण ह्या माणसाला घेउन मी त्यांच्याकडे पत्रदेखील दिलेले आहे. माझ्याकडे देखील कॉपी दिलेली आहे. त्यांना आणि कमिशनरना मीसुध्दा भेटते. कमिशनर साहेबांनी मला असे उत्तरदेखील दिले होते की, ते स्वतः डेव्हलप करणार असेल तर महानगरपालिकेला काही घेणं-देणं नाही. त्यांनी स्वतःच प्रकरण आपल्याकडे पुट अप केलेली आहे. तरी पण हे कुठल्या पध्दतीने आणले गेले आहे. तर मला त्याचा जबाब पाहिजे आणि त्या माणसाचे नाव पाहिजे. त्यांनी जाउन रात्रीच्या रात्री बोर्ड लावलेले आहे. त्याचे मला नाव पाहिजे. नाहीतर त्याच्यावर तुम्ही गुन्हा दाखल करा.

**मिलन म्हात्रेः-**

महापौर मॅडम, या ठरावामध्ये प्रकरण क्र. ४१ मध्ये परत जे पाण्याच्या अगोदरच्या चर्चेत झाला तोच प्रकार या ठिकाणी झालेला आहे.

**रिटा शहाः-**

महापौर मॅडम, हर टाईम मै महासभा मे उठती हूँ । ये विषय मैने धनेगावे का उठाया था । उनका एल.पी.सी. ऑर्डर यहाँ जमाही नही था । कमिशिनर साहब ने मुझे बोला था की, वो वेटिंगमें है । वेटिंगमें नही तो उनकी कोकण भवन में ट्रान्सफर हो गई थी । उन्होने वहाँ चार्ज लिया नही था । चीफ मिनिस्टरने उनको ऑर्डर दिया है । वो ऑर्डर के उपर यहा आये थे । छह महिने पगार मिला नही । मुझे इन्टरनल ऑडिटरने थे जबाब बताया था । बाद में इन्टरनल ऑडिटर की ट्रान्सफर हो गई । और दुसरे साहब आये । तो इसके अंदर क्या है वो सच्चाई सामने लाये । महासभा में धनेगावे की मैं मागणी करती हूँ । की धनेगावे को तीन साल यहाँ पुरे हो गये है । उनको यहा रखने की कोई जरुरत नही । उनकी यहाँसे ट्रान्सफर करने की महासभा में मागणी करती हूँ ।

**मिलन पाटीलः-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे, मी हया आरक्षणाच्या बाबतीत ११/०९ रोजी पत्र दिलेले आहे. त्या पत्राचे अजून मला एकसुध्दा उत्तर आलेले नाही आणि हे आरक्षण आता जे टाकलेले आहे. तर हया आरक्षणाच्याबरोबर त्या आरक्षणाचेसुध्दा मी त्याचवेळी पत्र दिलेले आहे. त्याच्यानंतर मी हे आरक्षणाचे पत्र दिले आहे आरक्षण क्रमांक ५७ आणि ९१ डी.पी. रोड जो मागचा आहे. त्याचेदेखील दिले होते. आता याची जर आवश्यकता भासते. तर त्या रोडची आवश्यकता भासत नाही का? आणि त्या रोडसाठी एक लाख आठ हजार रुपये बजेटमध्ये तरतूद केलेली आहे आणि ती तरतूद असताना जवळजवळ सहा महिने निघून गेलेले आहेत आणि त्यानंतर ती तरतूद जर झाली नाही तर त्याला कुठले अधिकारी जबाबदार आहे. आता हा जो विषय होता आणि या विषयाचे जर एवढे गांभीर्य होते. मग हा विषय का घेतला नाही? आणि त्या रोडवर कितीतरी आरक्षणे आहेत. भाजीमार्केट आहेत. मच्छी मार्केट आहेत. दुसरी आरक्षणे आहेत. तर ती आरक्षणे का घेतली नाहीत आणि या रोडपासून त्याच्याकरिता जो डी. पी. रोड काढलेला आहे. तो मेन रोडला गावाला त्रास होणार नाही. म्हणून तो बाहेरच्या बाहेर उत्तन वगैरे करिता किंवा बाहेर जे जाणारे लोक आहेत ऐसलवर्ल्डला वगैरे. तिथुन तो बाहेरच्या बाहेर रोड आहे. स्टेशनवर येण्याकरिता मोठी जी अवजड वाहने आहेत. त्याच्याकरिता तो रोड काढलेला आहे. त्याची आवश्यकता वाटत नाही आणि ही आपल्याला नाटयगृहाची आवश्यकता कशाला वाटते? आणि त्याच्यामागे उददेश काय तर हया माझ्या पत्राचेदेखील अधिका-यांनी उत्तर अजूनपर्यंत दिलेले नाही. तर पहिला हा रोडचा विषय त्यांना गांभीर्याचा वाटला नाही. तर पुढे विषय घेताना या रोडचा त्यांनी विचार करावा आणि हा विषय त्यांनी घ्यावा.

**आसिफ शेखः-**

सन्मा. महापौर मॅडम, या ठिकाणी प्रकरण क्रमांक ४१ मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेत आरक्षण क्रमांक २६२ टाऊन पार्क आणि आरक्षण क्रमांक २६३ टाऊन हॉल ड्रामा थिएटर आणि आरक्षण क्रमांक २६४ नगरपरिषद कार्यालय व आरक्षण क्रमांक २६४(अ) वाहनतळ या आरक्षणाखालील जागा भूसंपादित करुन विकसित करणेस प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळण्याबाबत. तर सन्मा., माजी सभापती आणि विद्यमान ज्येष्ठ सदस्य मोहनजी पाटील यांनी या संदर्भात ठराव मांडलेला आहे आणि आमचे ज्येष्ठ सदस्य महेन्द्रसिंगजी चौहान यांनी त्याला अनुमोदन दिलेले आहे.

**मिलन म्हात्रेः-**

याबाबत अजुन चर्चा बाकी आहे. चर्चा पूर्ण झाल्यानंतरच ते व्हायला पाहिजे.

**आसिफ शेखः-**

चर्चा आपण करावी. परंतु, ठराव झालेला आहे. आता मला बोलू दयावे. आपल्याला जे काही बोलायचे ते नंतर बोलावे.

**मिलन म्हात्रेः-**

ठराव चर्चेच्या अगोदर होतो कसा काय?

**आसिफ शेखः-**

सन्मा. सदस्य श्री. मिलनजी म्हात्रे आपण बोलत होता. त्यावेळी मी हस्तक्षेप केला का? आपण परीने बोलावे. मा. महापौर साहेब, मला या ठिकाणी असे म्हणायचे आहे की, आपल्या एकूण जेवढी आरक्षणे आहेत. मला वाटते एकूण ३८४ आरक्षणे आहेत. ती सगळी आरक्षणाचे प्रस्ताव हे एकत्रित घ्या आणि एकत्रितपणे विषय पुढच्या महासभेत घ्या. जेणेकरुन म्हणजे सर्वांचे आरक्षणे हे भूसंपादित करता येईल आणि तेव्हाच विस्तृतपणे चर्चा करा.

**रिटा शाहः-**

मा. महापौर मॅडम, हा विषय तुम्हा पुढे ढकलला हे मान्य आहे. परंतु, हया माणसांने स्वतः डेव्हलप करायचे तसे पत्रही मी स्वतः दिले आहे. त्याचा नकाशाही पुटअप केलेला आहे. यु.एल.सी. ऑर्डर पुटअप केलेली आहे. आपल्याकडे मेन प्रश्न हा उदभवतो की, जेव्हा आरक्षणाचा मुददा उठला होता. तेव्हा मी प्रश्न विचारला होता की, जेवढे जेवढे भूसंपादन आरक्षित आहेत. त्या भूखंड मालकांना आपण विश्वासात घेउन हे काम करावे. तेव्हा अे.टी.पी. डिपार्टमेन्टचे पत्र यांच्याकडे गेले होते. तेव्हा त्यांना घेउन मी मा. कमिशनर साहेबांना मी भेटली होती. तेव्हा त्यांनी सांगितले की, तुम्ही स्वःत डेव्हलप करत असाल तर आम्ही तुम्हाला मदतही करु. तुमचे कुठे अडकत असेल तरी त्यानंतरही हा विषय या ठिकाणी आणलेला आहे. अे.टी.पी. डिपार्टमेन्टने कुठल्या हिशोबाने हा विषय आणला आहे आणि श्री. धनेगावेचा विषय काढला होता. त्यावेळेला मला काहीच उत्तर दिले होते की, चौकशी करु. त्यांना तीन वर्षे पूर्ण झालेली आहेत. तरी त्यांना ट्रान्सफर करावे, अशी माझी मागणी आहे. या सभागृहात मी मागणी करत आहे.

**मिलन म्हात्रेः-**

महापौर मॅडम, या विषयामध्ये जशी मागे जी पाणी विभागाची चर्चा झाली. त्याचप्रकारे या संपूर्ण विषयामध्ये फक्त आरक्षण क्रमांक हेच फक्त दिले आहेत. हा विषय परत घेते वेळी नेमके काय काय तुम्हाला करायचे आहे ते मी सांगतो. यामध्ये कुठल्याही प्रकारचा सर्वे नंबरचा उल्लेख नाही. प्रत्येक सर्वे नंबरमधून किती क्षेत्र तुम्ही बाधित करणार आहात किंवा ताब्यात घेणार आहात. याचा उल्लेख नाही आहे. तसेच, विषयपत्रिकेमध्ये या ज्या प्रकरण क्रमांक ४१ च्या विषयामध्ये आरक्षणातील जागा सार्वजनिक प्रयोजनाकरिता हा शब्द पाहिजे. या नियमाच्या पुस्तकामध्ये सार्वजनिक प्रयोजन म्हणजे काय? याचा उल्लेख पूर्णपणे दिलेला आहे. पब्लिक परपज याचा दृष्टीकोन तो होता आणि बाजूला हॉस्पिटलचेदेखील आहे. म्युनिसिपल हॉस्पिटल, आरक्षण क्रमांक ३०२, सर्वे नंबर १५३, ३९२ एवढी महत्वाची बाजू बाजूला असताना त्याच्यालगतचे सगळे घेतले गेले. फक्त हॉस्पिटलचा याच्यात उल्लेख केला गेला नाही, अशा चुका मेहेरबानी करुन परत विषयपत्रिकेवर येणार नाहीत. याची दक्षता घ्या. हया सर्वांचा उल्लेख करा आणि परत आपल्याला तेव्हा केव्हा आणायचा आहे तेव्हा हा विषय घ्यावा.

**मिलन पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे, हे जे आरक्षण आपण भूसंपादन करणार तर हा विषय घेताना गांभीर्य लक्षात ठेवा की, जे आपण आता भूसंपादन करणार आहोत आणि त्या भूसंपादनाच्या बदल्यात ज्या जमीन मालक किंवा जे कोणीही बिल्डर असतील त्या व्यक्तीना आपण जो टि.डी.आर.च्या ज्या आपल्या नियमावलीमध्ये तरतूदी ज्या केलेल्या आहेत. त्या एकदम जाचक आहेत

आणि त्या जाचक तरतुदी असल्या कारणाने आपण जे काही टी.डी.आर. जे भूसंपादन ज्याची जमीन करणार आहोत. ते जमीन मालक भूसंपादन तो टी.डी.आर. आपला घेणार नाही आणि आपल्याला भूसंपादन करुन देणार नाहीत. याची नोंद घ्यावी. तर ते टी.डी.आर. जे आहेत. त्यामध्ये सुधारण्याचा पण विषय घ्यावा आणि तो टी.डी.आर. सुधारण्याचे जे त्यांना टी.डी.आर. देणार आहोत. त्याच्यामध्ये आपण सुधारणा करुन आणि ते नियम शिथिल करुन मग त्यांना टी.डी.आर. दयावा असे जाचक नियम आहेत. ते थोडे आपण काढावे आणि महासभेने त्यांना मंजुरी दयावी.

**प्रकरण क्र. ४१ :-**

मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील आ.क्र. २६२ टाऊन पार्क, आ.क्र.२६३ टाऊन हॉल ड्रामा थियटर आणि आ.क्र. २६४ नगरपरिषद कार्यालय व आ.क्र. २६४(अ) वाहनतळ ह्या आरक्षणाखालील जागा संपादित करुन विकसीत करणेस प्रशासकिय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. २७ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना दि.१४.५.९७ रोजी मंजुर झाली असुन दि.१५.७.९७ पासुन अमलात आली आहे. मंजुर विकास योजनेत आ.क्र.२६२ टाऊन पार्क प्रस्तावित असुन विकास योजना अहवालानुसार आरक्षणाखालील जागा खाजगी असुन सदर आरक्षणाचे क्षेत्र ४.४८ हे. आहे. सदर आरक्षण विकसित करणेस समुचित प्राधिकरण मिरा भाईंदर नगरपरीषद दर्शवले आहे. सदर क्षेत्रापैकी विद्यमान शिवार तलावाचे क्षेत्र ७५०० चौ.मी. असुन विकास हक्क हस्तांतरणाद्वारे ४००० चौ.मी. हस्तांतरण झालेली आहे. मिरा भाईंदर (पुर्व) शहरासाठी मोठया क्षेत्राचे हे आरक्षण असुन पुर्वेचा भाग सध्या विकसनक्षम आहे व लोकसंख्येच्या मानाने हे आरक्षण विकसित झाल्यास नागरीकांना सुविधा उपलब्ध होऊ शकेल. सदर कामासाठी सन २००३-०४ च्या मंजुर अंदाजपत्रकात १.२५ कोटीची तरतुद करण्यात आली आहे. सदर आरक्षणाखालील जागा खाजगी असल्यामुळे ती प्रथमतः संपादीत करणे आवश्यक आहे. याशिवाय सदर आरक्षणालगत आ.क्र.२६३ टाऊन हॉल, ड्रामा थिअेटर, आ.क्र.२६४ महानगरपालिका कार्यालय व आ.क्र.२६४ अ पार्किंग ही आरक्षणे प्रस्तावित आहेत. सदर आरक्षणांचे विकास योजना अहवालानुसार क्षेत्र अनुक्रमे ८३२० चौ.मी, ९२८० चौ.मी. व ३२०० चौ.मी. आहे. शहराला सोयीसुविधा पुरविण्यासाठी सदर आरक्षणांचा विकास करणे जरूरीचे आहे. खाजगी जागेचे संपादन विकास हक्क हस्तांतरणाच्या तरतुदीप्रमाणे किंवा खाजगी वाटाघाटीद्वारे करता येऊ शकते. वरील दोन्ही पध्दतीप्रमाणे सदर जागा जलदगतीने संपादीत होऊ न शकल्यास भुसंपादन अधिनियम १८९४ मधील तरतुदीनुसार प्रस्ताव सादर करून संपादीत करणे जरूरीचे आहे.

सदरचा विषय हा काही आरक्षणाच्या मर्यादेत आहे व विस्तृत टिप्पणी दिसून येत नाही म्हणून सदरचा विषय पुढील सभेत घ्यावा असे सर्वानुमने ठरले.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. महेंद्रसिंग चौहाण.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**आसिफ शेखः-**

सन्मा. महापौर मॅडम, आपल्या सर्वांचेच लाडके आदरणीय नेते ज्यांनी सर्वांना बरोबरीने घेऊन जात-पात, धर्म, संप्रदाय, सगळया जातीतील लोकांना बरोबर घेउन या शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्न केले, झटलेले असे या शहराचे प्रथम नगराध्यक्ष आदरणीय गिल्बर्ट जॉन मेंडोसा साहेब. तसेच, तत्कालीन मुख्याधिकारी श्री. लक्ष्मणरावजी लटके यांची न्यायालयाने लाचलुचपत प्रकरणातुन निर्दोष मुक्तता केली. त्याबददल ही सभा त्यांचे अभिनंदन करित आहे. शेवटी म्हटले जाते की, भगवान के घर में देर है । अंधेर नही । त्याप्रमाणे न्यायालयाचा हा निर्णय अभिनंदनीय आहे आणि सच्चाई का बोलबाला, झुठे का मुँह काला, ब-याच लोकांनी त्यांना नाहक त्रास देण्याचा प्रयत्न केला. अडकविण्याचा प्रयत्न केला. तर त्यांनाही सच का सच और झुठ का झुठ, दूध का दूध, पानी का पानी हो गया, हा न्यायालयाच्या निकालाप्रमाणे सिध्द झालेले आहे आणि न्यायालयाने त्यांना निर्दोष मुक्तता केल्याबददल त्यांचे या ठिकाणी अभिनंदनाचा ठराव मी मांडत आहे.

**जयंत पाटीलः-**

ही गोड बातमी आम्हाला पेढे देऊन जर केली असती तर दुग्ध शर्करा आला असता.

**आसिफ शेखः-**

नुसते पेढेच नाही. आम्ही आपल्याला जेवण देऊ आणि एक-दोन दिवसात कार्यक्रमाचे आयोजन करु या.

**अभिनंदन ठराव :-**

मिरा भाईंदर शहराचे प्रथम नगराध्यक्ष आदरणीय गिल्बर्ट जॉन मेंडोसा साहेब. तसेच, तत्कालीन मुख्याधिकारी श्री. लक्ष्मणरावजी लटके यांची न्यायालयाने लाचलुचपत प्रकरणातुन निर्दोष मुक्तता केली. त्याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करित आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४२ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईरः-**

प्रकरण ४२ मध्ये जी भूमापनासाठी मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये मागणी खाजगी संस्थेमार्फत करुन घ्यायची आहे. ही मागणी आपण शासनाकडे केलेली होती का खाजगी संस्थाकडून आपण जे भूमापन करणार आहोत. त्याची मागणी आपण शासनाला केलेली होती का?

**शेंडेः-**

मा. महापौर महोदय, मिरा भाईंदर शहराचे भूमापन करण्यासाठी मागील वर्षापासून आपल्या तत्कालीन नगरपालिकेतर्फे हा प्रस्ताव भूमी अभिलेखा विभागाकडे पाठविण्यात आला होता. परंतु, ते काम अद्यापही सुरु झालेले नाही आणि त्याबाबत जो पत्रव्यवहार चालू होता. तर त्या पत्रव्यवहाराच्या माध्यमातूनच भूमी अभिलेख विभागाने स्वतःच हे काम खाजगी संस्थमार्फत करुन घेता येउ शकते. अशाप्रकारचे पत्र आपल्याला पाठविलेले आहे आणि सन २००० साली खाजगी संस्थेकडून नगर भूमापनाचे काम करण्यासाठी नियमामध्येसुध्दा त्यांनी दुरुस्ती केलेली आहे आणि त्या आधारे हा प्रस्ताव आम्ही येथे आणलेला आहे आणि अशाप्रकारे खाजगी संस्थेमार्फतच करुन घ्यावा अशी विनंती आपल्या महापालिकेतर्फे करण्यात आलेली नव्हती. पण सिटी सर्वेचे काम झाले पाहिजे, अशाप्रकारचा प्रस्ताव ब-याच वर्षापासून आपण पाठविलेला आहे.

**शशीकांत भोईरः-**

अशी दुरुस्ती कोणत्या नियमामध्ये केलेली आहे, याची जरा माहिती दयावी.

**शेंडेः-**

याबददल महाराष्ट्र जमीन महसुल गाव, शहर व नगर भूमापन नियम १९६९ जो आहे. त्या नियमामध्ये सन २००० साली शासनाने दुरुस्ती केलेली असून नगर भूमापनाचे काम खाजगी संस्थेमार्फत भूमापनामार्फत शासनाच्या मंजुरीने करता येण्याची तरतूद केलेली आहे.

**शशीकांत भोईरः-**

ती दुरुस्ती आता आहे का? किंवा राजपत्रात प्रसिध्द केलेली आहे. ती दुरुस्ती अधिनियमामध्ये दिलेली आहे का?

**शेंडेः-**

दुरुस्तीची गॅझेटची प्रत आमच्याकडे उपलब्ध आहे. आम्ही आपल्याला माहितीसाठी देउ शकतो.

**शशीकांत भोईरः-**

ती प्रत प्रत्येक सदस्यांना दयावी. त्याचप्रमाणे आपण नगरपालिका अस्तित्वात असताना खाजगी सर्वेअर श्री. राणे यांना २५ लाख रुपये देउन आपण हया मिरा भाईंदर शहराचा सर्वे केलेला होता तरी त्याचे काय झाले? त्याबाबत माहिती दयावी.

**शेंडेः-**

ते सिटी सर्वेचे काम झालेले नव्हते. त्यांना अनधिकृत बांधकामाच्या सर्वेक्षणासाठी मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे नेमण्यात आलेले होते. अनधिकृत बांधकामाचा सर्वे त्यांच्याकडून करण्यात आलेला होता आणि माझ्या माहितीप्रमाणे जवळपास सोळा लाखाचा खर्च झालेला होता.

**शशीकांत भोईरः-**

ज्यावेळी सर्व्हे केला त्यावेळी किती बांधकामे अनधिकृत निघाली आणि प्रशासनाने त्यावर काय कार्यवाही केली.

**शेंडेः-**

त्याबाबतचा रिपोर्ट मा. उच्च न्यायालयात सादर झालेला आहे. त्यावेळी किती बांधकामे होती? त्याबददलची माहिती सद्यस्थितीत माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु, तो विषय हा वेगळा आहे आणि मा. उच्च न्यायालयात सादर झाला असल्यामुळे त्याबाबत आम्ही या ठिकाणी माहिती दिलेली नाही.

**शशिकांत भोईरः-**

संबंधितावर काय कारवाई झाली किंवा नाही? ज्यांनी अनधिकृत बांधकाम केले आणि आपल्या सर्वेमध्ये आढळलेले आहे. त्याच्यावर काय कारवाई झाली का?

**शेंडेः-**

मा. उच्च न्यायालय त्याच्याबददल योग्य तो निर्णय घेणार आहेत. त्याच्यामुळे त्याबाबत सद्य स्थितीत काही बोलणे योग्य होणार नाही.

**शशिकांत भोईरः-**

यामध्ये आपण दुसरा एक उल्लेख केलेला आहे की, विस्तारित क्षेत्राचा आपल्याला सर्वेक्षण करायचे आहे. ते नक्की विस्तारित क्षेत्र कोणते? त्याची माहिती दयावी.

**शेंडेः-**

विस्तारित नाही. आम्ही आमच्या टिप्पणीमध्ये दिलेले आहे. ७९.०४ चौ. किलोमीटर हा पूर्ण मिरा भाईंदर महानगरपालिका एरिया क्षेत्रफळ आहे आणि पूर्ण मिरा भाईंदर महापालिका क्षेत्राचा सिटी सर्वेचे काम करणे अपेक्षित आहे.

**रतन पाटीलः-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, सिटी सर्वेचे जे काम नगरपालिका असताना झालेले आहे असे मला समजते. सिटी सर्वेचे काम झालेले आहे की नाही?

**शेंडेः-**

१९७२ साली काही क्षेत्राचे गावठण क्षेत्रापुरता मर्यादित सर्वे झालेला होता. परंतु, त्याच्यामध्ये पण आताच्या परिस्थितीत बरेचसे बदल झालेले आहेत. त्यामुळे संपूर्ण क्षेत्राचा सिटी सर्वे सध्याच्या स्थितीत करुन घेणे जास्त आवश्यक आहे.

**रतन पाटीलः-**

पण कुठे कुठे झालेला आहे. याची नोंद आपल्याकडे आहे का? कुठले-कुठले सर्वे केले?

**शेंडेः-**

माझ्या माहितीप्रमाणे भाईंदर गावठणचा सर्वे झालेला होता आणि अजून एक कुठले गाव आहे. त्याची माहिती आता माझ्याजवळ नाही.

**रतन पाटीलः-**

अजून किती ठिकाणे बाकी आहेत अंदाजे.

**शेडेः-**

आता संपूर्ण शहराचा सिटी सर्वे करायचा विषय आहे. संपूर्ण शहराचा सिटी सर्वे एकत्रितरित्या करुन घेणे आवश्यक आहे. कारण की, तो जो सर्वे झालेला आहे. त्याचा आपण उल्लेख केला तो साधारणतः सन १९७२ च्या कालावधीमध्ये झालेला होता. त्यामध्ये कालानुरुप बराच बदल झालेला आहे. तो बदलसुध्दा आता सिटी सर्वे करताना विचारात घेणे आवश्यक आहे. त्याच्यामुळे संपूर्ण क्षेत्राचे सिटी सर्वे करणे गरजेचे आहे.

**रतन पाटीलः-**

आपल्या महापालिककडे भूमापन सर्वेअर नाही आहेत का?

**शेंडेः-**

भूमापनाचे काम सिटी सर्वे डिपार्टमेन्ट जे आहे. गव्हर्नमेन्टचे त्याच्यामार्फतच केले जाते. महापालिकेतर्फे केले जात नाही.

**मिलन पाटील:-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, आपण जो आता सिटी सर्वे करुन घेणार आहात. त्याबाबत सिटी सर्वे आणि सात-बारा याच्यामध्ये जो एरिया आहे. त्यामध्ये तफावत आहे. तर ती तफावत ही आपल्याला काढून आपण तिकडे नियम काहीतरी ठरवून दयावे लागतील. कारण ही तफावत आपल्याला काढून दयायची आहे. तर त्याकरिता आपल्याला आणखी पैसे मोजावे लागतील. सात-बारा आणि सिटी सर्वे याच्यामध्ये दोन्ही एरियामध्ये तफावत आहे. आजसुध्दा ती अस्तित्वात आहे आणि येणार आहे. आज मी सांगीन की, माझे क्षेत्रफळ पाच गुंठे आहे आणि सिटी सर्वेने ते मापले तर ते सहा गुंठे पण होते. मग ते सहा गुंठ्याचे क्षेत्रफळ असणार. त्यामध्ये एक गुंठा सात-बाराचे, पाच गुंठा बोलतो आणि ते क्षेत्रफळ जर सिटी सर्वेने मोजले तर सहा गुंठे पण कदाचित निघेल किंवा चार गुंठेसुध्दा निघू शकते. तर ते क्षेत्रफळ कोणाचे आलेले आहे. हे दाखवायला लागेल. हे त्यामध्ये आपण नियम ठरवून देउ. त्यामध्येच हे त्याला दाखवायला लागेल की, हे क्षेत्रफळ कुठले आलेले आहे आणि त्यामध्ये अतिक्रमण कुठले असतील किंवा रोडमध्ये आहेत. रोड मार्जिनमध्येसुध्दा काही घरे झालेली आहे. तर त्या सिटी सर्वेमध्येसुध्दा रोड मार्जिनमध्ये ते सुध्दा येणार आहेत. तर त्यांच्यामध्ये ते आपण नियम करुन घेउ. तर या एका पैशामध्ये सविस्तर चित्र खुले करुन दाखविले पाहिजे. अन्यथा महानगरपालिकेला डबल भुर्दंड बसेल तर ही नियमावली करुनच याच्याशी तुम्ही करार करायचा अशा माझी सुचना आहे.

**शेंडे:-**

आता जो सर्वे होणार आहे. तो प्रत्यक्ष जागेवर मापून सर्वे होणार आहे. त्यामुळे क्षेत्रफळाच्या ज्या काही चुका असतील त्या चुकासुध्दा या सर्वेमध्ये दुरुस्त होतील आणि सनद देताना त्या मालकीचासुध्दा त्याच्यामध्ये तपासणी होउन निर्णय होणार आहे. त्याच्यामुळे क्षेत्रफळाच्या तफावतीसाठी परत वेगळा सर्वे करण्याची गरज पडणार नाही.

**रोहिदास पाटील:-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, सनद देते वेळी त्याचे नक्की सूत्र काय राहते. ते सात-बाराच्या उताऱ्याचे राहते की पझेशनचे राहते.

**शेंडे:-**

त्याचे मालकीप्रमाणे केले जाते. मालकी ज्यांची असेल सात-बारा असेल किंवा प्रॉपर्टी रजिस्टर कार्ड असो. त्याप्रमाणे, सर्वे करुन त्याच्या हददी वगैरे निश्चित केल्या जातात. मालकी निश्चित केली जाते.

**रोहिदास पाटील:-**

भाईंदरमधील जवळजवळ ७० टक्के जमीनी आहेत. त्या आजच्या घटकेला उताऱ्याचा मालक वेगळा आहे आणि पझेशनला वेगळा मालक आहे. त्याच्या ताब्यात त्या जमिनी आहे. तो कसतो, वापरतो, डेव्हलप करतो याची नोंद कशी घ्यायची. फक्त उतारा म्हणून तुम्ही सिटी सर्वेचा नकाशा देणार की आता हयांचे पझेशन अस्तित्वात आहे असे देणार काय? किंवा त्याच्यावर अतिक्रमण आहे. मघाशी सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी सांगितले, चार गुंठे की सहा गुंठे तर असे होते की, उताऱ्याप्रमाणे एवढी आणि पझेशनप्रमाणे एवढी असे दाखविणार की तसे दाखविणार.

**शेंडे:-**

त्यामध्ये डिटेल सगळे येते आणि जे जेव्हा सर्वे होतो. त्यावेळी त्यांनी जे काही जमीन मालक आहे आणि जे काही वहिवाटदार आहेत. त्या सगळयांचे ऑब्जेक्शन विचारात घेउन सिटी सर्वे ऑफिसर त्यांनी निर्णय घेत असतात आणि तशी जर परिस्थिती असेल तर इतर हक्क म्हणून एक कॉलम त्यामध्ये असतो. इतर हक्कामध्येसुध्दा त्याची नोंद केली जाते.

**रोहिदास पाटील:-**

मला तेच म्हणायचे आहे की, ज्यावेळी हे होईल तर ते कसे होते की, जो माणूस पुढे असतो. त्या कुटुंबातील म्हणा किंवा त्या विभागातील म्हणा. त्या सिटी सर्वेच्या वेळी त्याचे नाव लागून जाते आणि जो खरोखर उपभोक्ता असतो. त्याला ते माहितीच पडत नाही. आज सिटी सर्वे होतो आहे. मग त्याची नोंद ही होत नाही आणि झाल्यानंतर पब्लिश झाल्यानंतर त्याच्यानंतर मोठमोठे वादविवाद तयार होतात की, ही जमीन माझी होती. माझ्या ताब्यात आहे. मी इतके वर्ष कसतो आहे असा कुठेतरी त्याचा निश्चित जर ते देणार असू. सर्वे करण्याच्या अटी-शर्तीमध्ये काय देणार आहोत? याचीदेखील जाणीव व्हायला पाहिजे. आपण त्याला काय देणार? फक्त जमीन मोजायची आहे म्हणून

देणार आहात की, त्याच्यामध्ये हया हया पध्दतीने सर्वे व्हायचाय, अशा गाईडलाईन आपण देणार आहोत.

**शेंडे:-**

याच्यामध्ये मोजणी होताना मोजणी करुन जागेच्या हददी निश्चित करणे आणि त्याची मालकीसुध्दा निश्चित करणे हा सुध्दा विषय त्याच्यामध्येच आहे. तर त्यामुळे ते दोन्ही विषय एकत्रितरित्या त्यांच्यातर्फे हँडल केले जातील आणि हे जे खाजगी संस्थेमार्फत काम करायचे ठरविले आहे. हे काम आपल्या महापालिकेच्या आणि सिटी सर्वे डिपार्टमेन्टच्या सुपरव्हिजनखाली होणार आहे आणि हया कामाच्या एजन्सी महापालिकेने निश्चित करायचे आहे. त्यावेळी जर आपले काही विषय असतील तर त्या अटी-शर्तीमध्ये ते घालता येउ शकतील.

**रोहिदास पाटील:-**

मी तेच म्हणतो की, ज्या ठिकाणी पाण्याचे नाले आहेत. ती सरकारी जमीन म्हणून नोंद आहे. पाण्याचा नाला म्हणून नोंद आहे आणि त्या ठिकाणी गाळे मिळतील, बिल्डिंग मिळेल, काहीही मिळेल, काहीही असू शकेल त्या ठिकाणी. तर त्याचे वर्गीकरण किंवा विश्लेषण हे आपल्या नोंदीमध्ये कसे येणार आहे. कारण हा इतके वर्ष न झालेला विषय आहे. नवा चालू होणार आहे. त्यामुळे त्याच्या नक्की गाईडलाईन काय व्हायला पाहिजे की, हया पध्दतीने जर कमीत कमी म्हणजे जास्तीत जास्त पारदर्शक आणि कमीत कमी त्यांचे उपदव्याप किंवा अडचणी किंवा सुचना किंवा तक्रारी कमीत कमी व्हायला पाहिजे.

**शेंडे:-**

ती त्याची जी पध्दत आहे. आता जो मी नियम वाचून दाखविला महाराष्ट्र महसुल नियम त्याच्यामध्ये याबाबत सर्व विस्तृत तरतुदी आहेत आणि त्या तरतुदीच्या माध्यमातूनच त्यांनी त्याचे डिसीजन घ्यायचे असतात आणि महापालिकेच्या सुपरव्हिजनरवाली हे काम होत असल्यामुळे अशा काही तक्रारी असतील त्या तक्रारी आपण त्यावेळी त्यांना सांगू शकू.

**रोहिदास पाटील:-**

साहेब, आपण त्याचे इंजिनियर आहात. सभागृहात इंजिनियर नाहीत. आपण अनेक ठिकाणी या प्रकारचे काम केलेले असेल किंवा अनेक कामे करताना अनुभव आलेले असतील त्यामुळे कमीत कमी तक्रारी येतील अशा पध्दतीने आपण काम होण्याच्या दृष्टीने हया हया सुचना आपण देऊ या, असे सांगितले तरीही पुरेसे होईल. म्हणजेच ते कलम तुम्ही वाचून दाखविले. महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार तरी त्या नियमानुसारच्या कलमानुसार काम चालते तर एवढया भानगडी झाल्या नसत्या. सतत त्याच्यामध्ये जे प्रॅक्टीकल असते. प्रॅक्टीकलमध्ये भानगडी होत असतात. त्यामुळे नको तो प्रसंग येतात. त्या दृष्टीने आपली महापालिका काय दखल घेईल. जर असा ठराव झाला किंवा खाजगी ठेकेदाराला हे सर्वे करायला दयायचे तर त्याचे राईटस किती? महापालिकेचे राईटस किती? त्यांचे महापालिकेचे त्यामध्ये सहकार्य कसे राहिल. पब्लिकमध्ये येणाऱ्या सुचना कोण स्विकारेल?

**शेंडे:-**

खाजगी संस्था ज्या आहेत ते सिटी सर्वे डिपार्टमेन्ट आणि महापालिका यांच्या सुपरविझनखाली काम करणार आहेत. त्यामुळे आपण ज्या खाजगी संस्था नेमणार आहोत त्याचे अधिकार असायचे काही प्रश्न नाही.

**रोहिदास पाटील:-**

त्याच्या अधिकारांचा मी विषय मांडलाच नाही. ॲप्रोच व्हायचे असेल तर आपली कोणती कमीटी त्या तक्रारी घेतील. जसे टॅक्सेशनच्या वेळी कमिटी होती. त्यांना तुम्ही तक्रारी दया. त्यांचे रिव्हॅल्युएशन होईल, अशाप्रकारे याच्यामध्ये या सुचना येतील. त्या कोणाकडे दयायच्या. त्याची ॲथॉरिटी आपण देणार का?

**शेंडे:-**

याच्यामध्ये मालकीबददलच्या आणि हददीबददलच्या ज्या तक्रारी आहेत. त्या तक्रारी लॅन्ड रेकॉर्ड डिपार्टमेन्टचे जे अधिकारी आहेत. त्यांनी त्या सोडवायच्या असतात.

**रोहिदास पाटील:-**

महापालिकेचा काही संबंध नाही ना त्याच्याशी.

**शेंडे:-**

महापालिका त्यांना सुचना करु शकते.

**रोहिदास पाटील:-**

महापालिकेच्या अधिका-यांचा किंवा सभागृहातील कोणत्याही सदस्यांचा त्याच्याशी काही डायरेक्ट संबंध येणार आहे कि नाही?

**शेंडे:-**

महापालिका म्हटल्यानंतर आपला संबंध येईल. आपल्या ज्या काही सुचना असतील. त्यावेळी त्यांना त्या सांगण्यात येईल किंवा अटी-शर्तीमध्ये तसे आपल्याला घालता येऊ शकेल.

**रोहिदास पाटील:-**

आपण ज्या काही अटी-शर्ती घालणार त्याच्यामध्ये कमीत कमी तक्रारी येतील, असा काही तुमचा अनुभव असेल तर तो सांगावा.

**शेंडे:-**

हे जेव्हा आपण खाजगी संस्था नेमण्यासाठीचा जो विषय येईल तो शासनाच्या मंजुरीनंतर येणार आहे. त्यावेळी काय अटी-शर्ती करावयाच्या ते आपल्याला ठरविता येईल.

**रोहिदास पाटील:-**

आता फक्त प्रस्ताव येईल.

**शेंडे:-**

आता शासनाच्या मंजुरीसाठी हा प्रस्ताव पाठवायचा आहे. मंजुरी आल्यानंतर त्याचे एजन्सी नेमण्याचे काम वगैरे आपल्याला महानगरपालिकेतर्फेच करावे लागणार आहे.

**रोहिदास पाटील:-**

शासनाकडे मंजुरीसाठी पाठविते वेळी आपण आपला कोणता प्रस्ताव पाठवायचा फक्त आम्हाला खाजगी ठेकेदाराला दयायचे आहे. असेच दयायचे आहे की, या कंडिशनमध्ये खाजगी ठेकेदाराला दयायचा आहे.

**शेंडे:-**

अटी-शर्ती आपण नंतर ठरवायच्या आहेत. आताच ठरवायची गरज नाही. खाजगी संस्थेमार्फत करायचे की, भूमी अभिलेख विभागामार्फत करायचे हा विषय आहे.

**शिवमूर्ती नाईक:-**

मा. महापौर मॅडम, प्रत्येक शेतक-याला किंवा जमिनधारकाला प्रत्येक वेळी सिटी सर्वे करुन घेण्यासाठी डी.एल.आर. कडे जावे लागते. ती वेळ प्रत्येक नागरिकाला येउ नये. म्हणून संपूर्ण गावाचा सिटी सर्वे करुन घ्यायचा आहे. सिटी सर्वेची रक्कम भरुन संपूर्ण गावाचे सिटी सर्वे करुन घ्यायचा ठरवला तर त्याला फारच कालावधी लागेल. आता एखादया प्लॉटचे मोजणी करुन घ्यायचे असेल तर ॲडव्हान्समध्ये रक्कम भरतो आणि सात आठ महिने वाट बघतो. तरी मोजणी होत नाही. म्हणून शासनाकडे असलेला स्टाफ आणि होणारी दिरंगाई त्यामुळे मालकी हक्काचा वाद आणि सात-बारा आणि सिटी सर्वे आणि त्या सात-बारावर कितीतरी पावर ऑफ ॲटर्नी झालेल्या आहेत. ही सर्व कागदपत्र ज्यावेळेला मोजणी करायला येतील त्यावेळेला ती मोजणी करणाऱ्यांना तो रेकॉर्ड दाखवायचा आहे. ते रेकॉर्ड सिटी सर्वे मोजणी झाल्यानंतर प्रत्यक्षात पूर्णपणे रेकॉर्ड डी.एल.आरच्या मंजुरीसाठी जाईल आणि त्यांनी मंजुर केल्यानंतर ऑब्जेक्शन मागवतील. काही मालकी हक्क राहिला असेल का? ज्याच्याकडे काही रेकॉर्ड असेल तर सादर करा. ते रेकॉर्ड योग्य असतील त्याप्रमाणे दुरुस्त होतील. प्रत्यक्ष जागेवर जाउन सिटी सर्वे करणार. सिटी सर्वेकडे असलेला स्टाफ कमी पडतो. एकेका ठिकाणी मोजणी करायला आठ ते नउ महिने लागतात. म्हणून संपूर्ण गावाचा सिटी सर्वे करुन घ्यायचा आहे आणि गावचा संपूर्ण सिटी सर्वे झाल्यानंतर ज्या मालकाची मोजणी केली. त्याचे जे सिटी सर्वे नोट आहेत ते आपल्याकडे ठेवतात. आपण त्यांच्याकडून ठरवून दिलेली रक्कम घ्यायची म्हणजे जो आपण आता खर्च करणार आहोत. तो संपूर्ण सर्वे शेतकऱ्यांवर आणि जमीनधारकांवर विभागला जाईल आणि हे रेकॉर्ड तपासत असताना शासन एवढेच म्हणेल की, डी.एल.आरच्या मंजुरीला अधीन राहून खाजगी ठेकेदाराकडून करुन घ्यायला काही हरकत नाही. त्यांची मंजुरी मिळाल्यानंतर ठेकेदारांनी काय काय करायचे हे डि.एल.आर ठरवून आपल्याकडे देणार. मग आपण प्रस्ताव महासभेपुढे ठेवणार. मंजुरीच्या वेळेला आणि त्या अटीवर आपण ॲग्रीमेन्ट करणार आणि आपल्याला भीती अशी आहे की, प्रत्यक्षात वापरात असलेला मालक आणि सात-बारावर असलेला मालक वेगळा आहे. परंतु, प्रत्यक्षात मोजणी करताना ते रेकॉर्ड गोळा झालेला रेकॉर्ड खोटा आहे आणि आता आलेला रेकॉर्ड खरा आहे. तर हे नाव बदलून ते नांव लावतात. म्हणजे संपूर्ण रेकॉर्डला डी.एल.आरच्या ॲथॉरिटीने मंजुरी दिल्याशिवाय ते कायदेशीर होत नाही. सात-बारा किंवा त्यावर झालेले पॉवर ऑफ ॲटर्नी हे सर्व रेकॉर्ड ते मोजणी करताना गोळा करतात आणि खरा रेकॉर्ड मिळेल. त्याच वेळेला नोंद

करतात आणि नाही मिळाले तर परत ऑब्जेक्शन सेशन मागवतात. त्यावेळेला रेकॉर्ड सादर केला आणि त्यांना सत्यता पडताळून आली तर ते रेकॉर्ड चेंज करतात.

**रोहिदास पाटील:-**

संपूर्ण मिरा भाईंदर शहराचा सिटी सर्वे करायला आपण किती काळ अपेक्षित धरला आहे.

**शेंडे:-**

माझी अधिक्षक भूमी अभिलेख ठाणे यांच्याशी चर्चा झालेली होती. त्यांनी मला सांगितले होते की, हे काम साधारणतः दीड ते दोन वर्षामध्ये पूर्ण होउ शकेल.

**रिटा शाह:-**

मा. महापौर मॅडम, माझा पहिला प्रश्न असा आहे, सिटी सर्वे जेव्हा आपण करणार तेव्हा आपण पब्लिक डिक्लरेशन करणार कि नाही? दुसरे त्या अंर्तगत होणारा वादविवाद कोण सोडवणार?

**शेंडे :-**

सिटी सर्व्हे विभागाचे जे ॲथोरिटी लोक आहेत ते वाद सोडविणार.

**परशुराम पाटील:-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सिटी सर्वे जर एका सर्वे नंबरला तातडीने करायचा असेल तर त्याला पंधराशे रुपये चार्ज आहे आणि जास्त जास्त उशीरा सहा महिन्यात असेल तर पाचशे रुपये चार्ज आहेत. आताच शिवमुर्ती साहेबांनी सांगितले की, जो काही त्यांचा सिटी सर्वेचा चार्ज आहे. तो आपण ठरवणार पण किती ठरवणार त्याचे पंधराश रुपये, पाचशे रुपयाप्रमाणे आहेत. त्यांनी जास्त जर नगरपालिकेला आकारले तर आपण नागरिकांना तो दर नागरिकांना वापरणार का? आणि दुसरा मुददा असा आहे कि, ज्या पॉवर ऑफ ॲटर्नीच्या गोष्टी केलेल्या आहेत. पॉवर ऑफ ॲटर्नी ज्या माणसाला दिलेल्या आहेत त्याला नाही, ज्याने सात-बारावरती नाव आहे. त्याच माणसाला ऑब्जेक्शनसाठी बोलावले जाते. पॉवर ऑफ ॲटर्नीवाल्यांना कधी नोटीस दयायची नसते. नोटीस आपण सात-बारा उता-यावाल्यांना देतो. आपल्या नियमामध्ये किंवा सिटी सर्वेच्या नियमामध्ये किती पैसे नागरिकांना भरावे लागतात. कारण सिटी सर्वेने चार्ज जास्त लावला तर सामान्य नागरिकांना तो परवडणार नाही. म्हणून आपण पहिल्यांदा त्याचा खुलासा करावा.

**प्रफुल्ल पाटील:-**

मा. महापौर मॅडम, आपण सभागृहापुढे फार महत्वाचा विषय आणलेला आहे. गावातल्या शेतक-यांच्या, जमिनधारकांच्या भल्यासाठी असावा असे गृहित धरायला हरकत नाही. परंतु, अचानक जमाबंदी आयुक्तांना संचालक भूमी अभिलेख पुणे यांना अचानक स्वप्न पडले आणि मिरा भाईंदर महापालिकेच्या विस्तारीत क्षेत्राचे भुमापनाचे काम खाजगी संस्थेमार्फत करुन घेण्यासाठी त्यांनी हा प्रस्ताव स्वतःहून आणलेला आहे असे दिसते. एकंदरीत आजपर्यंत आम्ही कोणी मागणी केलेली नाही अशा प्रकारे सिटी सर्वे करण्याची किंबहुना ही करायलाही पाहिजे होती. अगोदर पण मला असे वाटते की, एक दुरुस्ती आलेली आहे. एका नियमामध्ये ते नियम आहेत. महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यु व्हिलेज टाउन ॲन्ड सिटी सर्वे रुल्स १९६९ या नियमाच्या सब नियम चार वर अशी दुरुस्ती केलेली आहे. ॲडीशन केलेले आहे. परंतु असे की जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख यांच्याकडून पदनिर्देशित करण्यात येईल अशा नियंत्रण व प्रभारी अधिकाऱ्याच्या अधीन राहून अशी भूमापनाची कामे एकतर पूर्णतः किंवा अंशतः खाजगी संस्थेमार्फत करुन घेण्यात येतील. तथापि, खाजगी संस्थेच्या भूमापनासाठी होणारा खर्च सोसण्यास संबंधित महानगरपालिका, नगरपालिका किंवा इतर शासकीय संस्था किंवा संघटना तयार आहेत. या शर्तीस अधीन राहून खाजगी संस्थेची निवड करण्याची निकष, कार्यपध्दती अटी व शर्ती, तांत्रिक गुणवत्ता, जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख यांच्याकडून ठरवण्यात येतील. एकंदरीत तुम्ही एखादी एजन्सी प्रपोज करण्यासाठी एक ठराव करुन दया. म्हणजे त्या ठरावाची अंमलबजावणी पुढे संचालक भूमी अभिलेख किंवा आयुक्त भूमी अभिलेख हे ठरवून एखादया एजन्सीने एका विषयापुरते आपण मघाशी सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी अतिशय तंत्रशुध्द मुददा मांडला. खरे म्हणजे तो सर्वांच्याच लक्षात आला असेल असे सांगता येत नाही. बऱ्याचशा लोकांच्या प्रॉपर्टी कार्डवरती वेगळे क्षेत्र आहे. तर सात-बाऱ्यावरती वेगळे आहे. आता ही अडचण आमच्या शहराची सोडवण्यासाठी जर आयुक्तांनी असा पुढाकार घेतला असेल कदाचित त्यांच्या कानावर केले असेल कि, इथे अशा भानगडी चाललेल्या आहेत. सात-बारा कोणाच्या नावावर, प्रॉपर्टीकार्ड दुसऱ्याच्या नावावरती किंवा सात-बारासुध्दा सहा-सहा महिन्यानी बदली होतात. तेव्हा

नक्की प्रॉपर्टी ती सर्वे करुन कोणाची आहे. हे ठरवण्यासाठी हयाचे अंमल करु या. एकीकडे तुम्ही महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यु व्हिलेज टाउन ॲण्ड सिटी सर्वे रुल्स १९६९ चे अवलंबन करित असताना हया तरतुदींचा वापर करुन तुम्ही काय करणार आहात. तर सर्वे करणार आहात. सर्वे करणार, जागेवर पझेशन कोणाचे आहे हे ठरवणार आणि जागेवर पझेशन कोणाचे आहे. याच्यामध्ये वाद निर्माण झाला तर तुम्ही सब रुल ६ खाली सर्वे ऑफिसर नेमणार. मी बोलतो ते बरोबर आहे का? आता सर्वे करत असताना अनेक अडचणी हया शहरामध्ये येणार आहेत. कारण मुळात आयुक्त संचालक भूमी अभिलेख हे उसळून गेलेले आहेत कि, सात-बाराचेचे उतारे इथे डिसप्युटेड आहेत. तर तुम्ही कुठल्या बेसवरती त्यांची मालकी ठरवणार. त्याला दोन बाबी आहेत. माझे पझेशन आहे. हे जेव्हा मी कोर्टात सिध्द करीन तेव्हा मी त्या जमिनीचा मालक होईन. परंतु, सात-बारावरती सन्मा. सदस्य परशुराम पाटील असतील. कदाचित त्यांना प्रॅक्टीकल नॉलेज आहे. म्हणून मी त्यांचे नाव घेतले. मग अशा वेळी तुमचा इन्कवायरी ऑफिसर हया जमिनीची मालकी काय ठरवणार? सन्मा. सदस्य परशुराम पाटील यांचे सात-बारावर आणि सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांचे प्रॉपर्टीकार्डवर. मा. महापौर मॅडम, जमिनीच्या मालकी संदर्भात जे कागदपत्र लागतात कि, ही जमिन माझी त्याच्यात आतापर्यंत एकच कागदपत्र कोर्टात ग्राहय धरले जाते. ते म्हणजे सात-बाराचा उतारा. प्रॉपर्टीकार्ड हे ॲडीशिनल पुरावा होतो कि, ही प्रॉपर्टी माझी आहे म्हणून. जेव्हा सर्वे करताना माझ्या लक्षात आले कि, सन्मा. सदस्य परशुराम पाटील बाहेरगावी फिरायला गेले आहेत. मी जाउन जमिनीवर उभी राहिलो आणि सांगितले ही माझी जागा आहे. तर त्यांना दयावीच लागेल. प्रॉपर्टीकार्डवरती नाव सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलांचे आणि सात-बारावर सन्मा.सदस्य परशुराम पाटलांचे भांडण कोण मिटिवणार. कोणी नाही. म्हणजे भांडण लावायची आयुक्तांचा एकंदर दिसते. हरकत नाही. एका बाजूला भांडण लावा आणि दुसऱ्या बाजुने भांडणे सोडवायला इन्कवायरी ऑफीसर नेमा. ती पण तरतुद आहे. जेव्हा अशा प्रकारचे डिसप्युट निर्माण होणार. परशुराम पाटलांना कळणार कि, माझ्या गैरहजेरीत सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील माझ्या जमिनीत आला आहे. तेही येणार कागद घेऊन तेव्हा तिथे वाद निर्माण झाला. मग तो वाद सोडवण्यासाठी इन्कवायरी ऑफीसर इन्कवायरी करणार त्यानंतर त्याला जे योग्य वाटेल तो इन्कवायरी ऑफीसर कोण असणार या खाजगी एजन्सीचा नेमलेला अ,ब,क,ड किंवा कोणीतरी वेडा, कोणीतरी असेल तो. त्याला पॉवर देणार मग तो ठरवणार सन्मा. सदस्य परशुराम पाटील जरा माझ्यापेक्षा उंच आहेत. त्याच्यामुळे त्यांचे वजन जास्त पडणार आहे. त्याचे नाव लागणार मी कुठे दाद मागायची म्हणून त्यांनी कायदयात असे पण लिहिले आहे की इन्कवायरी ऑफीसर इज नॉट द कॉम्पीटन्ट ॲथॉरिटी. साहेब, इन्कवायरी ऑफीसर अपॉईंटेड अंडर सब रुल सिक्स ऑफ रुल्स महाराष्ट्र ॲन्ड रेव्हेन्यु टाउन व्हिलेज प्लॅन सर्वे १९६९ रुल्स सब रुल सिक्स व्हेरी क्लिअरली स्पेसिफाय दॅट इन्कवायरी ऑफीसर इज नॉट द कॉम्पीटन्ट ॲथॉरीटी टू डिसाईड द ओनरशिप ऑफ द लॅन्ड इव्हीनिंग डिसाईड या प्रॉपर्टी कार्डवरती श्री. प्रफुल्ल पाटीलच आहेत आणि सात-बारा डिसप्युट असल्यामुळे बीकॉज इन टू इनक्वायरी ऑफीसर रेकॉर्ड ऑफ दी राईट म्हणजेच इनक्वायरी करण्याचे पॉवर्स इन्कवायरी ऑफीसरला दिलेले नाहीत. हे बघा, जरा तुमच्यामध्ये साहेब जरा तुम्ही चुकीचे सांगितले ए.टी.पी. साहेब या कादयाबाबत व्यवस्थित माहिती दिली. परंतु, जेव्हा सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील यांनी आपल्याला प्रश्न केला त्यावेळी जागेची मालकी ठरविताना प्रॉपर्टी कार्ड हे एकच असू शकेल असे नाही किंवा एकच दस्तऐवज असू शकत नाही म्हणून सायमलटेनिअसली ज्या ज्या ठिकाणी डिसप्युट निर्माण झाली त्या त्या ठिकाणची रेकॉर्ड ऑफ राईटची चौकशी होणे गरजेचे आहे. मग ती कोण करणार? महानगरपालिका करणार, मा. कमिशनर साहेब करणार, की तुम्ही करणार. त्यालासुध्दा रुल्स आहेत. यु फॉलो द रुल्स महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यु सर्वे ॲन्ड सब डिव्हीजन सर्वे १९६९ आणि त्या महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यु इन्कवायरी इन टू टायटल ऑफ लॅन्ड रुल्स १९६७. आता मला तुम्ही सांगा आयुक्त संचालक भूमिअभिलेख यांनी तुम्हाला पाठविलेल्या पत्रामध्ये ज्या कायदयाच्या तरतुदीस किंवा दुरुस्तीस अधिन राहून त्यांनी हे पत्र पाठविले आहे. तो फक्त १९६९ रुल्ससाठीच आहे. आणि सायमल्टेनिअसली आम्हाला जेव्हा आमची मालकी ठरवायची आहे. तेव्हा इन्कवायरी इन द टायटल ऑफ द लॅन्ड, तो ही एक रुल आहे. १९६७-६८ रुल आहे. सर्वे आणि हा पॅरलली कोण करणार कंडक्ट म्हणजे इन्कवायरी ऑफिसरने दिलेला निर्णय दुसरी महत्वाची बाब आहे. तुमच्या बाबतीत इन्कवायरी ऑफीसर फायनल निर्णय देणार कि सन्मा. सदस्य मिलन पाटीलच्या प्रॉपर्टीच्या काडार्वरती सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेसाहेब बसले चुकून तर तो निर्णय फायनल त्यांचा निर्णय फायनल त्यांना अपील कुठे सिव्हील कोर्टात. मग त्यांनी काय सिव्हील सुट फाईल करायची का? जेव्हा एखादी रेव्हीन्यु ॲथॉरिटी हया राज्यामध्ये अस्तित्वात असताना ज्या रेव्हेन्यु ॲथॉरिटीला रेकॉर्ड

ऑफ राईट ठरविण्याचे अधिकार आहेत. अंडर दीज रुल्स जी मी तुम्हाला आता मेन्शन करून झाले. तेव्हा ते सोडून ते काय सिव्हील कोर्टात भांडत बसणार? सायमलटेनिअसली जसे नाईक साहेबांनी म्हटले की, तुम्ही काय करणार सर्वे करणार, मोजणार. काही प्रॉब्लेम झाले तर डि.एल.आर. कडे पाठवणार. जर डि.एल.आर. कडे पाठवणार तर या एजन्सीला नेमून फायदा काय? व्हेन अल्टीमेटली रिसपॉन्सीबिलीटी सर्वे लॅन्ड द लाईन अपॉन डी.आय.एल.आर इज रुल कलेक्टर रिक्वायर्ड टु इश्यु ऑफ पब्लिक नोटीस अंडर सब रुल टु इन्फॉर्म दी कलेक्टर. पब्लिक नोटीस करणार की, अशा प्रकारचा या गावाचा सर्व्हे होणार आहे. तेव्हा त्याला लोक असेंडींग सर्व्हे म्हणून मानतील. तुमच्या एजन्सीला प्रत्येक लोक चॅलेंज करतील आणि असा सर्व्हे होत असतांना जी डिस्प्युट निर्माण होतील सायमलटेनिअसली कलेक्टरांनी अशा लोकांचे सात बाराच्या उताऱ्यावरचे रेकॉर्ड ऑफ राईट इन्क्वायरी इन टू टायटल ऑफ द लॅन्ड ॲन्ड सर्व्हे ऑफ द सर्व्हे नंबर्स ॲन्ड सब डिव्हीजन ऑफ द सर्व्हे नंबर्स रुल १९६७ ॲन्ड रुल १९६८. सायमलटेनिअसली ॲन्ड रिस्पेक्टीव्हली शॅल बी एक्सरसाईज ॲट द पॅरेलल लेवल. सेम वेळ दोन्ही झाले पाहिजे आणि त्या दोन्ही बाबत आपण काहीच म्हणत नाही आणि म्हणून ही एजन्सी नेमण्यापुर्वी आपण ती पण एजन्सी किंवा एका अधिकाऱ्याला प्राधिकृत करण्यासंबंधी विनंती करा की, जिल्हाधिकाऱ्यांनी एका असिस्टंट कलेक्टरच्या लेवलला असा अधिकारी प्राधिकृत करुन सायमलटेनिअसली सात बाराच्या उताऱ्यावरच्या नोंदी सुद्धा जर केल्या तरच या सर्व्हेचा फायदा होणार आहे. अन्यथा प्रॉपर्टी कार्ड असणार आहे मिलन म्हात्रे कडे आणि सर्व्हे नंबर आहे मिलन पाटलांकडे. दोघे भांडत बसणार आहेत तिकडे आणि या ठिकाणी कुठलेही काम पुर्ण होणार नाही. महानगरपालिकेचा पैसा मात्र वाया जाईल. पुन्हा रुल ६ बघा. क्लिअर आहे त्यामध्ये. रुल ६/२ बघा. यामध्ये म्हटले आहे की, त्यांनी नगरपालिकेच्या सेक्शन ८० खाली बी.पी.एम.सी. ॲक्टखाली जी एन्क्वायरी करायची आहे ती एन्क्वायरी एन्क्वायर ऑफीसर नेमण्याबाबतची बी.पी.एम.सी. ॲक्टखाली पालिकेने एन्क्वायरी ऑफीसर नेमला की, एन्क्वायरी ऑफीसरने ज्या भानगडी निर्माण केल्या ते लोक येऊन आमच्या महापालिकेच्या माथी मारतील. बीकॉज ऑफ ऑफीसर वॉज बीन अपॉइन्टेड ॲज पर सेक्शन ६/२ ऑफ महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यु व्हिलेज टाऊन ॲन्ड सीटी सर्व्हे रुल १९६९ आणि म्हणून जे विधीवत काम होत नाही. ते कृपया करु नये. करायचे असेल तर डी.एल.आर. मार्फत करावे. कारण दॅट कॅन बी ॲथेंटीक ऑथोरिटी. मी पुन्हा एकदा बोलतोय कारण एखाद्या जमिनीचे टायटल ठरवण्यासाठी जशी सर्व्हेची गरज असते तशी सात-बारा उतारा पाहण्याची गरज असते आणि सात-बारा इज द फस्ट ॲथेंटिकेटेड डॉक्युमेंट दॅट हॅज टू बी टेकन सर्च ऑफ द रेकॉर्ड मेड ऑन इच ॲन्ड एव्हरी फ्रिक्वेन्ट इंटरवल्स बाय द वे ऑफ न्युट्रेशन इंट्रीज ६/१२ आणि ६/१२चे फेरफार उतारे आले. त्याच्यानंतर त्याचा टायटल बदलत बदलत चालला. मी सगळे सोडून देतो. तुम्ही फक्त ८५९ चा फेरफार बघा. इट इज व्हेरी वाईड. ८५९च्या फेरफारमध्ये असे म्हटले आहे. ८५९ चा फेरफार झाला १९६१ च्या सुमारास. तेव्हा त्यांनी असे क्लिअर म्हटले आहे की, सगळ्या भाईंदरच्या जमिनी आहेत त्याचा रेकॉर्ड ऑफ राईट विवादीत आहे. कुठेही नोंद नाही त्याची. म्हणजे कोण मालक आहे, कोण खोत आहे, कोण इतर हक्कात आहे, कोण कुळ आहे, कुठल्या प्रकारच्या जमिनी आहेत या सगळ्या गोष्टी तपासण्यासाठी ८५९ नंबरचा फेरफार झालेला आहे. आपण कृपया जर आयुक्तांच्या निदर्शनात आणून दिले, आपले आयुक्त नव्हे, ते भुमि अभिलेखाचे. तर ते म्हणतील, जेव्हा लॅन्डच डिस्प्युटेड आहे तर हे सगळे करण्याचे कारण काय आहे. इलिगल मी म्हणणार नाही. पण आम्हीच काहीतरी कोणाला तरी मंजुरी देणार आणि त्याचे मात्र परिणाम होणार भांडणामध्ये म्हणून अशा एजन्सीमध्ये जाण्यापेक्षा तुम्ही जर डी.आय.आर. ला सांगितले की, यु होल्ड द सर्वे सायमल्टेनिअसली ॲन्ड यु आर रिक्वेस्ट कलेक्टर दॅट यु अल्सो होल्ड द इन्कवायरी ऑफ फायडिंग द रेकॉर्ड ऑफ राइटस द टायटल्स ऑफ द लॅन्ड ओनर्स. तर ते दोन्ही एकत्र होईल तेव्हाच ते ऑथेन्टेकिट डॉक्युमेन्ट होईल नाहीतर प्रत्येक वेळी पुढचा प्रॉब्लेम तुम्हाला सांगतो. प्रॉपर्टीकार्डवर साहेब तुम्ही प्लॅन पास करणार आणि सात-बाराच्या उता-यावर मी जाउन त्या प्लॅनवर स्टे आणणार ॲन्ड देन यु वील बी हेल्ड रिस्पॉन्सीबल फॉर नॉट इन्क्वायरींग, नॉट गोइन्ग इन टु डिप टु द टायटल ऑफ द लॅन्ड. प्लीज.

**मिलन पाटीलः-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो. आता सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी जे सांगितले. त्याच्यातसुध्दा आणखीन एक मी सुचना करु इच्छितो की, आपल्याला ही जर एजन्सी नेमायचीच असली तर डी.एल.आर.चा सक्षम अधिकारी जो असतो. त्याचा जो काही सरकारकडे त्यांचा भरणा केला तर सरकार आपल्याला तसा एक अधिकारी या एजन्सीच्या जोडीला आपल्याला देऊ शकतो. आपण एजन्सीचा जो रेट असेल तो फिक्स करुन आणि अतिरिक्त थोडेफार जर करायचे असेल तर

आपण तसा एक अधिकारी या एजन्सीच्या जोडीला नेमला तर आपली जबाबदारी फार कमी होउन जाईल आणि जी डी.एल.आर.ची जबाबदारी आहे ती वाढणार आहे. तर तो अधिकारी एजन्सीच्याबरोबर दिल्यानंतर तो अधिकारी आणि ही टिम घेउन नंतर तो सर्वे करेल आणि ज्या आता हया काही अडीअडचणी येतील किंवा जे काही वादविवादाचे क्षेत्रफळ असेल त्याच्यावर त्याची जबाबदारी राहील. आपल्या नगरपालिकेची जबाबदारी राहणार नाही आणि ती एकत्रितरित्या अधिकरणाकडे वर्ग करतील आणि त्याचा जो काही निर्णय असेल किंवा संबंधित जो वादविवादाचा भाग आहे. तो एकत्रित अधिकरणाकडे वर्ग करुन त्याचा निर्णय ते लोक देतील. आपल्याकडे ती जबाबदारी येणार नाही. तत्पूर्वी जे काही देताना एक क्रेडिट फाईल तयार करुन दयावी लागेल आणि ती क्रेडीट फाईल केल्यानंतर याचे जे कोणी आता जाणार कुणाला काही समजणार नाही. परंतु, आमची जमिन मोजतो कोण आहे? तो काय आहे? त्याच्या जोडीला आपल्याला एक पोलीस संरक्षणसुध्दा दयावे लागेल. हा एक खर्च आपल्याला सोसावा लागेल आणि यांच्यानंतर क्रेडीट फाईल केल्यानंतरच याचाही वादविवाद गेला तर आपल्याला विचार घेतल्यानंतर कोर्ट निर्णय घेउ शकेल आणि ती एक गोष्ट वादविवादात राहून याला वेळ लागणार नाही. आपण जे एक-दिड-दोन वर्षाचा कालावधी देतो. त्याला पाच वर्ष लागणार नाही. म्हणून या सर्व गोष्टीचा सर्वसाधारण विचार करुन आपण हा निर्णय घेउन नंतर एजन्सी नेमावी अशी मी एक सुचना मांडतो.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

मा. महापौर मॅडम यामध्ये सन्मा. सदस्य पाटील साहेब यांनी सांगितलेले सर्व प्रोसीजर अवलंबले जाणार आहेत. यामध्ये फार मोठया प्रमाणात बंदोबस्त लागणार. मग होमगार्डसुध्दा वापरतो. त्यावेळी फक्त सर्वेअर जे वापरायचे आहेत. ते तेवढेच वापरणार आणि सन्मा, सदस्य मिलन पाटील यांनी जे सांगितलेले आहे. त्याचप्रमाणे कायदयाचे चौकशी अधिकारी नेमणूक करणे. तेच प्रोसीजर संपूर्णतः वापरणार आहे. फक्त जमिनीवर जाउन जे सर्वे करणार आहेत. ती संख्या कमी असल्यामुळे फक्त ती एजन्सी सर्वेअर देणार आहे आणि ते सर्वे करुन सगळे प्रोसीजर फॉलो डी.एल.आर.चे आयुक्त आणि कलेक्टरच्या नोटीफिकेशन होणार आहे. फक्त त्यांच्याकडे मोजणी करणारे किंवा एखादया गावात एखादया प्लॉटची मोजणी करणे वेगळे आहे. संपूर्ण गावाची मोजणी करण्यासाठी लागणारा स्टाफ हा त्यांच्याकडे नसल्यामुळे ही अमेन्डमेन्ट आली आणि सन्मा. सदस्य पाटील साहेबांनी जे चौकशी अधिकारी, उप जिल्हाधिकाऱ्यांची नेमणूक, सात-बारा आणि मालकी हक्काच्याबाबत चौकशी अधिकारी नेमणे हे सर्व त्या प्रोसीजरप्रमाणेच फॉलो होणार आहे. फक्त कायदयामध्ये बदल एवढाच केला की, डी. एल.आर.कडे स्टाफ नाहीत. म्हणून त्यांची एजन्सी ठेकेदारामार्फत करुन घ्या आणि ते अप्रुअल आणि नेमणुका आणि मंजुरी आणि मालकी हक्काची तपासणी सन्मा. सदस्य पाटील साहेब यांनी सांगितलेल्या प्रोसीजरप्रमाणे १९६९च्या जमीन महसुल कायदयाप्रमाणेच होणार. चौकशी अधिकारी नेमणुक पण त्याच पध्दतीने होणार आहे आणि सर्व त्यांना अधिकार पण त्याच पध्दतीने प्राप्त होणार आहे. हेच आरग्युमेन्ट सन्मा. सदस्य पाटील साहेब यांनी या बाजुने करा म्हटले तर ते माझ्यापेक्षा जास्त समजावून सांगतील. कारण यामध्ये फक्त एजन्सी सर्वे करण्यापुरता वापरायची आहे आणि सगळे प्रोसीजर आपण जे एका प्लॉटची मोजणी करतो. ज्या पध्दतीने ते प्रोसीजर फॉलो होते. त्याच पध्दतीने यांचे पण होणार फक्त सर्वे करायला त्यांच्याकडे स्टाफ नसल्यामुळे एक एजन्सी नेमून नेमायचे आहे. समजा, त्यांनी सर्वेअर का वाढवले नाही? मग परत २४० दिवस झाले की मग तो कायम होणार. त्यामुळे यामध्ये अमेन्टमेन्ट करुन खाजगी ठेकेदाराकडून करुन घ्यायचे आणि संपूर्णतः रेकॉर्ड जे आहे. आता जी डी.एल.आर. कडून आयुक्तांकडून मोजणी चालू आहे. त्याच पध्दतीने ही प्रोसीजर फॉलो होणार आहे. म्हणजे जिल्हाधिका-यांनी नोटीफिकेशन काढणे, चौकशी अधिकारी, महसुल डिपाटमेन्टची नेमणूक करणे. त्यांच्याकडूनच व्हेरिफिकेशन होणे आणि आर्थिक मंजुरीसुध्दा ठेकेदारांनी त्यांच्याकडूनच घ्यायची आहे. मधले कामकाज करण्यासाठी त्या ठेकेदाराची नेमणून करायची आहे. कृपया याचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा जेणेकरुन मालकी हक्कातील वाद आणि नंतर सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी म्हटले शासकीय जमीनी किंवा नाल्यांच जमीन याचे मुळ क्षेत्र कुणाचे आहे. काय आहे? शासकीय आहे की महापालिकेचे आहे की खाजगी मालकाचे आहे. अतिक्रमण किती आहे? हे सर्व रेकॉर्ड आणि प्रत्येकाला सर्वे करुन मोजणीचा नकाशा आणावा लागणार नाही. एकदा सिटी सर्वे झाला की पुन्हा परत मोजणी करावी लागणार नाही. यासाठी हा विषय आणलेला आहे. दुसरा हेतू काही नाही.

**रोहिदास पाटील:-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, जसा कालावधी दोन-अडीच वर्ष सांगितला. याचा खर्च किती सांगितला ते मला समजले नाही आणि खरोखरच हा विषय आणण्यासाठी प्रोव्हीजन आहे. तेव्हा महापालिकेकडे अनेक तंटे झाले. अनेक तक्रारी आल्या की, जिल्हाधिकाऱ्यांकडून अशा सुचना दिल्या की, तुमच्या भाईंदरमध्ये बरेच तंटे आहेत. ते तुम्ही आपसात मिटवा. असे आहे की भूमापक अधिका-यांनीच आपल्याला सुचना दिला की हे करुन घेणार योग्य आहे. असा तरी खुलासा करा. हा विषय आपणया सभागृहामध्ये सव्वा वषार्मध्ये अनेक चांगल्या प्रस्तावाना आपण मंजुरी देत गेलो. प्रस्तावाला मंजुरी देते वेळी कोणीही नकारात्मक बोलत नाही. त्याचा उठाव जो दिसायला पाहिजे. तो एक भाग दिसत नाही. आता तो ठराव आला. माझ्यासारख्याला तो नवीन वाटतो. इतराना वाटतो का माहिती नाही. पण या शहराची आताची महापालिकेची अर्थव्यवस्था म्हणून त्याच्यातून एक कोटी रुपये आपण याच वर्षी परत बाजुला काढतो की कसे आहे? याचा थोडासा खुलासा केला तर या ठरावाची आज आवश्यकता आहे किंवा नाही ही देखील खात्री पटेल की या ठरावासाठी आणखी कोणी प्रयत्न केले का? मार्गदर्शन केले का?
तेही माहिती पडेल.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

ठाणे महापालिकेची १४० किलोमीटरचा एरिया आहे. त्यांना चार कोटी रुपये सांगितलेले आहे आणि जसजशी मोजणी होईल तसतसे ठेकेदाराला डी.एल.आर.ने कळविल्यानंतर आपण त्याना पेमेन्ट करायचे आहे. मग डी.एल.आर.ने इतके काम झाले, सांगितले आणि त्यांनी कळविले. त्यापैकी इतके पेमेन्ट करा. ती अमाउन्ट टेंडर बदली झाल्यानंतर कळेल. प्रत्यक्षात १४० किलोमीटर एरियाला चार कोटी रुपये ठाणे महापालिकेला खर्च आहे आणि त्यांचा सर्वे सुरु झालेला आहे.

**रोहिदास पाटीलः-**

माझा प्रश्न असा आहे की, चार कोटी ते खर्च करु शकतात. ठाणे महापालिका आणि आपली ऐपत सारखी नाही. १४० पेक्षा फक्त ४० असेल तरी हरकत नाही. ४० किलोमीटरसाठी चार कोटी रुपये ते खर्च करित असतील. ठाणे महापालिकेची आर्थिक स्थिती वेगळी आहे आणि आपल्या महापालिकेची आर्थिक स्थिती वेगळी आहे. तर त्याचे एक कोटी म्हणजेच पहिल्यांदा आपले पैसे जाणार आणि नंतर त्याचे सॅन्क्शन दोन-अडीच वर्षाने होणार. तेव्हा सन्मा. सदस्य मिलन पाटील उतारा मागावला जातील. तेव्हा ते पैसे भरतील.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

पण तक एक दशांश किंवा एक चतुर्थांश असेल कारण वैयक्तिक मोजणी करताना जो जास्त खर्च येतो. तो टोटल गावची मोजणी करित असताना त्यापेक्षा कमी खर्च येतो.

**रोहिदास पाटीलः-**

आपले हेच काम जनतेला कमीत कमी खर्च लागतील. हा आपला उद्देश बरोबर आहे. पण आज हया वर्षाच तो कार्यक्रम घ्यायचा. आपल्याकडेच एक कोटीची तरतुद आहे. एक कोटीमध्ये पूर्ण महापालिका क्षेत्राचे सर्वेक्षण होईल का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

मंजुर करताना टेंडर काढल्यानंतर टेंडर मंजुरीला तुमच्यासमोरच येणार.

**रोहिदास पाटीलः-**

आमच्याशिवाय ते होणारच नाही, त्याबाबत वाद नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

१४० किलोमीटरचे त्यांनी टेंडर प्रसिध्द केले होते. त्याचा खर्च चार कोटी रुपये आला. आपले ८९ आहे. ८९ आहे म्हणजे निम्मा धरायचा आहे. दोन वर्षाचा कालावधी म्हटल्यानंतर आपल्याला जसजशी एकेका भागाची मोजणी होईल. तसतशी पेमेन्ट होईल. एकदमच पेमेन्ट नाही. आयुक्त जे डी.एल.आर. ला कळवतील तसतसे पेमेन्ट होणार आहे आणि जसजसे आपल्याकडे सनद प्राप्त होतील. ते सदन ज्या ज्या मालकाचे येतील. त्या त्या मालकाची रक्कम पण त्यावर लिहून येईल. ती सनद त्यांना दयायची आहे आणि रक्कम पावती भरुन घ्यायची आहे.

**रोहिदास पाटीलः-**

मी तेच म्हणतो सनद यायला दोन-अडीच वर्ष जातील.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलजी जसजसे होईल तसतसे होईल.

**रोहिदास पाटीलः-**

जसे आपण त्याची ती दोन कोटी, एक कोटी जो काय पार्टली सांगितले तर पन्नास लाख, पन्नास लाख रुपये आपिण आज खर्च करतो आणि गरज कोणाची भागते. जे काही दोन तीन इंटरेस्टींग लोकांची भागते कि पूर्ण शहराची भागते कुणाला घाई आहे. याची कोणी सुचना केली हे मी विचारतो आहे की, हा विषय जो आला त्याला अधिका-याच्या अनेक महापालिकेत अनेक विषय चालतात. त्याप्रमाणे आपल्याही महापालिकेत ते विषय चालले पाहिजेत. आत नाहीतर उदया ते विषय आणायलाच लागतील. आज आणते वेळी क्रमशः कोणालाच पहिल्यांदा आपण प्राधान्य कशाला दयावे. तर त्यामधून खरोखर आज सिटी सर्वे करणे गरजेचे वाटते का? तर त्यावर प्रशासनाचे मत काय आहे?

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

या महापालिकेत सिटी सर्वे करुन घ्यायला पाहिजे. म्हणून १९९३ पासून पत्रव्यवहार चालू आहे. त्यांच्याकडेच आपण मोजणी करुन घ्या असे आपण त्यांना वेळोवेळी कळविलेले आहे. त्यांनीच मग ठाणे महापालिकेप्रमाणे ॲमेन्टमेन्ट कायदयामध्ये झालेले आहे. खाजगीकडून करुन घ्या. आपण आता पहिले जे पत्रव्यवहार सुरु केले की संपूर्ण गावाचा डी.एल.आर. आयुक्तांकडून तुम्हीच करुन दया. त्यांनी सुचविले की, हे खाजगीकडून करुन घेतले तर लवकर होईल. आमच्याकडून उशीरा होईल. या दृष्टिकोनातून त्यांनी ठाण्याला जसे चालू आहे आणि कायद्यावर ही अमेन्टमेन्ट आहे.

**रोहिदास पाटील :-**

उशीरा आणि लवकर यातील आर्थिकदृष्टया जे आपण कमर्शिअल पॉइन्टने म्हणतो.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

करायचे की नाही हा सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे.

**रोहिदास पाटील :-**

सभागृहालाच माहिती दया म्हणजेच माहिती पडेल.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

म्हणजे नागरिकांची सर्व जमीन ज्यांच्या मालकीची आहे. त्यांना वैयक्तिक मोजणी करायला नको म्हणून सावर्जनिक मोजणी.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, आपण आहात आणि मी आहे. याची पाश्वर्भूंमी पण मी मुददाम सांगतो. याची पार्श्वभूमी अशी आहे की तुम्ही आणि आम्ही प्लॅनिंग कमिटीला असताना ९२-९३ मध्ये ठराव केला की, या शहराचा संपूर्ण सिटी सर्वे करण्यात यावा आणि त्याप्रमाणे आपण शासनाकडे मागणी केली की, हा सिटी सर्वे शासनाने करावा. शासनाने त्यावेळी आपल्याला तीन कोटी रुपयामध्ये हा सिटी सर्वे आम्ही करुन देउ अशा स्वरुपाचे पत्र पाठविले हे तीन कोटी रुपये ज्यावेळी शासनाने मागितले त्यावेळी आपण अशी अट टाकली की आम्ही तुम्हाला तीन कोटी रुपये देणार नाही. कारण एकदा हे तीन कोटी रुपये तुम्हाला दिले की, तुम्ही तुमच्या कर्मचा-यांचा पगार करत बसणार आणि आमचे पैसे अडकून राहणार. म्हणून आपण त्यावेळी अशी अट टाकली होती की आम्ही तुम्हाला पार्टली पार्टली पैसे देउ आणि त्याच्यानंतर काय फार मोठा प्रयत्न झाला नाही. मागे उत्तन येथे सन्मा. तत्कालीन मुख्याधिकारी शिंदे साहेबांनी डिमॉलेशन केले. त्यावेळी महानगरपालिकेच्या पत्रव्यवहाराच्या काही प्रती मी तत्कालीन नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील यांना पण सादर केलेले होते आणि त्यांच्याकडे माझी ओ. सी. पण आहे. तर हा मुददा कशासाठी आला होता. याची पार्श्वभूमी अशी आहे की, शहरामध्ये तेव्हासुध्दा अशा तक्रारी होत्या की, कोणीतरी सात-बाराचे उतारे नसले तरी पण प्लॅन आहे, गटबुक आहेत. गटबुक नकाशा टॅम्पर केले जातात. याची जागा त्याच्यात दाखविली जाते आणि डिसप्युट होतात. तर कधीतरी उत्तन येथील चार भागांचा सिटी सर्वे यापूर्वी झालेला आहे. घोडबंदर या भागातील काही गावठण सिटी सर्वेमध्ये झालेले आहे. त्याप्रमाणे भाईंदर नवघरमधील काही भाग तसेच गोडदेवचासुध्दा सिटी सर्वेमध्ये गेलेला आहे. तर त्यामध्ये छोटे-छोटे पॉकिटस सिटी सर्वे झालेले होते आणि त्या ठिकाणी आधीच नवीन-जुनी इमारत क्षेत्र बाधित होती. नवीन इमारत क्षेत्र बांधण्यासाठी प्लॅनिंग डिपार्टमेन्टला ए.टी.पी. डिपार्टमेन्टला निर्णय घेण्याच्या दृष्टिकोनातून आणि सर्वसाधारणपणे न्यायाच्या दुष्टीकोनातूनसुध्दा हे नकाशे अद्ययावत करणे आवश्यक होते. म्हणून त्यावेळी हा सिटी सर्वे करण्यात यावा, अशी भूमिका तत्कालीन नगरपालिकेने घेतली. आपण पण आहात त्यामध्ये ठरावाला कदाचित आपले अनुमोदन असेल.

**रोहिदास पाटील:-**

सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांनी सांगितले. त्यामुळे सभागृहाला माहिती झाली असून त्यांनी सांगितले की, पूर्वेला मौजेखारी, मौजे नवघर, मौजे गोडदेव इथे सिटी सर्वे झालेला नाही. भाईंदर (पश्चिम)चा झालेला आहे. उत्तन, राई, मोर्वा, घोडबंदर झालेला आहे. आता फक्त पूर्व आणि मीरा रोडचा सर्वे करायचा राहिला. मग ते पूर्व आणि मिरा रोडसाठी आणखी काही तक्रारी आहेत. त्याची आज आवश्यकता भासली कशासाठी? हे एकदा क्लिअर झाल्यावर त्याचे काही फायदे आहेत. कोणी विरोध करायचे व सांगायचे कारण नाही. पण एकदा हे रेकॉर्डवर राहू दे की यासाठी ही महापालिका करते आहे. निम्याहून ते जास्त झालेले आहे. आपण कसा शब्द वापरतो की, पूर्ण महापालिका क्षेत्राचा करायचा आहे. ८९ किलोमीटर आपण बोललो. ७९ पैकी एवढा झाला, एवढा उर्वरित बाकी आहे, असे काहीतरी आपल्याकडे पाहिजे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

झालेला जो सर्वे आहे तो योग्य त-हेने झाला का? एवढे व्हेरीफिकेशन करुन घेउ आणि पुढची कारवाई करु.

**रोहिदास पाटील:-**

खात्री करा. आम्ही तेवढीच विनंती करतो. कारण जेव्हा जेव्हा हा विषय येतो. त्याची पार्श्वभूमी एकदाच तुम्ही पाच मिनिटात निवेदन केले की, याला एवढा खर्च आहे, असे असे होणार आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

खर्च आता सांगू शकत नाही. परंतु, व्यक्तीगत माणूस जो खर्च करतो त्यापेक्षा कमी येईल. पण आता सांगता येणार नाही.

**रोहिदास पाटील:-**

ते मला मान्य आहे. हे चांगले आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

सभागृहानेच निर्णय घ्यायचा आहे, करायचे की नाही कराचे ते.

**रोहिदास पाटील:-**

साहेब, सभागृहाला समजावून देण्याचे आपले काम आहे.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौरांच्या आदेशाने बोलतो की, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील जो मुददा मांडतात तो मुददा आजच्या तारखेला राज्यशासनाकडे जो ठराव मंजुरीसाठी पाठवायचा आहे. हयानंतर टेंडर कॉल होतील आणि नंतर आपल्या सभागृहासमोर हा विषय येणारच आहे. म्हणून आता हा विषय लांबवण्याची माझ्या मते काही गरज नाही.

**रोहिदास पाटील:-**

मॅडम, विषय लांबवण्याचा प्रश्न नाही. कोणीतरी माहिती दिल्याशिवाय सभागृहाला कळत नाही. कदाचित यांना लवकर जाण्याची घाई असते किंवा सगळयांना हो म्हणण्याची सवय असते. पण यातील चार गोष्टी सगळयांना माहिती पडतात. आता शेंडेसाहेबांनी ती माहिती दयायला पाहिजे होती की, एवढे झाले, एवढे झाले नाही. पण त्याला दोष देण्याचे काही कारण नाही. आपल्यापैकी कोणाला तरी माहिती आहे, त्यांनी सांगितले तर माहितीमध्ये भरच पडते.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, आमचे सहकारी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी जी सभागृहाला माहिती दिली. जेव्हा हा सर्वे होईल, त्यावेळी एक-दोन वर्षाचा कालावधीसुध्दा लागेल असे अधिका-यांनी सांगितलेले आहे. पण ज्यावेळी एक-दोन वर्षाचा कालावधी लागेल. आता सात-बाराच्या उता-याप्रमाणे जेव्हा सात-बाऱ्यावर आता मोकळी जागा असेल त्यावर बिल्डींग किंवा टॉवर उभे राहिलेले असतील. त्यावेळी मोजणी करु. तर त्यावेळी त्यांच्याकडून तो जो सनद चार्ज आपण घेणार तो कोणाकडून घेणार? सात-बाऱ्यावाल्याकडून की टॉवरवाल्याकडून घेणार. त्यावेळी तो सात-बारावाला नसणार. तो बिल्डिंगवाला त्या ठिकाणी असणार आहे. कोणाकडून वसुल करणार आहात?

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

सनदवर ज्यांची नावे असणार त्यांच्याकडून.

**रतन पाटील :-**

मग सात-बारा उता-यावर फक्त सन्मा. सदस्य रतन पाटील यांचे नाव आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

त्यामध्ये पाटील साहेबांनी सांगितले चौकशी अधिकारी नेमणार. सात-बारा आणि मालकी हक्क तो निर्णय ते चौकशी अधिकारी देणार

**रतन पाटील :-**

मला हे स्पष्ट करा सन्मा. सदस्य रतन पाटील यांचे सात-बारा उता-यावर नाव आहे. सन्मा. सदस्य मिलन पाटील बिल्डिंग बांधतात. कोणाकडून तुम्ही वसुल करुन घेणार?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

चौकशी अधिकारी ठरवितात. त्यांनी चौकशी अधिकारी नेमले की रेव्हेन्यु कोर्टाप्रमाणे त्यांना ती ॲथॉरिटी असते. त्यावेळी तुम्ही कागदपत्र सादर करणार तुमचे मत मांडणार.

**रतन पाटील :-**

बिल्डर बिल्डींग बांधून गेले. त्यानंतर तुम्ही कोणाला पकडणार? सात-बारा उतारा दया.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

हे चौकशी अधिकारी नेमल्यानंतरच तुम्हाला कळेल.

**रतन पाटील :-**

आम्ही त्याला मंजुरी आहे. साहेब, मी त्यांच्याकडे मंजुरीसाठी स्पष्टीकरण मागत आहे. आमची मंजुरी आहे.

**परशुराम पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, सात-बाराच्या उता-यामध्ये ज्या अर्थी पाच ते सहा भावांची नावे असतात आणि एकमेकात झगडे असतात. ती सर्वे करताना त्यांचे चारही भावांचे झगडे असतात. तर हया जमिनीचा जर सर्वे झाला तर चारही लोकांना तुम्ही सनद देणार की एक लोकाला देणार? हा मुददा उपस्थित होतो. त्यानंतर कोर्टात केस चालू असतात. आता आहेत देखील. तर त्यासाठी मला वाटते की, हे सर्वे आपण सिटी सर्वे गव्हर्नमेन्टतर्फे आपण खाजगीकरण करतो तरी आपली जी ॲकॉर्ड जमीन जी नगरपालिकेने जी केलेली आहे. तेवढीच आपण नगरपालिकेतर्फे सर्वे करुन घ्यावा, असे तरी मला वाटते. कारण जी जी प्रॉपर्टी लोकांची आहे ती आपापली करुन घेतील आणि जी चार लोकांची सात-बाराच्या उताऱ्याला नावे आहेत. त्याला आपण काय जबाब देणार? चार भावाला जबाब देणार की एका भावाला जबाब देणार? हा मुददा उपस्थित होतो. कारण कोर्टात केस आहे. घरामध्ये मारामा-या आहेत तर त्याचे जबाबदार कोण राहणार? आता खाजगी सर्वे आपण ठेवणार. तर खाजगी सवेला आपण एखादा भाउ जाउन भेटणार. एखादा भाउ भेटणार की, एक-दोन भाऊ भेटणार की साहेब, ही जमीन माझ्या ताब्यात आहे. या प्लॅनवर माझा ताबा आहे. म्हणून लिहून टाका. मग ते कसे होणार ते तुम्ही सांगा. म्हणजे चार भावांची मालमत्ता आहे आणि दोन किंवा एका भावाचा त्यावर ताबा लिहिल्यानंतर आणखी झगडे वाढण्याचा संभव आहे. म्हणून हा सर्वे करताना आपण विचारपूर्वक करावा आणि हा मुददा उपस्थित करण्यात आलेला आहे. का पास झालेला नाही. पास करण्यास वेळ आहे. मघाशी सन्मा. सदस्य याकुब कुरेशी यांनी म्हटल्याप्रमाणे पास होणार ही खरी गोष्ट आहे. पण हा मुददा आपण उपस्थित केल्यानंतर आपल्याला माहिती पडणार आहे. कारण जे लोकांचे धोरण आहे. चार भावांचे आहे. कोर्ट-कचेरी आहे.

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सदस्य पाटील साहेब, तुमच्या लक्षात आले नाही मी काय बोललो ते. मी सांगू इच्छितो की, हा जो आजचा विषय आहे हा आपल्याला राज्यशासनाकडे मंजुरीसाठी पाठवायचा आहे. तुम्ही जे बोलता ते सगळे मुददे सभेत येणार आहे आणि शेवटी मांडायचे आहेत.

**परशुराम पाटील :-**

तरीसुध्दा आपण त्यांच्या निदर्शनास आणायला पाहिजे.

**याकुब कुरेशी :-**

नंतर विषय आल्यानंतर आपण सगळे ठरवू. सन्मा. सदस्य परशुराम पाटील मी तुम्हाला एवढेच सांगतो की, ज्या पध्दतीने आपण ठरवू. आपल्याला तेवढे अधिकार आहेत. त्या पध्दतीने तो विषय पुढे वापरले जातील.

**परशुराम पाटील :-**

सन्मा. सदस्य याकुब कुरेशी मी आपल्याला सांगत आहे की, ज्यावेळी सर्वे होतो. आपण पण सर्वे करित असाल आणि ज्यावेळी नोटीसा निघाल्यानंतर एक नोटीस चार भावांची असेल तर चारही

भाउ तिथे उभे राहतात किंवा चारही भावांना नोटीसा दिली नाहीत तर एकाच माणसाला देतो म्हणजे तिथे झगडे, कोर्ट-कचेऱ्या असतात. तर त्यांचे पुढे झगडे होतील. काहीही होईल तर त्याच्यासाठी आपण काय करावे, हा विचार विनीमय करण्यासाठी त्यांना जबाब काय द्यायचा. कारण हे आता सध्या काही होणार नाही. पुढे आपल्याला मंजुरी येईल तेव्हाच सगळे होणार आहे. तर तत्पूर्वी त्यांच्या निदशर्नात या सगळ्या बाबी आणून देत आहोत. बाकीच्या गोष्टी काही नाही. आपण खाजगीकरण करण्याबाबतच्या आपण स्वतः जी केली किंवा ज्याची जमीन आहे त्याने केले तर काही वाईट नाही. प्रत्यक्षात आपण मला वाटते आपल्या जेवढ्या गार्डनमध्ये जेवढ्या आपल्या ॲक्वायर्ड केलेले आहे. ते नगरपालिकेने करावे आणि बाकीच्या जमिनी आहेत त्यांनी स्वतःने आपल्या मालकाने करावे असा माझा मुद्दा आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सभापती महोदय, उपस्थित सर्व सभागृह, माझ्या माहितीप्रमाणे मी वर्धा नगरपालिकेमध्ये काम करित असताना अशा त-हेचा सिटी सर्वे त्यावेळी झाला होता आणि या सभागृहामध्ये अत्यंत हेल्दी चर्चा झालेली आहे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील, सन्मा. सदस्य परशुराम पाटील, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील या सर्वांनी जी चर्चा केली ती अत्यंत अभ्यासपूर्ण अशी चर्चा झाली आणि या चर्चेमध्ये थोडे भयसुध्दा मला दिसून आले. परंतु, माझ्या माहितीप्रमाणे जेव्हा हा सिटी सर्वे केला जातो तेव्हा तलाठयाचे सर्व रेकॉर्ड, गाव, नकाशा, गाव नंबर ६ चे उतारे हे सर्व बघुनच सर्व तऱ्हेच्या नोंदी त्यामध्ये घेण्यात येतात. असे नाही की तलाठयाकडे वेगळे रेकॉर्ड येतात आणि सिटी सर्वेकडे वेगळे रेकॉर्ड येतात असे शक्य होत नाही. एखादया प्रकरणात चुकीने कदाचित होऊ शकते. परंतु, सिटी सर्वे करताना तलाठयाचा रेकॉर्ड त्याचा गाव नंबर, गाव रजिस्टर आणि गाव नकाशाचा अंर्तभाव केला जातो. त्याला विसंगत असा कधीही केला जात नाही असा माझा अनुभव आहे. धन्यवाद.

**ओमप्रकाश अग्रवालः-**

महापौर मॅडम, अशा पध्दतीच्या सर्वेक्षण कामी अनेक वेळा नगरपालिकेत ठराव आलेले आहेत. यापूर्वी नगरपालिका काळामध्ये भाईंदरच्या महापालिका क्षेत्रामध्ये जी मालमत्ता आहे त्याचा सर्वे करण्यात आला आणि त्या सर्वे कामी माझ्या माहितीप्रमाणे ४० लाख रुपये राणे कन्सलटन्ट याला दिले गेले. त्यावेळी जेव्हा सभागृहामध्ये प्रस्ताव आला. त्यावेळी मालमत्तेचे सर्वेक्षण खाजगी संस्थेकडून का करुन घेणे? त्यामध्ये इललिगल कन्स्ट्रक्शन इललिगल बांधकाम महापालिकेचे उत्पन्न कसे वाढणार? असे अनेक मुददे राणे कन्सलटन्टच्या रिपोर्टच्या माध्यमाने येणार होते आणि महापालिकेचे उत्पन्न वाढणार होते. म्हणून आपण ते काम खाजगी संस्थेला दिले. त्या खाजगी संस्थेला देताना खाजगी संस्थेने सर्वे केला. पैसे महापालिकेने दिले. पण त्या रिपोर्टचा आजपर्यंत नगरपालिकेच्या किंवा महापालिकेच्या काळामध्ये तो रिपोर्ट काय आहे. त्यामध्ये महापालिकेचे उत्पन्न कुठे वाढलेले आहे? कुठे काय आहे? याचा कधीही महापालिकेमध्ये उल्लेख झालेला नाही. यापूर्वी मी तो रिपोर्ट या सभागृहामध्ये सादर करण्यासाठी विनंती केली. मला महापालिकेने पत्र दिले ही एजन्सी शासनाने नेमलेली आहे आणि त्याचा रिपोर्ट शासनाला सादर केल्यानंतर महापालिकेला देणार. शासनाकडे तो रिपोर्ट गेला की नाही माहिती नाही. पण आजपर्यंत तो रिपोर्ट महापालिकेत आलेला नाही. त्या राणे कन्स्ल्टन्टच्या रिपोर्टबाबत माझ्या माहितीप्रमाणे केळकर साहेब आपण त्यावेळी होता. तेव्हा तो रिपोर्ट काय आहे? का आपल्या सभागृहामध्ये येत नाही? याचा उल्लेख केला गेला पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे आज अनेक टॅक्स तलाठी वसुल करित आहे. हा प्रस्ताव शासनाकडे जाणार आहे. शासनाकडे जाताना काही काही गोष्टी यामध्ये होऊ शकतात. आज भाईंदरचे एक उदाहरण देतो. नंदनभवन को.ऑ.हा.सो. आहे. ती धोकादायक म्हणून आपण पाडली. पाडल्यानंतर आज त्या मालकीचा मालक उभा राहिला की, ती जागा माझी आहे. जोपर्यंत ती बिल्डिंग होती. एन.ए. टॅक्स सोसायटी भरत होती. तलाठी नोटीस सोसायटीला ठोकायचे आणि आज मालक कोण झाला रिकामी जागा झाली म्हणून तो मालक. म्हणजे या पध्दतीने आपण हे सर्वे करणार आहोत. सात-बाराचा उतारा चार लोकांच्या नावावर आहे. कोणाकडून पैसे वसुल करणार आहोत. फक्त शासनाला मंजुरी दयायची. शासनाकडून मंजुरी मागवल्यानंतर जेव्हा हा प्रस्ताव पुन्हा महासभेत आणणार. त्यावेळी त्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत असे आमचे निवेदन आहे.

**प्रफुल्ल पाटीलः-**

मा. उपायुक्त साहेब सांगतात हया बाजुने बोलले असते तर बरे झाले असते. मी मा. महापौरांच्या बाजुने बोलतोय. खरे म्हणजे हा प्रश्न बऱ्याच वर्षापासून आपल्याकडे प्रलंबित आहे. आपल्याला त्या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घ्यायला पाहिजे. अर्थात, ही प्रोसीजर थोडीसी किचकट आहे.

लांबलचक आहे आणि थोडा संशयित असल्याने हे सगळे प्रकरण या ठिकाणी निघालेले आहे आणि आपल्याला एक महत्वाची बाब अशी पहायला मिळेल की, ज्या ठिकाणी वर्षानुवर्षे परंपरागत आमचे काही बांधव सरकारी जमिनीत किंवा जी जमीन सरकारच्याही नावावर नाही इस्टेट एजंटच्या नावावर आहे अशा जमिनीत त्यांचे वास्तव्य आहे. आता वर्षानुवर्षे बांधलेली घरे दुरुस्तीला येतात. त्यावेळी नगरपालिका किंवा महानगरपालिका काय सांगते की, तुमच्याकडे काय कागदपत्रे आहेत. जास्त करुन उत्तन प्रभागामध्ये आणि डोंगरी या विभागामध्ये हा प्रॉब्लेम आहे. घरामध्ये अनेक वर्षापासून ती लोक राहतात. सरकारी जागा जरी असली तरी १९८३च्या अध्यादेशान्वये त्या सगळया जागा आता मालकी होतात. ते अतिक्रमण जरी म्हटले तरी ती मालकी होते. पण त्यांना जेव्हा घराची दुरुस्ती करायची असते. तेव्हा त्यांना कुठलेही कागदपत्र मिळत नाही. आपली जी टाउन प्लॅनिंग ॲथोरिटी आहे. ती त्यांना परमिशन देत नाही. मग कोणीतरी आमच्यासारखा नगरसेवक सांगतो मी तुमच्या पाठीशी आहे. करा दुरुस्ती. कारण त्याच्याशिवाय काही पर्याय नसतो. अशा लोकांचे प्रश्न अतिशय जाचक आहेत आणि त्यासाठी आपल्याला त्याच्यातून काहीतरी मार्ग काढला पाहिजे. आता ज्यांचे जागेवर घर आहे आणि तो त्या जागी राहतो आणि ती जागा कोणाच्या वैयक्तिक मालकीची नाही. ती जागा सरकारी आहे आणि ती जागा त्यांच्या मालकीची होणार एवढे निश्चित. मग त्यांना प्रॉपर्टीकार्ड मिळाले की ओनरशीपचा एक राईट असल्याचा दस्तऐवज मिळेल. त्याच्यावर त्यांना दुरुस्ती परवानगी किंवा नवीन बांधण्याची परवानगी देता येईल. पण असे करत असताना इतर लोकांना संकट येउ नये म्हणून तीन नियमाचा आधार घेउन ही प्रोसेस करायला हरकत नाही. म्हणून या ठिकाणी मी ठराव मांडतो महाराष्ट्र जमीन महसुली सर्वे आणि महसुली सर्वे नंबरची विभागणी नियम १९६९ च्या नियम चारमध्ये नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसुल संहिता नियम २(१) नमुना अ प्रमाणे गावच्या जमिनीवर हक्क नोंदणीची चौकशी करण्याकामी महाराष्ट्र जमीन महसुल जमिनीच्या मालकी हक्काची चौकशी नियम १९६७ च्या व महाराष्ट्र जमीन महसुल संहिता नियम २२ प्रमाणे नमुना अ ब क ड ही सर्व माहिती व चौकशी करण्याकामी सह जिल्हाधिकारी स्तरावरील व्यक्तीची नेमणूक करुन त्याप्रमाणे महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यु म्हणजे गाव, शहर, नगर व शहर मोजणी नियम १९६९ च्या तरतुदीनुसार जमिनीची मोजणी प्रॉपर्टीकार्ड सनद तयार करणे. प्रॉपर्टी कार्डासंबंधी उत्पन्न झालेल्या वादावर निर्णय घेण्यासाठी नियम ६(१) व (२) अन्वये सह जिल्हाधिकारी स्तरावर चौकशी अधिकारी नेमणे. तसेच, संबंधित जमिनीची सह जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली रेकॉर्ड ऑफ राईटची चौकशी व मालकी निश्चित केल्यानंतर जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमी अभिलेख यांच्यामार्फत तज्ञ संस्थेची सर्वे करण्याच्या कामी फक्त नेमणुक करण्यास प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**प्रकरण क्र. ४२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचे भूमापनाचे काम खाजगी संस्थेमार्फत करुन घेणेबाबत.

**ठराव क्र. २७ अ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका दि. २८.२.०२ पासुन अस्तित्वात आली असून त्यामध्ये एकुण १९ गांवाचा समावेश आहे. तसेच सदर क्षेत्राची विकास योजना शासनाने मंजुर केलेली असून त्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीमध्ये एकुण ७९.४० चौ.कि.मी. क्षेत्रफळ आहे. मिरा भाईंदर शहरातील काही क्षेत्राचे नगर भूमापन फक्त गावठाण क्षेत्रापुरते मर्यादित यापूर्वी साधारणतः १९७२ च्या दरम्यान झालेली आहे. तथापी त्यामध्येही कालानुरुप बरेच बदल झालेले असल्याचे दिसुन येत आहे व उर्वरित क्षेत्राचे नगर भूमापनाचे काम अद्यापही झालेले नाही. संपुर्ण शहराचे नगर भूमापण करण्यासाठी मागील बऱ्याच वर्षा पासुन भूमी अभिलेख विभागाकडे पत्र व्यवहार सुरु आहे. परंतू अद्यापही सदर काम सुरु होवू शकलेले नाही.

शासनाने सन २००० साली महाराष्ट्र जमीन महसूल (गाव, शहर व नगर भूमापन) नियम १९६९ मध्ये सुधारणा करुन नगर भूमापनाचे काम खाजगी संस्थेमार्फत शासनाच्या पूर्वमंजुरीने करुन घेता येण्याचे धोरण ठरविले असून त्याप्रमाणे ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्राचे नगर भूमापनाचे काम सुरु असल्याचे संदर्भित पत्रान्वये कळविण्यात आले आहे. शासनाच्या वरील धोरणाचे अनुषंगाने मिरा भाईंदर शहराचे नगर भूमापनाचे काम खाजगी संस्थेमार्फत करुन घेणे शक्य आहे. सदर काम खाजगी संस्थेमार्फत करुन घेतल्यास कमी वेळेत व गुणात्मकदृष्ट्या चांगले काम तसेच सदर सर्व कामाचे महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार संगणकीकरण करणे सुध्दा शक्य आहे. तथापी खाजगी संस्थेमार्फत करावयाच्या भूमापनासाठी होणारा खर्च महानगरपालिका तर्फे करावा लागणार आहे. सदर काम खाजगी संस्थेला शासनाच्या भूमी अभिलेख विभाग तसेच महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली

तसेच देखरेखी खाली करावे लागणार आहे. तसेच सदर कामासाठी कामाच्या प्रगती प्रमाणे रक्कम अदा करावयाची आहे. भूमी अभिलेख विभागामार्फत करावयाचे असल्यासही त्यासाठी होणारा खर्च महानगरपालिकेला शासनाकडे जमा करावा लागणार आहे. म्हणजेच सदर काम भूमी अभिलेख विभाग अथवा खाजगी संस्थेमार्फत केला तरीही त्याबाबतचा खर्च महानगरपालिकेलाच करावा लागणार आहे.

अशा परिस्थितीत सदर काम कमी वेळेत व दर्जेदार तसेच संगणकीकृत करुन घेण्याचे दृष्टीने खाजगी संस्थेमार्फत शासनाच्या मंजूरीने करुन घेणे जास्त संयुक्तीक राहील. महानगरपालिकेच्या सन २००३-०४ च्या अंदाजपत्रकात सदर कामासाठी रु. १.०० कोटी एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूली आणि महसुली सर्वे नंबरची विभागणी नियम १९६९ च्या नियम ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता नियम ६२(१) नमुना अ प्रमाणे गावाच्या जमिनीवरील हक्क नोंदणीची चौकशी करण्याकामी महाराष्ट्र जमीन महसूल जमिनीच्या मालकी हक्काची चौकशी नियम १९६७ च्या व महाराष्ट्र जमीन महसुल संहिता नियम २२ प्रमाणे नमुना अ, ब, क, ड ही सर्व माहिती व चौकशी करण्याकामी सहजिल्हाधिकारी स्तरावरील व्यक्तींची नंमणूक करुन त्याप्रमाणे महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यू म्हणजे गाव, शहर, नगर व शहर मोजणी नियम १९६९ च्या तरतुदीनसुार जमिनीची मोजणी, प्रॉपर्टी कार्ड सनद तयार करणे. प्रॉपर्ट्री कार्डसंबंधी उत्पन्न झालैया वादांवर निर्णय घेण्यासाठी नियम ६(१) व (२) अन्वये सहजिल्हाधिकारी स्तरावर चौकशी अधिकारी नेमणे तसेच संबंधित जमीनीची सहजिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली रेकॉर्ड ऑफ द राईटची चौकशी व मालकी निश्चित करण्यांत यावी.

शासनाच्या नवीन धोरणाप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जागांचे सिटी सर्वेक्षण खाजगी संस्थेमार्फत करुन घेण्यांस व त्यासाठी होणारा खर्च सोसण्यांस महापालिका तयार असून सदरचा धोरणात्मक प्रस्ताव पुर्वमंजुरीसाठी शासनास सादर करण्यांस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील.** **अनुमोदन :- श्री. आसिफ गुलाब शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४३ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रेः-**

मा. महापौर मॅडम प्रकरण क्र. ४३ या संपूर्ण प्रकरणामध्ये पहिली गोष्ट आपल्या विभागातर्फे सर्वे नवीन आणि जुन्या सर्वे नंबरचा कुठेही उल्लेख नाही. खालच्या ओळीमध्ये नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३८७(अ) दि. ३१/१०/२००१ अन्वये मंजुरी दिली असून नगरपरिषद पत्र क्र. नर/४०५/९८६३/२००१-२००२ दिनांक ११/२/२००२ अन्वये प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी शासनास सादर केलेला होता. हा प्रस्ताव साडे तीन महिने उशीरा का गेला? याची आम्हाला माहिती नाही. त्यानंतर सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांनी पत्र क्र. व्हीओ मिरा भाईंदर कलम ३७/अ.क्र. १९५९ स.स. ठाणे ९९५ दिनांक १/६/२००२ अन्वये मिरा भाईंदर नगरपरिषदेचे महापालिकेत रुपांतर झालेले यापूर्वी पाठवलेल्या फेरबदल प्रस्ताव, फेरबदल सुधारणा आवश्यक आहेत, असे याबाबत विचारणा केलेली आहे. नगरविकास राज्यमंत्री यांच्याकडे ७/८/२००३ ची बैठक झालेली आहे. हया सर्व विषयपत्रिकेमध्ये जे ठराव झालेले आहेत. त्याची आम्हाला कल्पना नाही. त्याच्यामध्ये काय ठराव झालेला आहे. त्याची नेमकी परिभाषा काय आहे. त्यानंतर नगरविकास राज्यमंत्री यांच्याकडे ७/८/०३ रोजी बैठक झाली. त्या सर्व ठरावानुसार असे वाटते की, राज्यमंत्र्यांनी आपल्याला निदेश दिले असतील. त्यानंसार हा ठराव आलेला आहे असे मला वाटते. स्पष्ट सांगतो या शहराची लोकसंख्या १९९९ म्हणजेच पहिले १८/१/९९ जवळजवळ ९७ साली फायनल झालेली आहे. त्यानंतर १५/७/९७ पासून अंमलात आलेली आहे. आज आपण २००३ मध्ये आहोत. जवळजवळ पाच वर्षावरती कालावधी झालेला आहे. त्यावेळेला जकात नव्हती. आज जकात आहे. हे जे रिझर्वेशन त्यावेळेला टाकले गेले. सर्वे नं. जुना २४, नवीन १२९ यामध्ये जे दाखवले गेले. हे मग चुकीचे होते का? त्याचे क्षेत्रफळ कमी-जास्त दाखवले होते का? त्यावेळच्या अधिका-यांनी हे जे आरक्षण जे काही मोठया प्रमाणात आहे. ते चुकीचे दाखवले होते का? असे आपल्याला वाटते का? त्याच्यात आपण काही रिडक्शन करतो. काही निवासी याच्या पट्ट्यामध्ये आणतो आहे. एक या ठिकाणी आम्ही येता-जाता दरवेळी

बघतो की, आर.सी.सी.चे काम चालू आहे. म्हणजे तुमचे ऑक्ट्रॉय नाक्याचे रिझर्वेशन आजच्या तारखेला आहे. हा ठराव आपण बदल करायला आता आणलेला आहे. या तीन महिन्या अगोदर तिकडे आर.सी.सी.चे डोभरे खणून, कॉलम वगैरे उघडून त्याच्यावर पिलर्स वगैरे वरती आले, पाच-पाच फुट आलेल्या आहेत. कुठल्याही मंत्र्याने मंत्रालयात बसून वाटेल ते आदेश दयायचे आणि इकडे आपण त्यांच्या म्हणण्यानुसार करायचे असा हा प्रकार माझ्या दृष्टिपथास येतो. कारण जर जोत्याचे बांधकाम पूर्ण होत असेल तर भाईंदरला जशी इतर लोकांची जोत्याची बांधकामे करताना परवानग्या वगैरे लागतात. अशा परवानग्या त्या दुकानदाराने आजच्या तारखेला ठराव येण्या अगोदर बांधकाम चालू केल्याप्रमाणे त्यावेळेला घेतल्या होत्या का? जर त्या घेतल्या असतील तर ते कुठल्या अधिकाऱ्यांनी दिल्या म्हणजे कुठल्या नियमानुसार दिलेले आहे. कारण आर झोन आता आपण निवासीपटटा करायला जातो आणि तिकडे बांधकाम जवळजवळ जोरात चालू आहे आणि क्षेत्रफळापैकी मघाशी जेव्हा गटनेत्यांची सभा झाली. त्यावेळी धनेगावे यांनी सांगितले की, हॉटेल दिल्ली दरबाराच्या व्यतिरिक्त जी न्यायप्रविष्ट बाब आहे. त्या प्लॉटमधील ठराविक हिस्सा न्यायप्रविष्ठ ती जमीन आहे. त्या व्यतिरिक्त करणार आहे, असे त्यांनी सकाळी उत्तर दिले. परंतु, ठरावाचा विषय काय म्हणतो? मध्यवर्ती जकात केंद्राच्या अनुक्रमांक ३५९ बाधित होणारे अस्तित्वात असलेल्या हॉटेल दिल्ली दरबारची व इतर जागा. सकाळी शेवटी उठताना ही चर्चा झाली ते बोलले की, त्याच्या व्यतिरिक्त होणार आहे आणि आता आम्ही सभागृहामध्ये वाचून दाखवतो की, या दिल्ली दरबारची केस ही कोर्टामध्ये प्रलंबित आहे. त्याचा निकाल काय लागेल? काही सांगता येत नाही. आम्हाला असे सांगितले गेले की, तो म्युचुअल अंडरस्टँडिंगला तयार आहे. तो जर तयार असेल तर कोर्टामध्ये पूर्णपणे जाऊन जे काही म्हणणे मांडणार असेल तर त्याच्यावर डिक्री घ्या आणि मग याबद्दल बोलू आणि निवासी आरक्षण नसतानासुध्दा तिकडे जी बांधकामे चालू आहेत. त्याला जबाबदार कोण आहे? आणि आताच्या वेळी अधिकृत किंवा अनधिकृत आहेत. त्याबद्दल नगरपालिकेने काय केले? कुठल्या आधारावर केले. आम्हाला याबद्दल काही माहिती नाही. जरा याचा या ठराव मंजुरी अगोदर खुलासा करावा.

**लिओ कोलासोः-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो की, मागील नगरपरिषदेने या संदर्भात ठराव करताना जो काही ठराव केलेला आहे. तो आमच्या निदर्शनास आणून दिला पाहिजे. त्या ठरावाची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे. ठरावामध्ये नक्की काय म्हटलेले आहे, हे आम्हाला समजायला पाहिजे. कारण जकात नाक्याचे जे रिझर्वेशन आहे. हे महानगरपालिकेच्या जकात व्यवस्थेच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचे आहे आणि जर एखादया माणसाला किंवा घटकाला गृहित धरुन त्या टिकाणी मॉडिफिकेशन्स येत असतील तर ते योग्य होणार नाही. म्हणून जकातनाक्याशी संबंधित मागील नगरपरिषदेने जो ठराव केलेला आहे. तोच सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा. म्हणजे नक्की त्या बाजुने निर्णय कुठल्या दिशेने आम्हाला मतदान करावे किंवा त्यावर काय विचार व्यक्त करावा हे ठरविता येईल आणि आज जर ते शक्य नसेल तर मग हा विषय तहकुब ठेवावा.

**रोहित सुवर्णाः-**

आदरणीय महापौर मॅडम, आपके माध्यम से मैं अधिकारीयों से मै जानना चाहता हुं की, मिरा भाईंदर क्षेत्र रोज औद्योगिक माध्यम से बढते जानेवाले क्षेत्र में काफी इन्डस्ट्रिअलायझेशन हो रहा है । यह लोग बाहर से बहुत बडी मात्रा मे यहाँ पर आ रहे है । ऑक्ट्रॉय नाके की जगह ऑलरेडी कम पड रही है । दहीसर, नयी मुंबई, कल्याण, या ठाणे, मुलुंड चेकनाका यह सभी जगह पर जगह कम पड रही है । हमारे मिरा भाईंदर का हायवे को जो टच जगह है । वह ऑक्ट्रॉय नाका है । और वो जगह हमेशा रिझर्वेशन मे ९७ मे जबसे सोच समझकर रिझर्वेशन मे रखा गया था । तब वहा बाधीत होनेवाले जो दुकानदार है या कोई भी लॅन्ड ओनर है उन्होने ऑब्जेक्शन लिया था क्या इसके बारेमें । इसमें कुछ लिखा हुआ नही है । और महाराष्ट्र म्युनिसिपल ऑक्ट्रॉय रुल्स १९६६ के अंर्तगत हर नागरिकके उपर जबाबदारी दिया गया उस ॲक्ट के अंर्तगत कि उसे अपना वाहन वहा पर खडा करके जो कोई गाडीके अंदर सामान है । वो ऑक्ट्रॉय नाकेपे बताना उस बिल को बताना, उस चलान को बताना और संबंधित फॉर्म को भरना और उसकी व्हॅल्युएशन, शेडयुल के अनुसार ऑक्ट्रॉय भरने की जिम्मेदारी नागरिकपर इसलिए उसके लिए गाडी खडी करने के लिए जगह की आवश्यकता होती है । इसलिए यह जगह को ऑक्ट्रॉय नाके मे रख दिया जाय । महाराष्ट्र ऑक्ट्रॉय रुल्स १९६६ के अंर्तगत अगर हम उसका उल्लंघन करते है तो सभी नगरसेवको को मालुम है उनका नगरसेवक पद भी कभी कभी रदद हुआ । जो लोगोने ऑक्ट्रॉय नही भरा । क्योंकी महाराष्ट्र म्युनिसिपाल्टी ॲक्ट आप सब जानते है । १६९ सेक्शन के अंडर किसी को कोई भी प्रकार का बिल आता है वो चाहे

हाउस टॅक्स हो या ऑक्ट्रॉय हो उस बिल का कोई फॉरमॅट नही होता ा वो बील अगर नगरपालिकाने क्लेम किया और आपके उपर डिमांड नोटीस आया है, और नगरसेवकने वो बिल अगर नही भरा तो उसका नगरसेवक पद रदद हुआ है ा ये जळगाव नगरपरिषद का जजमेन्ट है ा इसलिए मै चाहता हूँ कि, शहरको हमे इंडस्ट्रिलायझेशन और शहरकी बढती आबादी को देखते हुए एक इंच भी जगह किसीको न दिया जाय ा ऑक्ट्रॉय नाकेमे हमे और जगह लगनेवाली है ा वहॉ रातभर ट्रक खडे रहते है ा इसलिए ट्रक पार्किंग के लिए जगह कम है ा इन सभी बातो को मदय नजर रखते हुए मै सभी सभागृह के सदस्योसे बिनती करुंगा कि इसपर आप सभी विचार करे ा

**मिलन म्हात्रे:-**

या ठिकाणी जे बांधकाम चालू आहे. ते कुठच्या नियमानुसार आहे. त्याला परवानगी दिली आहे का? आर झोनमध्ये आहे का? पक्क्या स्वरुपाचे बांधकाम आहे. सी.सी.चे कॉलम टाकत आहेत.

**शेंडे:-**

मा. महापौर महोदय, त्या ठिकाणी जी बांधकामे चालू आहेत. त्यांच्या बांधकामाला बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही. रिपेअरींग परवानगी काही लोकाना देण्यात आली होती. बांधकाम परवानगी देण्यात आली नाही.

**मिलन म्हात्रे:-**

आपण जे आता उत्तर दिले तर या गावच्या बोरी आणि या गावच्या बाभळी असे आहे. तुम्हीसुध्दा त्या रस्त्यावरुन दिवसातून पंचवीस वेळा जाता. आम्हीसुध्दा दिवसातून वीस-पंचवीस वेळा जातो-येतो. ही संपूर्ण दुकाने रोड वायडिंगमध्ये भुईसपाट केली गेली होती. तिकडे काही दुकानाचा नामशेष उल्लेख नव्हता आणि राहिलेले रॉ मटेरियल भंगारवाले, लोखंडवाले, रॅबिटवाले यांनी सगळे उचलून नेले. जी वस्तू तुम्ही पूर्णपणे पाडली. त्याला रिपेरिंगचे परमिशन कुठल्या आधारावर दिले आणि तुम्ही ते रिपेरिंगचे परमिशन देताना जे बांधकाम तुमच्या रस्त्याच्या वायडिंगच्या व्यतिरिक्त राहिले असेल तर त्याची नोंद तुमच्याकडे आहे का? आम्ही पाहिले सगळे भुईसपाट केले. फक्त एक नवभारत हॉटेल कोर्ट मॅटर होते म्हणून राहिले. बाकी सगळे भुईसपाट केले. मग तुमचे जे रिझर्वेशन आहे. आता एखाद वेळेस आम्ही छोटेसे बांधकाम केले तर तुम्ही लगेच झोनवर बोट ठेवता असे कित्येक शेतकरी आहेत की, त्यांना कंपाउन्ड बांधायला पण मनाई केलेली आहे. स्वतःची संरक्षक भिंत बांधायला ज्या शेतक-यांनी रोडला जागा दिली. मोठया-मोठया तुमच्या रस्त्याला दिली. बारक्या गल्ल्यांना दिली. नगरपालिकेला सहकार्य दिले, अशा शेतक-यांना आपल्या डिपार्टमेन्टने ते शेतकरी असूनसुध्दा त्यांना भयंकर त्रास दिलेला आहे. नाईकसाहेब, मेहेरबानी करुन या विषयावर तुम्ही बोलू नका हा अतिक्रमणाचा विषय नाही. आपल्याकडे तो चार्ज नाही. मी तुमचा एकही शब्द ऐकणार नाही. मेहेरबानी करुन कोणाला वाचवू नका. तुमच्याकडे फक्त टॅक्स डिपार्टमेन्टचा चार्ज आहे. तुमचा विषय आल्यावर तुम्ही बोलायचे.

**मा. महापौर :-**

त्याना सर्व माहिती आहे. त्यांना बोलू दया. चुकीचे नको, पण कायदयाप्रमाणे बोलू द्यावे.

**मिलन म्हात्रे:-**

मी तुम्हाला सांगतो की, तिकडे बांधकाम नव्हते, ही गोष्ट सत्य आहे. नाईक साहेब, तुम्ही अतिक्रमणमध्ये होतात. मोठा मॉब आला होता. सगळे तुम्ही पाडले. तुम्ही स्वतः तिथे हजर होतात. सगळी दुकाने भुईसपाट केली. वर्तमानपत्रातील बातम्या आमच्याकडे आहेत. तुमचे फोटो आहेत. तुमची मुलाखत आहे आणि व्हीडिओ शुटिंगदेखील आहे. कशाला उत्तर देउन तुम्ही अडचणीमध्ये येता? जे अधिकारी आहेत, त्यांनी सांगितले आहे की, आपली ह्याला परवानगी दिलेली नाही.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

मा. महापौर मॅडम, या गावामध्ये कित्येक दिवसापासून रस्ता रुंदिकरण करा, अशा पध्दतीची मागणी होती. कमीत कमी तीन-चार वेळा त्या जागेवर रस्ता रुंदिकरण करण्यासाठी त्या जागेवर जाउनही काही अपरिहार्य कारणास्तव परत आलेले आपल्याला माहिती आहे आणि यामध्ये काही नगरपालिका कारकिर्दीत असताना जे नगरसेवक आहेत, त्यांना या बाबतची संपूर्णतः माहिती आहे. नगरपालिकेला रस्ता रुंदिकरणासाठी जागा घ्यायची असल्यास त्यांची जी जमीन शिल्लक राहिली. त्या शिल्लक राहिलेल्या काही रोड वायडिंग करित असताना त्यांची दुकाने शिल्लक राहिली. त्यामुळे त्यांना बांधा म्हणून सांगायचा प्रश्न आला नाही. पण ज्या ठिकाणी संपूर्णतः उध्वस्त केले आणि त्यांची जागा शिल्लक आहे. शिल्लक असलेल्या जागेवर त्यांचे उपजिविकेचे साधन सुरु करणे आवश्यक

आहे. कारण त्या ठिकाणी पूर्णतः आम्ही संपूर्ण दुकाने आणि बाकी सर्व भुईसपाट केले होते आणि शिल्लक राहिलेली जागा जेवढी त्यांच्या मालकीची शिल्लक असेल नगरपालिकेच्या मालकीची नसून त्यांच्याच मालकीची जी जागा शिल्लक असेल त्या ठिकाणी आयुक्ताशी चर्चा करुन शिल्लक राहिलेल्या जागेमध्ये उपजिविकेचे साधन सुरु करण्यास सांगितलेले आहे.

**मिलन म्हात्रे:-**

मी ते बांधकामाचे विचारले की, इथे जे बांधकाम चाललेले आहे. तुम्ही रिपेरिंगची परमिशन दिली. आम्ही तुम्हाला हे सांगत नाही की, तुम्ही कोणाला बेघर किंवा बेरोजगार करा. अनेक लोक हया ठिकाणी बांधून राहिले. त्या बेकरीवाल्याचे बांधकाम झाले. आम्ही काय तक्रार केली नाही कारण त्यांची जागा असेल त्यांनी बांधले.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

स्वतःच्या मालकीची जमीन आहे. सात-बारा त्यांच्याच नावाचे आहेत.

**मिलन म्हात्रे:-**

असु दे. आमची पण जागा रस्त्यावर गेलेली आहे. भरपूर जागा रस्त्यावर गेल्या आहेत. तुम्हाला हवे किती सांगू? चला जागेवर नेवून दाखवतो. आमच्या स्वतःच्या गेलेल्या आहेत. आम्ही पण त्यामध्ये बरेचसे भोगलेले आहे. एक आहे की, रस्त्यावर जागा तुम्ही पूर्णपणे ॲक्वायर केली. त्यामध्ये ऑक्ट्रॉय नाक्याचे रिझर्वेशन असूनसुध्दा परत तिथे रिॲक्युमेन्ट आपण असे काय करु शकता? दुसरीकडे कुठेतरी करा. आम्ही कुठे नाही बोलतो, अशा सगळयांना तुम्ही न्याय देणार आहात का? भाईंदर स्टेशनला असे तुम्हाला शंभर जण उभे करुन दाखवतो. त्यांना जागा दया. सगळयांचे पुर्नवसन करुन घ्या, असे ठरावदेखील एकत्र आणा. काशीमीरा, भाईंदर, गोडदेव घ्या. सगळे वाढवले आपण.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

शिल्लक राहिलेल्या जागेमध्ये जी दुकाने चालू आहेत. ती जर रिझर्वेशनमध्ये येत असेल तर तपासणी करु.

**मिलन म्हात्रे:-**

आहेतच. एकतर आपली जे आम्हाला चुकीचे उत्तर मिळत आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

चुकीचे उत्तर मी कधी देत नाही.

**मिलन म्हात्रे:-**

आता तुमच्या भाषणामध्ये निघाले की, आम्ही पूर्ण जमीनदोस्त जमीन केली. मग तुम्ही रिपेरिंग कुठले करणार.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

शिल्लक राहिलेल्या जमिनीमध्ये त्यांना ठेवायला नको का?

**मिलन म्हात्रे:-**

तुमची कारवाई झाल्यानंतर फक्त न्यु भारत हॉटेल फक्त राहिले आणि बाकी सगळे भुईसपाट केले. फोटो आहेत.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

त्यांनी सुध्दा सांगितलेले आहे की, महिनाभरात काढून घेतो नाहीतर आम्ही कोर्टात केस जिंकणार होतो. ईव्हन हटकेशचा निकाल हा आमच्या बाजूने लागला. हटकेशच्या इंडस्ट्रियल तिन्ही ज्यांनी दहा वर्षापूर्वी स्टे घेतला होता. तो स्टे उठवला आणि आमच्या बाजूने निकाल लागला. त्यानंतर शिल्लक राहिलेल्या जागेत आम्हाला एक मजला दया.

**मिलन म्हात्रे:-**

मला एक सांगा की, ऑक्ट्रॉयचा नाका मग तुम्ही कुठे नेणार?

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

ऑक्ट्रॉयचा नाका आतमध्ये जाणार साहेब.

**मिलन म्हात्रे:-**

कुठल्या याच्यात तुम्ही ऑक्ट्रॉय नाका ठेवणार?

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

त्या प्लॉटमध्ये जाणार.

**मिलन म्हात्रे:-**

व्हेईकल तुमची कुठे उभी राहणार?

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

व्हेईकल ही प्लॉटमधून रस्त्यावर येणार. त्या प्लॉटमध्ये ऑक्ट्रॉय नाका होणार आहे.

**मिलन म्हात्रे:-**

म्हणजेच ऑक्ट्रॉय नाका आतमध्ये आणि दुकाने बाहेर मेनरोडला. पहिली दुकाने दिसली पाहिजेत का?

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

हे बघा, ऑक्ट्रॉयच्या बाबत ज्या वाहनांद्वारे ऑक्ट्रॉय भरायचे आहे. ते वाहन त्या प्लॉटमध्ये जातील त्यांना तो माणूस उभा राहील आणि तो ऑक्ट्रॉयची पावती फाडेल. पावती फाडल्यानंतर वाहन मेन रोडवर येईल.

**मिलन म्हात्रे:-**

आतापर्यंतच्या सर्व नगरपालिका व महानगरपालिका याचे ऑक्ट्रॉय नाक्याचे कुठलेही कन्स्ट्रक्शन आतमध्ये नाहीत. दहिसर नाका बघा. तसेच, ठाणे महानगरपालिकाचे दोन नाके आहेत. घोडबंदरचा एक आहे. संपूर्ण प्लॉटचे रिझर्वेशन जे आहे फक्त नाक्याचे माझे म्हणणे एकच आहे की, एवढी आपण स्ट्रीक कारण त्याला आर झोन करुन देत आहोत. मेन तुमच्या नाक्याच्या ठिकाणी उदया भविष्यात दहा वर्षानंतर.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

त्यांच्या मालकीच्या जमिनी जर ऑक्ट्रॉय नाक्यामध्ये येतात की नाही ते बघायला लागेल.

**मिलन म्हात्रे:-**

ते बघावे. आमच्यासुध्दा मालकीच्या जमिनी रोडमध्ये गेलेल्या आहेत. ॲक्वायर केल्या आहेत लोकांनी. आम्हाला काही नगरपालिकेने कळविले नाही की, ही जागा रस्त्यासाठी घेत आहोत वगैरे. माती टाकून मोकळे झाले बिल्डर लोकांच्या तिकडे सोयी झाल्या.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

कुठच्या ठिकाणी?

**मिलन म्हात्रे:-**

प्लॉटवर नेवून दाखवतो मी तुम्हाला. आम्हाला नाही कळविले कोणी. तुम्ही जी आता भाषा वापरता ना.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

कधीचे आहे.

**मिलन म्हात्रे:-**

कधीचे असू दया. हा नियम आहे. मी हया नियमानुसार बोलतो आहे. तुम्ही जी भाषा वापरता. आम्हाला कोणी कळविले नाही.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

मी अशी कुठलीही भाषा वापरलेली नाही साहेब.

**मिलन म्हात्रे:-**

हे जे तुम्ही आता बोलले की, खाजगी आहे की नाही ते बघुया. आम्हाला कोणी बोलले नाही की तुमची जमीन खाजगी कि नाही. रस्ते बनवून टाकले.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

खाजगीच्या बाबतीत मी कुठे काय बोललो मी असे बोललो की, ते आता ऑक्ट्रॉयच्या जागेत येतात किंवा नाही ते बघू.

**मिलन म्हात्रे:-**

तेच तर मी म्हणताये आमच्या रिझर्वेशनच्या जागेत आमच्या जमिनी आहेत. ते कुणीही विचारले नाही ॲक्युवेशन झाले सगळे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

पूर्वीचे मला काही माहित नाही साहेब.

**मिलन म्हात्रे:-**

अहो, तुमच्या कालावधीतसुध्दा झालेले आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

कुठले?

**मिलन म्हात्रे:-**

मी दाखवतो आपल्याला प्लॉटवर नेउन. काय सांगता तुम्ही आम्हाला कुणीही नाही सांगितले.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

येतो. तुमच्याबरोबर.

**मिलन म्हात्रे:-**

खाजगी प्लॉट आहे किंवा सरकारी आहे हे आम्हाला कुणीही विचारले नाही. पटापट माती टाकून, डांबर टाकून मोकळे झाले. बत्या पण लागल्या.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

एखाद्या वेळी टी.डी.आर. दिला असेल.

**मिलन म्हात्रे:-**

काहीही नाही. माझ्याकउे पत्र आहे. मी मागितले. परंतु, मला आठ वर्षात अजून मिळालेला नाही. किती टि.डि.आर दिले. तुमच्या अधिका-यांनी ते क्लिअर करावे. एफ.एस.आय., टि.डी.आर किती लोकांना दिली ते कळवावे. हा जो ठराव आणलेला आहे असे या अगोदर किती लोकांना तुम्ही बेनिफिट दिले आहे. हा सेम ॲज इट इज किती लोकांना बेनिफिट दिले. लोकांची राहती घरेसुध्दा गेली.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

कुणालाही बेनिफिट दिलेले नाही. हा प्रस्ताव जो आलेला आहे. हा सन १९९९ चा आहे आणि आताच्या केलेल्या डिमॉलिस्टची ॲक्शनला आणि त्यांना बांधत असलेल्या ॲक्शनला हया ठरावाचा काहीही संबंध नाही. सन १९९९ साली नगरपालिकेने ठराव केला कि, ऑक्ट्रॉयच्या जागेमध्ये एवढा एरिया डिलीट करावे आणि ते रेग्युलाईज करावे.

**मिलन म्हात्रे:-**

त्या ठरावामध्ये कारण असे आहे की, ऑक्ट्रॉय नाही आहे. म्हणून ती जागा डिलीट करावी. आता ऑक्ट्रॉय आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

ऑक्ट्रॉय जरी नसले तरीसुध्दा इकडे बारा फुट आणि तिकडे बारा फूट सोडा. म्हणून ऑक्ट्रॉयची जागा रिझर्वेशन म्हणून वगळा असा ठराव नाही. सन १९९९ चा ठराव वाचून दाखवतो.

**मिलन म्हात्रे:-**

म्हणून तर बोलतो की, ऑक्ट्रॉयची जागा कशी काय वगळतो?

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

ऑक्ट्रॉयची जागा वगळायचे नाही चालले आहे. मिरा भाईंदर शहराची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ कलम ३१ अन्वये १४/०५/९७ मंजूर करण्यात आलेले आहे. सदर विकास योजनेत आरक्षण क्र. ३५९ मध्यवर्ती जकात केंद्रासाठी दर्शविण्यात आले आहे. सदर आरक्षणाचे ०.७५ हेक्टर इतके आहे. सदर आरक्षणा लगत असलेल्या ४५ मीटर रुंदीच्या काशीमीरा रस्त्यावर काही दुकाने, हॉटेलची बांधकामे फार पूर्वीपासून अस्तित्वात आहेत. हॉटेल दिल्ली दरबार यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना १९६६ चे कलम ४७ अन्वये बांधकाम परवानगी मिळण्याबाबत शासनाकडे अपिल केले होते. मात्र, हा प्रस्ताव नगरपरिषदेकडे कलम ३७ नुसार सादर केल्यास त्यास नगरपरिषदेने मान्यता देऊन प्रस्ताव शासनाकडे पाठविल्यास विचार करण्यात येईल, असे सांगितले होते. तदनंतर प्रस्ताव नगरपरिषदेकडे सादर केलेला आहे. उपरोक्त बांधकामेही ४५ मीटर रुंदीच्या रस्त्याने बाधित होत असल्याने भविष्यात रस्ता रुंदिकरण वेळी मागे स्थलांतरीत होउ शकतील. रस्त्यालगतचे मध्यवर्ती जकात केंद्राचे आरक्षण हे पश्चिम द्रुतगती मार्गाच्या हददीपासून काशीमीरा रस्त्याच्या हददीपासून बारा मीटर कमी केल्यास उपरोक्त बांधकामे हे रस्त्यावर स्थलांतरीत होउ शकतील. रस्ता रुंदीकरण करणे सोपे जाईल. मुख्य रस्त्यापासून करण्यास व बाहेर पडण्यास रस्ता रुंदीचा मार्ग वगळून इतर पट्टी वजा, भाग दहा आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करुन घेण्यात यावे. या बदलामुळे क्षेत्रात जे आरक्षणाचे क्षेत्र ०.६५ इतके राहिल, असा बदल करणेस महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना १९६६ चे कलम ३७ अन्वये कारवाई करणेस शासनास विनंती करण्यात यावी. सदर कारवाई करण्यास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. म्हणजे जी बांधकामे आणि आता झालेले रस्ता रुंदीकरण याच्याशी या प्रकरणाचा काहीही संबंध नाही. हे प्रकरण फक्त

०.७५ हेक्टरऐवजी ०.६५ हेक्टर आरक्षण करेल. म्हणजे ०.१० या रस्त्याच्या बाजूने आणि त्या रस्त्याच्या बाजूने वगळायचा ठराव हा रस्ता रुंदीकरणापूर्वी १९९९ साली झालेला आहे आणि ही पेपरला जाहिरात देउन ऑब्जेक्शन सेशन नागरिकांचे मागविले आहेत. ऑब्जेक्शन सेशन आले नाहीत म्हणून अंतिम ठरावदेखील झालेला आहे. हे १५ मार्च १९९९ ला नोटीफिकेशन झालेले आहे. गव्हर्नमेन्टचे गॅझेट झालेले आहे. त्यानंतर अंतिम ठराव झालेला आहे. अंतिम ठराव ३१/१०/०१ फेरबदलाच्या कारवाईस मंजुरी देणे व शासनाकडून प्राप्त प्रस्तावास अंतिम मंजुरी देणे. मिरा भाईंदर शहराची विकास योजना १४/०५/१९९७ रोजी मंजुर झाली. १५/७/९७ पासून अंमलात आलेली आहे. मंजुर विकास योजनेत फेरबदल करण्यासाठी यापूर्वी नगरपरिषदेने ठराव क्र. १३१,१३२,१३२(१),१३२(२),१३२(३) व दिनांक २६/०६/ १९६(१),१९६(२),१९६(३)ते (५), १८/१/९९ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कारवाई करण्यास ठराव मंजुर करण्यात आला. तदनंतर उपरोक्त फेरबदलाची इरादा वृत्तपत्र व राज्यपत्रात प्रसिध्द करण्यात आली असून संबंधिताकडून सुचना, हरकती मागविण्यात आल्या होत्या. तथापि, सोबत जोडलेल्या यादीतील फेरबदलाच्या प्रस्तावासाठी सुचना, हरकती प्राप्त म्हणजे त्यावेळी कोणाच्याही हरकती आलेल्या नाहीत. त्यामुळे सदर फेरबदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना १९६६ कलम ३७(२) अन्वये अंतिम मंजुरीसाठी शासनाकडे सर्वसाधारण सभेची मंजुरी देण्यात येत आहे. ही मंजुरी देउन शासनाकडे पाठविली आणि या प्रस्तावामध्ये गोषवा-यामध्ये हे दोन्ही ठराव सवार्नुमते आहेत. एकही विरोध नाही. फक्त त्यामधील ०.७५ ऐवजी ०.६५ म्हणजे ०.१० वगळायचे आहे.

**मिलन म्हात्रेः-**

दहा हेक्टर आरक्षण कमी झाले.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.)ः-**

नाही. दहा हेक्टर नाही. ०.७५ होते. ते ०.६५ झाले. आरक्षण दहा पॉइन्टने कमी झाले. तुम्ही संपूर्ण हटवता म्हणता ते चुक आहे. हा प्रस्ताव रस्ता रुंदीकरणापूर्वीचा आहे. याचा आणि त्या रस्ता रुंदीकरणाचा काहीही संबंध नाही आणि दुसरा महत्वाचा मुददा तुम्हाला निदर्शनास आणतो की, मिरा भाईंदर नगरपरिषदेचे महापालिकेत रुपांतर झाल्याने यापूर्वी पाठविलेला फेरबदल प्रस्ताव, फेरबदल सुधारणा आवश्यक आहे किंवा कसे याची विचारणा करण्यासाठी ज्यावेळी पहिला ठराव झाला. नोटीफिकेशन गव्हर्नमेन्टचे निघाले. पेपरला प्रसिध्दीकरण झाले. सर्वानुमते ठराव झाले. हरकती, सुचना मागविल्या. अंतिम ठराव करुन शासनाकडे पाठविले. मिनव्हाईल ही नगरपालिका महापालिका झाल्यामुळे हे फेरबदल तुम्हाला पाहिजे का नको. हे सभागृहाने ठरवायचे आहे. नको असेल तरी तसे ठरवा. पाहिजे असेल तर तसे ठरवा, अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**मिलन म्हात्रेः-**

आरक्षण स्थानांतरीत काही कमी होउ नये या मताशी आम्ही आहोत. आरक्षणामध्ये काही फेरफार करु नये असे मला वाटते आणि पुन्हा रत परत सांगतो आपल्या कुठल्याही डिपार्टमेन्टला अनेक वेळा आम्ही सांगितले आहे की, प्रत्येक डिपार्टमेन्ट नोटीस बोर्ड आणि एक सुचनाफलक लावला जावा. तुमच्या ज्या काही नोटीसा येतात, त्या कुठल्यातरी थातुरमातुर पेपराला येतात. दहा पेपर काढले जातात आणि ते आम्हाला काहीच कळत नाही. प्रत्येक डिपार्टमेन्टला जर तुमचे नोटीस बोर्ड असेल तर तुमच्या बोर्डावरती हरकती व सुचना वाचण्याची तसदी घेतो. आम्ही परंतु आपल्या डिपार्टमेन्टला अजून अंमलात आणलेले नाही. ग्राउन्ड फलोअरला नोटीस बोर्ड पडलेले आहेत. त्यांना लावण्याला मुहुर्त अजून मिळालेला नाही.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.)ः-**

हे १९९९ साली प्रसिध्द झालेले आहे. १९९९ मध्ये दैनिक लोकमत पेपरला आलेले आहे. २२/०३/१९९९ च्या पेपरमध्ये आलेले आहे.

**रिटा शाहः-**

महापौर मॅडम, नाईकसाहेबांनी यावर आपल्याला चांगली माहिती दिली. कारण नेहमी आपण बघतो की, काही प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही की नाईकसाहेब उठतात आणि नाईक साहेब आपल्याला पटवून पण देतात. मी त्यांचे अभिनंदन देखील करते. पण ही गोष्ट ए.टी.पी. डिपार्टमेन्टची आहे. संबंधित डिपार्टमेन्टच्या अधिकाऱ्यांनी जबाब दयायला पाहिजे. तर नाईकसाहेब देतात त्याबददल मी त्यांचे अभिनंदन केलेले आहे. आता त्याच्यामध्ये सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सांगितले की, लोकांना त्यांनी रिपेरिंगची परमिशन दिलेली आहे. संपूर्ण भागच उध्वस्त केलेला आहे. त्याला आपण काय रिपेरिंग करणार? आणि तो संबंधित अधिकाऱ्यांनी जबाब दयावा. मी नाईकसाहेबांकडे जबाब

मागत नाही. जबाब आहे ते मला बरे वाटत होते. आपण परत मला अभिनंदन दया. याचा जबाब संबंधित अधिका-याने दयायला पाहिजे. आपण आता चार्ज घेतलेला आहे. त्यावेळी आपण नव्हता. धनेगावे साहेबांनी याचे उत्तर दयावे. आम्हाला काय नाव घेउन बोलावे लागेल काय?

**शेंडे:-**

नगररचना विभागाचा चार्ज मी घेतला. मी विभाग प्रमुख आहे. नगररचना विभागाचा विभागप्रमुख म्हणून मी उत्तर देत आहे.

**रिटा शाह:-**

विभाग प्रमुख आहात ते मला माहिती आहे. पण तेव्हाचे संबंधित अधिकारी होते. त्यांना हे प्रकरण माहिती आहे. आपण केवढी स्टडी केली. हा सर्वे नंबर कुठला आहे? हे आपल्याला माहिती आहे का?

**शेंडे:-**

सर्वे नंबर बाबत माहिती आहे.

**रिटा शाह:-**

तेव्हा काय घडले होते ते तुम्हाला माहिती आहे का?

**शेंडे:-**

जे घडले होते. त्याबददल मा. नाईकसाहेबांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे.

**रिटा शाह:-**

मी काय विचारले आहे की, तुम्ही जी रिपेरिंगची जी परमिशन दिलेली आहे. तर सर्व उध्वस्त झाल्यावर रिपेरिंग काय करणार आहे तिथे तुम्ही?

**शेंडे:-**

रिपेरिंगला हया अटी घालूनच परवानगी दिलेली आहे.

**रिटा शाह:-**

सर्व उध्वस्त झाल्यावर रिपेरिंग कसले नवीन बांधकाम झाले ते.

**शेंडे:-**

त्या अटींच्या विरुध्द असेल तर तसा त्याबद्यल निर्णय घेता येउ शकतो.

**रिटा शाह:-**

म्हणून सांगते आपण उत्तर देउ नका. तुम्ही कशाला हे करता. ज्यावेळी संबंधित अधिकारी होते त्याना जबाब देउ दया.

**रोहिदास पाटील:-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, जगात नाक्यावरील ०.१० हेक्टर जमीन बाबत आहे. एकतर पहिल्यांदा जकातनाक्याची मी दोन गोष्टी आपल्या निदशर्नास आणू इच्छितो. सभागृहाने त्यावर लक्षात घ्यायला पाहिजे. जकातनाक्याचे आरक्षण झाल्यानंतर जकातनाक्याच्या ठिकाणी जकातनाका आणि पार्किंग असे आरक्षण झाले. त्याचबरोबर जकातनाका पहिल्यांदा डाव्या बाजूला होता. तो जकातनाका अनेक वर्ष जकात वसुल करुनसुध्दा ही नगरपालिकेची जागा कुठे गेली? हे कोणाला माहिती नाही. ती मोठया जागेवर असलेल्या आज हॉटेल बनले. माझा साधा प्रश्न असा आहे की, जे वर्ग करायचे आहे हा विषय वेगळा आहे. आता त्या ठिकाणी असलेल्या बांधकामाला भारतीय जनता पार्टीच्या तेरा नगरसेवकांनी ऑब्जेक्शन घेतले आहे. त्या ठिकाणी चाललेले बांधकाम रस्ता रुंदीकरणातील, आरक्षणातील आहे. आता ते बांधकाम चालू आहे की बंद आहे? याबाबत उत्तर मिळावे.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.) :-**

काही बांधकाम चालू आहे. काही बांधकाम बंद आहे.

**रोहिदास पाटील :-**

चालू आहेत ठिक आहे. या सभागृहात आपण उत्तर देतो की, चालू आहे त्याला तुमचे सौजन्य आहे, नियम आहे की कसे काय आहे.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.) :-**

याबाबत मी यापूर्वीही उत्तर दिलेले आहे की, शिल्लक राहिलेल्या त्यांच्या मालकीच्या जमिनी आयुक्तांशी चर्चा करुन याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे, हे मी यापूर्वीच सांगितलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

हा निर्णय होउच शकत नाही. मी सभागृहाला सांगतो की, कोणाशी चर्चा करुनच निर्णय होणार. जेव्हा आमच्या मालकीच्या जमिनीवर आम्ही जेव्हा बांधतो तेव्हा त्याला येणे परमिशन नाही, नगरपालिकेचे परमिशन नाही. तर ते अनधिकृत ठरले जाते. तर सौजन्य कसे होईल.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.) :-**

तसा हा ठराव फेटाळला की आपण ते परत तोडून टाकू.

**रोहिदास पाटील :-**

ठरावाचे कन्फ्युजन यामध्ये करायचे नाही. ठराव हा विषय वेगळा आहे आणि वस्तुस्थिती हा विषय वेगळा आहे. मी तुम्हाला सांगितले माझ्या बापाच्या जमिनीवर मी बांधकाम करतो हे येणेच्या नियमानुसार आहे की कसे आहे? मी बांधकामाची महापालिकेची परवानगी घेतली नाही म्हणून तोडून टाकायचे. मी तुम्हाला एक नाही अशी अनेक उदाहरणे देतो. नाईकसाहेब, तुम्ही ज्या पध्दतीने उत्तर दिले त्या पध्दतीने एकदम इझी घेउ नका. या सभागृहामध्ये आपण उत्तर दिलेले आहे. मी तुमच्याशी बोलणे केल्यावर चालत असेल तर आम्हाला तशा पध्दतीने चालायला लागेल. अधिका-यांशी बोलणी करा. तेथील नियम काय आहे? ए.टी.पी. काय आहे? पण मला माहिती मिळाल्याप्रमाणे जसे केळकर साहेबांच्यासमोर सन्मा. सदस्य केसरीनाथ म्हात्रेनी सांगितले की, तिकडचे बांधकाम बंद केलेले आहे आणि ते खरे आहे की, आपण सांगता ते खरे आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.) :-**

आता आपण जे बोललात की, जे क्षेत्र आरक्षणामध्ये येते. हा विषय आहे म्हटल्यानंतर त्याचा निर्णय होईपर्यंत थांबावे असे मी म्हटले. म्हणून शब्दप्रयोग केला. काही बांधकामे चालू आहेत. काही बांधकामे बंद होती. विहिराच्या बाजूला सोळा लोकांना पूर्णपणे बंद केले आणि त्या बाजूला चालू होते. त्यांनाही बंद करायला लावले. परंतु, याचा निर्णय काय होतो आहे की, तेथील जमीन लोकांची आपण जी घेतली तर रस्ता रुंदीकरण तसे होत नाही. रस्ता रुंदीकरण होत असताना त्यांच्या जमिनी स्वतःच्या मालकीच्या शिल्लक असतील. आता हटकेशच्या इंडस्ट्रिज तीन आहेत. त्या कोर्ट मॅटरमध्ये चालल्या होत्या. त्यांचे निम्मे-निम्मे इंडस्ट्रिज जातील. मग त्याना आपण रस्ता रुंदीकरणात ग्रामपंचायतीच्यावेळी परवानग्या येणे आहे. त्यांच्या जर निम्या जागा घेतल्यानंतर त्यांना एक फलोअर वाढवून दयायचा आहे. मग हे परवानगीत बसते का? विचारल्यानंतर आम्ही नाही म्हणणार. आता बेस्टचे रस्ता रुंदीकरण करणे हा महापालिकेच्या माध्यमातून आम्ही करतो.

**रोहिदास पाटील :-**

काशिमीरापासून भाईंदरपर्यंत महापालिकेची एकही फुट जागा नाही. रेल्वे फाटकापासून नवघरपर्यंत महापालिकेची एकही फुट जागा नाही. नवघर गावापासून बंदरवाडीपर्यंत एकही फुट जागा नाही. गोडदेव गावापासून प्रशांत हॉटेलपर्यंत महापालिकेची एकही फुट जागा नाही. त्या शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत. त्या शेतक-यांच्या जमिनीला तुम्ही कधी दाद दिली नाही. जो माणूस न्याय मागायला आला. ते तुमच्या समोर येतो.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.) :-**

सिटी सर्वेच्या नकाशावर काही साठ फुटाचे, काही तीस फुटाचे, काही चाळीस फुटाचे, काही ऐंशी फुटाचे रोड दाखविलेला आहे. म्हणजे हा चुकीचा आहे.

**रोहिदास पाटील :-**

जो चुकीचा रोड दाखवला. त्याची कारवाई केली का? नाईक साहेब, मी सकाळी तुम्हाला सांगितले की, अधिकाऱ्यांनी दखल न घेतल्यामुळे शिवार गार्डन आज नाही ॲक्वायर झाले. शिवार गार्डन ७९ ला ॲक्वायर झाले. तो रस्ता दिडशे फुटचा पण आपण ३४ लाख रुपये खर्च केले आणि शिवार गार्डनला धक्का बनविला. आता रस्ता रुंदीकरण आले. तुम्ही जे.सी.पी. चालविली. पैसे कोणाचे गेले? नागरिकांचे पैसे गेले. त्यावेळी जी आरक्षणे होते. त्यावेळी ती बघितली नाहीत. त्या त्या ठिकाणी आपण बांधत गेलो आणि जर आता आरक्षणाचाकायदा सांगत असाल तर कायदा सर्वांना एकच लागतो. आमचे स्पष्ट मत आहे की, हा जो विषय आहे तर बांधकामाना परवानगी देण्याचा विषय नंतर येईल. आता आपण जर ठराव केला तर यु.डी. कडे जाईल. यु.डी. त्याला सॅक्शन देणार. त्यानंतर तुमच्याकडे येणार. मग टी.पी. प्रस्ताव येईल. तो मंजुर करणार. मग आयुक्त सही करतील आणि मग नंतर त्याचे वेस्टर्न हॉटेलसारखे काय बनवायचे असेल ते बनेल. आता ते बनणार नाही. आता कसे बनेल?

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.) :-**

आता जो निर्णय घ्यायचा तो निर्णय झाला की, आम्ही त्याबाबत निर्णय घेतो.

**रोहिदास पाटील :-**

बांधकामाचा निर्णय पहिला आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो. जे बांधकाम तोडलेले आहे. त्याना परवानग्या दिलेल्या आहेत. कोणाची बांधकामे चालू आहेत. तर त्यांना तुम्ही रस्त्यावर आणणार की, त्यांना तुम्ही पुर्नवसन करुन दयाल.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.) :-**

ते सभागृहाने ठरवायचे आहे. रस्ता रुंदीकरणाचे पण सभागृहाने ठरवायचे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

बांधकाम तोडलेले आहे. तुम्ही त्याला पुर्नवसन पण करुन देता. आज नीलकमल हॉटेलजवळ बी.जे.पी.चे कार्यालय तोडल्यानंतर तुम्ही ते पुर्नवसन करण्यासाठी तुम्ही हायवे पटटयावर काही बांधकाम करण्याची परवानगी देता याचा मग अर्थ काय? म्हणजे या लोकांना रस्त्यावर जायचे का?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, त्यावेळी तिथे बांधकाम चालू होते. तेव्हा आम्ही जाउन विचारले हे बांधकाम कसे चालू आहे? तर तुम्ही सांगितले आम्ही परवानगी दिली. हयावेळेची जागा काय तुमची होती? तुम्ही कशी त्यांना आठवण करुन दिली.

**सुर्यकांत भोईर :-**

याचा अर्थ मग तिथे तुम्ही जर अन्याय करत असाल तर बी.जे.पी. चे कार्यालयदेखील तुम्ही तोडा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, आता तुम्ही हे दुसरे प्रकरण आणले आहे. बाकीच्या लोकांची पण रस्ता रुंदीकरणामध्ये जागा गेली होती. मग त्यांना जागा दिली का नाही?

**सुर्यकांत भोईर :-**

काशीमीरा रोडची जर तुम्हाला बांधकाम परवानगी दयायची नसेल तर तु म्ही दिलेले सर्व बांधकाम तोडा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, अशाप्रकारचा अन्याय करु नका. अशाप्रकारचा तुम्हाला जर ठराव आणायचा असेल तर इतर लोकांचे पण सगळे आणा. बांधकाम परवानगी घ्या. हे टी.पी. कडे प्रकरण घ्या आणि सर्वांना परवानगी दया. माझ्या वॉर्डातसुध्दा नीलकमल हॉटेलपासून लिबर्टी तबेल्यापर्यंत रस्ता रुंदीकरणाचे ठराव केलेले आहेत. ९४ चे त्यांच्याकडे पुरावे आहेत. शासनाचे सगळे त्यांच्याकडे पेपर आहेत. मग तुम्ही त्यांना पण परवानगी दया आणि तो पण ठराव आणा. सगळयांचे पुर्नवसन करा.

**सुर्यकांत भोईर :-**

रस्ता रुंदीकरणामध्ये ज्यांची बांधकामे तोडली जातात त्यांना जर तुम्ही पुर्नवसन करित असाल तर बी.जे.पी.च्या कार्यालयाचे पुर्नवसन करित असाल तर सामान्य गरिबाला तुम्ही पुर्नवसन दिले पाहिजे.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.) :-**

हा ९९ चा ठराव आहे.

**केळकर सो(मा.उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आणि सर्व नगरसेवकांनी जी भूमिका विशद केली. ती १९९८-९९ पासून हे एकंदरित प्रोसेस सुरु आहे. हे प्रोसेस आजचे नाही आहे, असे मी सभागृहाला सांगू इच्छितो. ९७-९८-९९ म्हणजे हा मुददा नगरपालिकेच्या पटलावर आला होता आणि त्यावेळी सर्व प्रोसेस यामध्ये ३६ मायनर मॉरिफिकेशनचे पूर्ण झालेले आहे आणि यामध्ये राज्यपत्रात अधिसुचना प्रसिध्द झाली. सजेशन ऑब्जेक्शन मागविण्यात आले. वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. या सर्व अधिसुचनेनंतर जेव्हा मा. राज्यमंत्री महोदय यांच्या दालनात या प्रकरणी हरकती सुचनावर आणि इतर बाबीवर विचारासाठी हा प्रश्न आल्यानंतर या शहरामध्ये महानगरपालिका नव्याने स्थापित झाल्यामुळे हा विषय पुन्हा महासभेवर अंतिम मंजुरीसाठी आणावा असे माननीय शासनाकडून आदेश प्राप्त झाल्यानुसार आजचा हा विषय सभागृहासमोर आलेला आहे. कारण सभागृहाचा असा समज असू शकतो. कदाचित हे प्रकरण आजचे नसून ९७-९८ पासून कार्यरत असे प्रकरण आहे. सातत्याने

याच्यामध्ये आपणाला माहिती असेल आम्ही अधिकारी येतो जातो. परंतु, या सभागृहातील बहुसंख्य नगरसेवक या शहरातीलच आहेत. सर्वांना माहिती आहे. तिथे जे लोक राहतात. ते अनेक वर्षापासून वास्तव्याला होते आणि त्यांचे वास्तव्य विचारात घेउन सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा. धन्यवाद.

**रोहिदास पाटील :-**

यामध्ये दोन विषय आहेत. एकतर दिल्ली दरबारची जागाही तुम्ही वगळता. एक १०.१० आहे. परत तुम्ही १० वगळता म्हणजे ६५च्या ठिकाणी ते ५५ येणार. याचाही खुलासा व्हायला पाहिजे. ते ६५ न राहता ५५ होईल. दिल्ली दरबार हॉटेल वेगळे आहे आणि ही जागा वेगळी आहे. हा पूर्ण पटटा आहे. म्हणजे ए टाईपचा पटटा आहे. हायवे आणि काशीमीरा रोडच्या बाजूने आहे. आमचे म्हणणे आहे की, कायदा जर एकाला लागतो तर सगळयाना तो लागला पाहिजे. अनेक लोकांची घरे त्यांच्या मालकी जागेत होती. ती आपण तोडली. त्यांना नावे पाहिजे असेल तर मी सांगू शकतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, जेव्हा रस्ता रुंदीकरण झाले. त्यावेळी फक्त न्यु भारत हॉटेल सोडून इतर सर्व बांधकामे नाईकसाहेबांनी तोडली. कोर्टामध्ये प्रकरण होते. त्यामुळे ते तसेच राहिले. त्यांनतर आरक्षणाच्या ठिकाणी बांधकाम करण्याचे काम त्या ठिकाणी सुरु आहे आणि त्यानंतर हा विषय येतो ही एकतर चुकीची बाब आहे. हा विषय पहिल्यांदा मंजुरीसाठी यायला पाहिजे होता आणि नंतर बांधकाम परवानगी किंवा तिथे बांधकाम करायला पाहिजे होते आणि नंतर त्याची प्रोसीजर शासनाकडे पाठवायची आहे. तो ९९ चा होता. तर हयाची आधी मंजुरी घ्यायला हवी होती. ही फार तर एकदम उशीरा मंजुरी घ्यायली आलेली आहे आणि राहिला विषय इतर बांधकामाचा की, त्याला कायदयाने दयायचे की नाही. तर जेव्हा इतर तुटली गेली तेव्हा त्या लोकांचे पुर्नवसन झाले नाही. फक्त एक बी.जे.पी. चे कार्यालय तिथे पुर्नवसन झाले. बाकी कोणाचेच झाले नाही आणि ते पण हायवेच्या जागेवर झाले आणि त्यावेळी स्थानिक नगरसेवक श्री. सूर्यकांत भोईर साहेब यांनी लेखी पत्र दिले होते आणि अतिक्रमणचा चार्ज नाईकसोबांकडे होता. तर नाईकसाहेब म्हणाले, मलासुध्दा असेच उत्तर दिले की, त्यांचे जे रस्ता रुंदीकरणामध्ये गेले होते. म्हणून आपण त्यांना ते बांधून दिलेले आहे. तेव्हा मी त्यांना म्हटलेदेखील की, हायवेची जागा ही आपल्या मालकीची आहे का?

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.) :-**

बांधून दिलेली नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आपल्या नगरपालिकेच्या ठेकेदाराने ते बांधलेले आहे आणि खांबितचे नाव घेतलेले आहे.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.) :-**

बांधून दिलेली नाही. त्या ठिकाणी जागा आहे.

**सूर्यकांत भोईर :-**

नाईकसाहेब, तुम्ही त्यांना बांधायला परवानगी देता तर मग रस्ता रुंदीकरणामध्ये जी ठिकाणे आणि जे गाळेधारक तुटलेले आहेत. त्यांचे तुम्ही पुर्नवसन करत नाही. त्यांचे पुर्नवसन तुम्ही करा. तुम्ही जर कार्यालयाचे पुर्नवसन करु शकता तर गाळेधारकाचे पुर्नवसन का करु शकत नाही?

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.)** :-

त्या रस्ता रुंदीकरणामध्ये बी.जे.पी.चे ऑफिस येत होते. तर ते ऑफिस कुठे बांधायचे? सहा महिने विचारायला आले. हायवेवाले ज्युनिअर इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर म्हणत असतील.

**सूर्यकांत भोईर :-**

आम्ही राष्ट्रवादीचे ऑफिस बांधतो. तर तुम्ही आम्हाला परवानगी दया.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आम्हीदेखली राष्ट्रवादीचे कायार्लय बांधतो. तर तुम्हाला चालेल का? जनता दलला, आघाडीला पण बांधू दे. सगळयांना ऑफिस बांधू दे. तुम्ही तोडायला यायचे नाही. नगरपालिकेला तक्रार झाली. नगरपालिका जर तोडायला गेली आणि आम्ही जर पार्टीचे ऑफिस बांधले तर तुम्ही तोडायला यायचे नाही.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.) :-**

कुठलेही ऑफिस नवीन होऊ देणार नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तोडायला अजिबात दयायचे नाही. कोणी कुठल्याही पार्टीचे ऑफिस होईल. त्या भागात तोडायला नगरपालिकेने अजिबात यायचे नाही.

**रतन पाटील :-**

शिवसेनेचे कार्यालय आपण तोडले होते. नवीन कार्यालय तिथे शिवसेनेचे कार्यालय होते. अजून आम्हाला जागा दिली गेली नाही. त्याचासुध्दा प्रश्न सोडवावा. सर्वाना देणार त्याप्रमाणे आम्हालाही देण्यात यावे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

शिवसेनेला पण जागा दया.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.) :-**

नवीन ऑफिस कुठेही होऊ दिले जाणार नाही.

**महेन्द्रसिंग चौहान :-**

महापौर मॅडम, वहाँ पर इतनी जगह है । अगर नाईकसाहब की सब पर मेहेरबानी रहेगी तो सभी पार्टीयों के ऑफिस लाईनसे बन जायेंगे । पुरा हायवे पट्टा दे दिया ।

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.) :-**

चौहान साहेब, रस्ता रुंदीकरण्यामध्ये बी.जे.पी.चे ऑफिस तोडले आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नाईक साहेब, मला वाटते, तिथे बी.जे.पी. चे ऑफिस नव्हते. तिथे झुणका भाकर केन्द्र होते. झुणका भाकर केन्द्र बी.जे.पी.च्या काही ठराविक व्यक्तींचे होते. ते आपण तोडलेले आहे आणि त्याबद्यल आपण त्यांना ऑफिस दिलेले आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

अजिबात ऑफिस नव्हते. साहेब, आपण सभागृहाची दिशाभूल करित आहात. ऑफिस नव्हते. झुणका भाकर केन्द्र होते आणि ऑफिस ते नीलकमल माझ्या वॉर्डमध्ये होते. त्या ठिकाणी ब-याचशा नागरिकांची घरे गेली. त्यांचेदेखील पुर्नवसन तुम्हाला करावे लागेल. नाहीतर त्यांच्यावर मोठा अन्याय होईल.

**सुर्यकांत भोईर :-**

आदीवासी लोकांचे तुम्ही पुर्नवसन का केले नाही? पहिले आदीवासी लोकांचे पुर्नवसन करा. नंतर बी.जे.पी. कार्यालयाला परवानगी दया. नाहीतर ते उदयाच्या उदया तुम्ही तोडा.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.) :-**

नीलकमलच्या हॉटेलच्या त्या रस्त्यावर बी.जे.पी.चे ऑफिस होते. मी माझ्या हाताने तोडलेले आहे. जे.सी.पी.ने ते ऑफिस तोडलेले आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, पण त्या रस्त्यावर अनेक नागरिकांची घरे होती. त्यांची घरे गेली. त्यांचे तुम्ही पुर्नवसन का केले नाही? का नाही पुर्नवसन तुम्ही केले?

**शिवमूर्ती नाईक :-**

पुनर्वसन कोणाचे करायचे राहिले आहे? ज्या ठिकाणी रहात होते. त्या ठिकाणी वर खोली वाढवलेली आहे आणि तिथे ते राहतात.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ज्यांची पूर्ण घरे गेली त्यांच्या फाईली पण मी तुमच्याकउे आणेन. ९४ चे पुरावे माझ्याकडे आहेत.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.) :-**

पुढचे आदिवासी जे बेघर होते. त्यांना हात लावलेले नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

आदिवासी जे बेघर झालेले आहेत. त्यांचे प्रथम पुर्नवसन करा. नंतर कुठल्या कार्यालयाची चौकशी करा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना जेव्हा २८ फेब्रुवारी रोजी झाली. तत्पूर्वी आपल्या ठिकाणी नगरपरिषदेचा जो शेवटचा कार्यकाल होता. तो सन्मा. आपले विद्यमान आणि जेष्ठ नगरसेवक आणि तत्कालीन नगराध्यक्ष श्री प्रफुल्ल पाटील यांच्याकडे होते. त्यांनी पण एवढया घाईगर्दीने किंवा संपूर्ण विचारपूर्वक शहरातील सर्व रस्त्याचे रुंदीकरण करण्याची मोहिम नाईक साहेब आणि दोघांनी म्हणजेच अध्यक्षानी हाती घेतली होती आणि जी जी बांधकामे रस्ता रुंदीकरणास बाधित

होत हाती. ती तोडल्यानंतर उर्वरित जागेत त्यांना बांधकाम करण्याची परवानगी पण दिलेली होती आणि त्या धर्तीवर ज्या ज्या ठिकाणी आपण रस्ता रुंदीकरण केलेले आहे आणि जी जागा शिल्लक राहिलेले आहे. त्यांना त्या त्या ठिकाणी दुरुस्तीची परवानगी देण्यात आलेली आहे. आता जो हायवे पट्ट्याचा उल्लेख झालेला आहे की, हायवे पटटयावर ते झुणका भाकर असताना भाजपचे जे कार्यालय त्या ठिकाणी अनधिकृतपणे उभारले गेले तर सन्मा. सदस्य सूर्यकांत भोईर यांनी तक्रार केलेली आहे. तर मग असे वाटते की, जसे सन्मा. सदस्य रोहिदास पाटील बोलले की, न्याय सर्वांना समान पाहिजे. तर मला वाटते की, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी पण आपले मन उदार केले पाहिजे की, त्या ठिकाणी एक राष्ट्रवादीचे ऑफिस दया. शिवसेनेचे, जनता दलाचे दया. सर्व पक्षाना दया. अपक्ष, आघाडी सर्व पक्षाना दया. आम्ही भारतीय जनता पार्टीबद्यल पहिल्यापासून बालतो आहे की, बोलना कुछ है ा और करना कुछ है ा कतनी और करनी मे फरक है ा कही पे निगाहे कही पे निशाना, जिने दो जालीम बनाओ न दिवाना ा म्हणजे कतनी वेगळी करनी वेगळी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपण माठया उदारतेने सांगा. भाजपचे ऑफिस बांधले. सभागृहात जे सदस्य बसलेले आहेत. सगळया पक्षांना जर दिले तर कोणाची काही हरकत राहणार नाही आणि आपण सगळयाचे पुर्नवसन करित आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

महानगरपालिकेने १९९४ चा पुरावा नाही तरी लाईट पण दिली व लाईटचे एन.ओ.सी. पण दिली. हे काय ९४ चे ऑफिस आहे का? मग एन. ओ.सी. ९० ची कशी मिळाली. पालिकेने कशी दिली?

**सुर्यकांत भोईर :-**

ते नीलकमल हॉटेलमध्ये यांचे कार्यालय होते. ते भाडयाचे कार्यालय होते.

**रोहिदास पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो की, हा जो विषय आहे तर जे कार्यालय असेल त्याचे महापालिकेने सहानुभुती दाखविणे हा विषय वेगळा आहे आणि जसे सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी सांगितले की, तो स्वतःच बांधत असतील तर सर्व पक्षाची त्यांनी एकटयाने बांधून दयावी. आमची त्याला काही तक्रार नाही. समाजवादी पक्षाला, शिवसेनेला, राष्ट्रवादीला, कॉंग्रेसला दयायची तर दया. कोणाला दयायची हा एक भाग झाला आणि याच्या आधीचा रेकॉर्ड कोणतरी आपल्याला बोलते वेळी मागचे-पुढचे आठवत नाही. आपली-आपली कार्यालये आप आपल्या परीने ज्यांची तुटली त्यांची महापालिकेने ज्यांची सगळयांनी दिलेली आहे. शिवसेनेला दोन दिले आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर मॅडम, मालकी जागा नव्हती. सरकारी जागेत होती. मालकी जागेत असती तर बांधायला हरकत नव्हती. आपली जागा आपण हस्तांतरीत केली. त्यांना पुर्नवसन करण्याची काय गरज होती? ज्यांची घरे उध्वस्त केली त्यांना पुर्नवसन तुम्ही केले नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

महापौर मॅडम, यांचे कायार्लय भाजपचे कार्यालय होते. हे हयांच्या स्वतःच्या मालकीचे कार्यालय नव्हते. हे भाडयावर कार्यालय घेतलेले होते.

**सूर्यकांत भोईर :-**

आदिवासी लोकांची तुम्ही घरे तोडली. त्यांना पुर्नवसन केलेले नाही आणि त्याच्या आधारावर एका कार्यालयासाठी तुम्ही त्याचे पुर्नवसन करत आहात?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

भर पावसात साहेबांनी त्यांची घरे तोडली त्यांचे पुर्नवसन केले नाही आणि तुमच्या ऑफिसचे बरोबर केले. हा कुठला न्याय आहे?

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम शेवटचा विषय राहिलेला आहे आणि नवीन कार्यालय देण्याच्या विषयाला सुरुवात झालेली आहे. आमचे नाव कोणींच घेत नाही. महापौर मॅडम, गमतीची बाब म्हणजे विषय काय आहे आणि आपण काय चर्चा करतो? विषयाच्या गोषवा-यामध्ये स्पष्टपणे लिहिलेले आहे की, आरक्षण क्र. ३५९ हे कधी अस्तित्वात आले की १५/७/९७ ला तेव्हासुध्दा एम.आर.टी.पी. ॲक्ट महाराष्ट्र नगररचना अधिनियम तोच होता. त्याच्यानंतर आमचे पूर्वीचे नगराध्यक्ष यांच्या कारकिर्दीत तो

१८/१/९९ ला झाला. तेव्हासुध्दा आरक्षण ०.१० ने कमी केले. दिल्ली दरबारचा प्रश्न मिटविण्यासाठी सलोख्याने मिटला त्या ठरावाला कोणाचाही विरोध नव्हता म्हणून ते क्षेत्र कमी झाले. ती कारवाई महाराष्ट्र नगररचना अधिनियम एम.आर.टी.पी. ॲक्ट ३७/१ खाली झाली. त्यानंतर नोटीफीकेशन झाले. त्यावर कोणाचेच ऑब्जेक्शन आले नाही आणि पुन्हा अंतिम मंजुरीला ३१/१०/२००१ माझ्या कारकिर्दीत आले तेव्हा सुद्धा कोणाचा विरोध झाला नाही. म्हणजे या आरक्षणाला १९९७ पासून ते २००१ पर्यंत कोणी विरोध केला नाही. म्हणून सरकारने हे आरक्षण ०.१० हेक्टरने कमी केले. आता नगररचना अधिनियम बदलले नाही. १९९७ला होता तोच होता अधिकारी इथे उपस्थित आहेत. ३७/१ ची कारवाई तीच आहे. ३७/२ ची कारवाई तीच आहे. आज वर्ष चालले आहे. ऑक्टोंबर २००३ मध्यंतरीच्या काळात महानगरपालिका स्थापन झाली म्हणून अचानक नगररचना अधिकाऱ्यांना स्वप्न पडले की, तिथे वेगळे काहीतरी घडले असेल. आता नगरपालिकेची महानगरपालिका झाली. म्हणजे पुर्वीचे कायदे बदलले नाही. मुळात हा नगरपालिकेचा कायदा आहे आणि नगररचनेचा कायदा आहे. तो सर्वांना सारखा आहे. त्या कायद्यामध्ये कोणती दुरुस्ती पण झालेली नाही आणि हे पत्र तत्कालीन आयुक्तांना १ जून २००२ रोजी प्राप्त झाले आहे. त्यांना स्वप्न पडले असेल, ऑक्ट्रॉयच्या ऐवजी कुठे एस्सेलवर्ड झाले आहे का? १ जून २००२ रोजी त्यांनी कळवायला पाहिजे होते की, याच्यामध्ये आमचे काही म्हणणे नाही. आज या बॉडीच्या पुढे ठेवून बॉडी याच्यावरती काय निर्णय घेणार. बॉडीला जो निर्णय घ्यायचा होता तो ३७/१ खाली घेतला. फेरबदलाला मंजुरी दिली. सगळे काही झाले. आता बॉडी काय म्हणणार. ३७/१ खालचा नियम तयार करा आणि याचे भाग पाडा असे म्हणू शकते. बॉडी याच्यावर काही कायदेशीर निर्णय घेऊ शकत नाही. हे पत्र बॉडीपुढे आणण्याची काही गरज नव्हती आणि जर तुम्हांला आणायचे होते, आणखीन काही वेगळे करायचे असेल तर या पत्रानुसार वेगळे करता येणार नाही. लिओ सर आपल्याला माहिती आहे. कारण आपण नियोजन विभाग सांभाळत होतात. नवीन काही करायचे असेल तर नवीन आरक्षण टाकायला नवीन ३७/१ खालची कारवाई केळकर साहेब प्रस्तुत करावी लागेल. मग हे सगळे भांडण करायचे कशाला. कुठे गाळे आहेत? त्याच्यासाठी आरक्षण बदलणार आहात तुम्ही? तर ही नक्कीच कारवाई होत नाही. ३७/२ खालची कारवाई बघा अतिशय स्पष्ट आहे. आम्ही ठराव केला, पाठवला. अध्यादेश काढला. त्याला मंजुरी मिळाली. कोणाचेही ऑब्जेक्शन नाही. म्हणजे आरक्षण बदल नक्की झाला. आरक्षण बदल झाल्यानंतर आम्ही केलेले काम हे बरोबर आहे हे पाहण्यासाठी तरतुद ३७/२ खाली आहे आणि ते कोणी करायचे आहे, राज्य शासनाने आणि फायनल ऑथोरिटी कोण आहे, डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग. जेव्हा ३७/२ खाली डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंगला अंतिम ॲथोरिटी आहे तर आमचे मत विचारायचे काही प्रश्न येत नाही. आम्ही नाही म्हटले तरी परिस्थिती बदलू शकत नाही आणि आम्ही हो म्हटले तरी परिस्थिती बदलू शकत नाही. तुर्त या पत्राची आम्हांला कुठेही दखल घेण्याचे कारण नाही. उगाच आपण आपला वेळ वाया घालवतो. पाहिजे तर कारणे देण्यासाठी वेगळा प्रस्ताव आणा व आमचा पण विचार करा थोडा, या विषयाबाबत. आपल्या बॉडीची काही जबाबदारी नाही. म्हणून हा विषय या ठिकाणी घेण्याची काही गरज नाही. पुर्वीची केलेली कारवाई ती तशीच आहे. त्याच्यावर सरकारला काय करायचे ते करु द्या. सरकार ३७/२ खाली कारवाई पुर्णपणे पात्र आहे. सक्षम आहे. त्यांनी तो निर्णय घ्यावा असा ठराव मी मांडतो.

**आसिफ शेख :-**

ह्याला माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, कोणतेही आरक्षण बदलते वेळी अनेक असे विषय आहेत. आमचे एका या पंचायतमुळे त्या तेरा बिल्डींग मा. केळकरसाहेब ऐकत आहे कोण? सचिव साहेब ऐकत आहे का? आमची सुचना आहे की, आरक्षण बदलण्याबाबत जेव्हा प्रकरणे आणाल एक नाही मॅडम अनेक आहेत की ज्याच्यामुळे अनेक लोकांना उपयोगी ठरतील किंवा महापालिकेला उपयोगाचे ठरेल एक आरक्षण आणून तो विषय संपत नाही.

**आसिफ शेख :-**

आपले जे प्रकरण पेन्डींग आहे ते पूर्ण करा.

**महापौर :-**

जो प्रश्न पेडींग आहे त्यास सुरुवात करावी.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, आपले ते प्रकरण क्र. ३९ झोपडपटटी विभागात स्वतंत्र नळजोडणी मंजुर करणेबाबतचा विषय पेंडीग आहे. तो पण आज पूर्ण होउन जाऊ दया. त्यावर चर्चा सुरु करा.

**रोहिदास पाटील :-**

एकच विषय बाकी आहे ना. तसेच, हा विषय पेंडीग ठेवते वेळीच मी सुचना करतोय. आताचा विषयसुध्दा पेंडीग ठेवला आहे. त्यात सुचना घ्या कि, याच्यापुढे जेव्हा अशी आरक्षणे बदलण्याचा विषय येईल तेव्हा अनेक ठिकाणची आरक्षणे आपल्याला बदलायची आहेत. अशा अनेक सुचना आहेत, प्रकरणे पेंडीग आहेत. आम्हीही देउ शकतो. तुम्हाला कि जसे स्टेशनसमोर ज्या तेरा बिल्डींग आहेत. त्या तेरा बिल्डींगच्या चार माळयाचा प्रश्न सुटू शकत नाही.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर मॅडम, विषय सुरु करण्यापूर्वी दि. १०/९/२००३ च्या सभेमध्ये मी अनुपस्थित होतो आणि त्याच्यामध्ये जे प्रोसेडिंग होते. त्या प्रोसेडिंगमध्ये एक ठराव होता डॉ. बावस्करांना पाच महिन्याची मुदतवाढ देणेबाबतचा ठराव सन्मा. सभागृह नेते ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडला होता आणि त्याला मी अनुमोदन दिले होते. परंतु, आता माझ्या निदर्शनास असे येत आहे की, ठरावाचा आधीचा जो मसुदा आहे तो पाच महिन्याचा आहे. मात्र ठरावाच्या शेवट ते लिहितात की, पुढील वैद्यकीय अधिका-यांची नेमणूक होईपर्यंत त्यांना मुदतवाढ देण्यात यावी म्हणजेच पुढील पाच वर्षे तुम्ही वैद्यकीय अधिका-यांची नेमणूक केली नाही तर डॉ. बावस्करांनीच या क्षेत्राची सेवा करायची का?

**महेन्द्रसिंग चौहान :-**

ऐसा नही है, जब तक नया अधिकारी नही आयेगा तब तक लिये वा है । पाच महिने हो, छह महिने हो, कि नौ महिने हो । जो आपने बाला वैसा नही था ।

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य श्री. महेन्द्रसिंग चौहान साहब, आप बैठिए । अब तक मै बोल रहा हूँ मैने इस ठराव पे सही भी किया था । इसलिए मुझे मालुम है की उसमे क्या लिखा है ।

**महेन्द्रसिंग चौहान :-**

लेकिन चर्चा मे हम सब लोग सिमित थे । इसके लिए मैने बोला ।

**चंद्रकांत वैती :-**

ठीक है लेकिन जिसने ठराव रखा था, जिसने ठराव को अनुमोदन दिया था । वो दोनो उपस्थित रहते थे । और आप चर्चा में उसको चेंज करते थे वो अच्छा था ।

**महेन्द्रसिंग चौहान :-**

लेकिन चर्चा के बाद ही ठराव पास हुआ है ।

**चंद्रकांत वैती :-**

अगली बार पिठासीन अधिकारी आप रहेंगे तो भी जबाब आप देना । परंतु, मा. महापौर मॅडम, या विषयाला पुन्हा पुन्हा त्याच त्या गोष्टी होतील पुन्हा आपनले सदस्य कोणीतरी ऑब्जेक्शन घेतील. त्याला कारण कसे आहे की, इतर आधिकारी प्रतिनियुक्तीवर आल्यानंतर ते शासनाच्या कुठल्यातरी डिपार्टमेन्टमधून आलेले आहेत. डॉ. बावस्कर साहेब हे निश्चितच अतिशय तज्ञ अशी व्यक्ती आहे. पण शासनाच्या कुठल्या डिपार्टमध्ये ते कार्यरत होते आणि ते तिथुन येथे आलेले आहेत. उदया काय तशीच जबाबदारी जर आली तर त्याची जबाबदारी घ्यायची कोणी? त्यांनी आपल्याला अंडरटेकिंग दिली आहे का? काही प्रॉब्लेम झाला तर मिरा भाईंदरच्या नगरसेवकांना किंवा माजी नगरसेवकांना काही त्रास होईल तेव्हा मी जबाबदारी घ्यायला उपस्थित रहाणार, अशी काही अंडरटेकिंग दिले आहे का? काही दिलेले नसणार. आज आपण त्यावेळेला पण सहा करोडच्या कचऱ्याच्या निविदा काढल्या गेल्या. तेव्हा मा. स्थायी समितीमध्ये मी ऑब्जेक्शन घेतले होते. मा. आयुक्तांशीसुध्दा बोललो होतो. तेव्हा त्या निविदा त्यांच्या नावे काढल्या म्हणजेच आपण त्यांना किती अधिकार देऊ शकतो. त्याचा प्रश्न आहे म्हणून हा जो मागच्या प्रोसेडिंगमध्ये चेंज केलेला आहे. तो आपण लक्षात घ्यावा आणि जे वैद्यकिय अधिका-यांची नेमणूक करावयाची आहे. तरी तो पुढच्या सभेपर्यंत विषय आणा आणि तेव्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांची नविन नेमणूक करा किंवा त्यांच्याबददल काही टर्मस कंडिशन्सबाबत सभागृहासमोर तो विषय आणा, असा हा पाठच्या आलेला ठराव चुकीचा आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर महोदय, इस संबंध मे. पुरी चर्चा हुई थी । उसी के साथ यह कंडिशन भी थी कि, इस तरह की जो कंडिशन है सर्विस कंडिशन्स वह सभी की सभी उनके द्वारा दिये गये पत्र अपने हाउस में पुरी चर्चा के साथ शहर का किस तरह स्वास्थ विवाद का उन्हे डेव्हलपमेन्ट करना, क्या

जिम्मेदारी देना इस सारे बारेमें विस्तृत चर्चा हुअी । कही फेरबदल कुछ भी नही हुआ है । आपने जो एक लाईन बोला की, फेरबदल किया है, ऐसा कुछ नही था । इसलिए मुझे बोलना पडा वैसे नही की आपने बाकायदा संमती दियी है । इस बारेमें और आज इस बारेमे ऐसी बात कर रहे है । इसके लिए मुझे बोलना पडा ।

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहान साहब, इस बारेमें कोई जल्दबाजी नही है । कल मेयर मॅडम की केबीन में संबंधित अधिकारी को बुलाकर आप सब बात कर सकते है ।

**महापौर :-**

आता मी काय सांगते की, डॉ बावस्कराचा आज विषय नाही आहे. विषय कुठला चालला आहे. त्या विषचावर चर्चा करावी.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, हया मिनिटसमध्ये बदल होत आहे. या ठिकाणी ही अत्यंत गंभीर बाब आहे. जे प्रोसेडिंग आहे त्याच्यामध्ये पाच महिन्याचा कालावधी हा क्लिअर का लिहिलेले आहे. जी चर्चा झाली त्याचा उल्लेखसुध्दा त्या चर्चेमध्ये आहे आणि असे असताना तुम्ही आणखी त्यांना दोन वर्षे मुदतवाढ दया. आम्ही नाही म्हणत नाही. परंतु, एकीकडे बोलायचे दुसरे आणि दुसरा बदल करायचे ही पध्दत बरोबर नाही. आणि हा गुन्हासुध्दा आहे. याच्यावरती फौजदारी केस दाखल होउ शकते. लाईटली घेउ नका. त्यांना पाच महिने तुम्ही मुदतवाढ दिली. पाच महिन्यानंतर जर त्यांना एक वर्षासाठी ठेवायचे असेल तर तसे तुम्ही ठरवा. प्रोसेडिंगला नोंद झालेली आहे तसे प्रोसेडिंगला आलेले आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, या ठिकाणी आपली जी सभा चाललेली आहे. ती सभा तहकुबीची सभा चाललेली आहे आणि त्या प्रोसेडिंगमध्ये दुरुस्ती करण्याची जी मिटींग होती ती मागच्या १८ तारखेला झाली. त्यावेळेला आपण अनुपस्थित होता आणि सुचक म्हणून श्री. ध्रुवकिशोर पाटील होते आणि सर्वानुमते ते प्रोसेडिंग मंजुर झालेले आहे आणि तो विषय संपलेला आहे आणि आजची जी मिटींग ती तहकुबीची मिटींग आहे.

**चंद्रकांत वैती :-**

हा विषय फार वाढवायचा असेल तर सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख आपण ऐकून घ्या की, याची टेप ऐकण्याची माझी तयारी आहे. तुम्ही बसता का? की, किती चर्चा झाली आहे ती ऐकवता का? तुमची किती चर्चा झाली आहे ती मला ऐकायची आहे. तुम्हाला मी सांगतो की, मा. महापौर यांच्याकडे बसून आपण मार्ग काढू. कसली चर्चा झालेली आहे ती मला माहिती आहे.

**मा. महापौरः-**

माझ्या दालनात याबाबत चर्चा करु. आता विषय संपवावा.

**प्रकरण क्र. ४३ :-**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार मंजुर विकास योजनेत फेरबदल करणे.

मध्यवर्ती जकात केंद्राच्या (आ.क्र. ३५९) आरक्षणाने बाधित होणारे अस्तित्वात असलेल्या ''हॉटेल दिल्ली दरबारची'' व इतर जागा रहिवास विभागात दर्शविणे - महानगरपालिकेचे अभिप्रायासाठी.

**ठराव क्र. २७ ब :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३२ अन्वये दि. १४/०५/१९९७ रोजी मंजुर होऊन दि. १५/०७/१९९७ पासून अंमलात आली आहे.

मंजुर विकास योजनेत दर्शविलेल्या आरक्षणाच्या जागांमध्ये फेरबदल करण्यासाठी तत्कालीन नगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये खालील फेर बदलांची कारवाई करण्यासाठी सर्व साधारण सभा ठराव क्र. १३१, १३२/१, १३२/२, १३२/३, १३३ दि. २५/०६/१९९८ व १९६/१, १९६/२, १९६/३, १९६/४, १९६/५ दि. १८/०१/१९९९ अन्वये ठराव मंजुर केले आहेत. तद्नंतर उक्त फेर बदलाचा इरादा वृत्तपत्रात व राजपत्रात प्रसिद्ध करण्यांत आला असून संबंधितांकडून सुचना व हरकती मागविण्यांत आल्या होत्या. या फेर बदलाच्या प्रस्तावासाठी सुचना व हरकती प्राप्त निरंक असल्याने सदर फेर बदलाचा ठराव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(२) अन्वये अंतिम मंजुरीसाठी शासनाकडे सादर करण्यांस तत्कालीन नगरपालिकेने सर्व साधारण सभा दि. ३०/१०/२००१ ठराव क्र. ३८७(अ) अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सदर मंजुरी (१) विकास योजनेतील डोंगरी गावाकडून तारोडीगावाकडे व धारावी मंदिराकडून चौक गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे १८ मी. इतके दर्शविणे.

तसेच सर्व्हे नं. १०, १२, १३, १४, १५ पै., ३६ पै. मौजे तारोडी या जागेतील मत्स्य शेतीचे केवळ डोंगराळ भागातील आरक्षण क्र. ६ वगळण्यांत यावे व वगळलेला भाग डोंगराळ भागात समाविष्ट करणे.

(२) विकास योजनेतील घोडबंदर-ठाणे रस्ता (नगर परिषद हद्दीपर्यंत) ३०.०० मी. रुंदीची आखणी रद्द करुन त्याऐवजी विद्यमान रस्त्याच्या मध्यापासून दुतर्फा ३०.०० मी. आखणी (म्हणजेच ६०.०० मी. रुंद) दर्शविणे.

(३) विकास योजनेतील मध्यवर्ती जकात केंद्राचे आरक्षण क्र. ३५९ हे पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या हद्दीपासून (हॉटेल दिल्ली दरबार) व काशिमिरा रस्त्याच्या हद्दीपासून १२.०० मी. इतके कमी करण्यांत यावे. तसेच मुख्य रस्त्यापासून आत प्रवेश करण्यास व बाहेर पडण्यास १५.०० मी. रुंदीचा मार्ग वगळून इतर पट्टीवजा भाग आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यांत यावा व यामुळे आरक्षणाचे क्षेत्र ०.६५ हेक्टर इतके मर्यादित करण्यांत यावे.

(४) विकास योजनेतील शांतीनगर घरकुल प्रकल्पाचा रेखांकनातील शांतीनगर ते नयानगर जोडणारा ३०.०० मी. (१०० फुटी) रुंद रस्त्याची आखणी रद्द करुन/त्याऐवजी अस्तित्वातील रस्त्याची आखणी दर्शविणे व रद्द केलेल्या आखणीतील जागा रहिवास विभागात समाविष्ट करणे.

(५) विकास योजनेतील सर्व्हे नं. २६ पै, २७ पै, २८ पै, मौजे खारी या जागेत दर्शविण्यांत आलेले बगीचा (आरक्षण क्र. १०२) ५० टक्के इतके वगळून लगतच्या भू-वापरात समाविष्ट करणे व ५० टक्के जागा आरक्षणाखाली कायम ठेऊन अर्जदाराकडून बगीचा विनामुल्य विकसित करुन घेणेञ या आरक्षणामधील फेरबदलांसाठी दिलेली होती.

तत्कालीन नगरपरिषदेने पत्र क्र. नपा/नर/४०५/९८६३/२००१-०२, दि. ११/०२/२००२ व नपा/नर/४३/२०९५/२००१-०२, दि. १४/०६/२००१ अन्वये प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी शासनास सादर केला होता. त्यानंतर वरील प्रस्तावाबाबत सहाय्यक संचालक, नगर रचना ठाणे, तसेच उप सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी मिरा भाईंदर नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर झाल्याने वरील फेरबदल प्रस्तावाबाबत पुन्हा फेर बदल किंवा सुधारणा आवश्यक आहेत किंवा कसे याबाबत विचारणा केली आहे.

वरीलप्रमाणे तत्कालीन नगरपरिषदेने सर्वसाधारण ठराव क्र. १३१, १३२, १३२(१), १३२(२), १३२(३) दि. २५/०६/१९९८ व १९६/१, १९६/२, १९६/३, १९६/४, १९६/५ दि. १८/०१/१९९९ अन्वये फेर बदलाचे प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी सादर केले. सदर फेर दिलाचे प्रस्ताव वृत्तपत्रात व राजपत्र क्र. नपा/नर/२२८६/८४२४/९८-९९ मध्ये प्रसिद्ध केले होते. सदर प्रस्तावास कोणही विरोध केला नाही. त्यामुळे विविध हरकती व सुचना प्राप्त निरंक असल्याने नगरपरिषदेने सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३८७(अ) अन्वये सदर प्रस्ताव **महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(२) अन्वये** अंतिम मंजुरीसाठी शासनाकडे सादर करण्यांस मंजुरी दिली आहे.

सबब नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झाल्यामुळे वरील सर्व फेरबदलांच्या प्रस्तावात पुन्हा बदल करण्याची आवश्यकता नाही. तत्कालीन नगरपरिषदेने सादर केलेले वरील फेरबदलाचे प्रस्ताव कायम असून त्यानुसार शासनाने पुढील कार्यवाही करण्यांस हे सभागृह मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील.        अनुमोदन :- श्री. शशिकांत ज. भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३९ चे वाचन केले)

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम आपकी अनुमतीसे बोलता हूँ की, स्थायी समिती ठराव क्र. ९३ दि. १८/१/२००३ अन्वये नविन कनेक्शन मंजूर करण्यासाठी धोरण निश्चित करून सदरच्या ठरावात. कलम (६) नुसार झोपडपट्टी विभागात स्वतंत्र नळ कनेक्शन देण्यांस मान्यता देण्यात आलेली आहे. असा हा

गोषवाऱ्यात लिहिलेले आहे ते चुकीचे आहे. स्वतंत्र नळ कनेक्शन देणेस मान्यता देण्यांत आलेली नव्हती. परंतू ग्रुप कनेक्शनला अल्प प्रतिसाद मिळाला म्हणून मा. स्थायी समितीने उपरोक्त ठरावाचा फेरविचार करून दि. २८/५/२००३ ठराव क्र. ५२ अन्वये राखीव प्रभागात ग्रुप कनेक्शन नळजोडणी बरोबर स्वतंत्र नळजोडणी जोडण्यांस ठराव पारीत केला आहे. यांनी मंजूर केलेला आहे. याला अल्प प्रतिसाद मिळाला म्हणून यांचा प्रस्ताव आणलेला आहे. आणि वरती लिहिलेले आहे की, ठराव झालेला आहे. म्हणजेच हा चुकीचा प्रस्ताव दिलेला आहे. आता मी दोन्ही प्रस्ताव आणलेले आहेत. आपल्याला मी वाचून दाखवितो. ठराव क्र. ९३ मिरा भाईंदर महापालिका हद्दीत अपुऱ्या पाणी पुरवठयामुळे दि. १६/१०/१९९३ पासून नळजोडणी देण्याचे बंद करण्यात आलेले होते. अतिनिक्त ५० दशलक्ष लिटर्स पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत झाल्याचे शहराचा पाणी पुरवठयात वाढ झाल्याने प्रशासकीय ठराव क्र. १२४ दि. २८/६/२००२ अन्वये त्या नविन नळजोडणी देण्याचा निर्णय जो घेण्यांत आलेला आहे. त्याची अटीशर्ती आपल्या याच्यात १, २, ३, ४, ५ नंतर सहा मध्ये बघा. महापालिका हद्दीतील झोपडपट्टी विभागास मागणीनुसार कनेक्शनचा आकार ठरवून फक्त ग्रुप कनेक्शन मंजूर करण्यांत यावे. त्यांना स्वतंत्र नळ कनेक्शन मंजूर करण्यांत येऊ नये. कारण त्या भागात पुरेशा जलवाहिनी नसल्याने त्याअपुऱ्या पाण्याच्या पुरवठयामुळे त्यांना स्वतंत्र नळ कनेक्शन देता येणार नाही. तसेच सदर ग्रुप कनेक्शन मंजूर करताना दि. १.१.९५ पूर्वीच्या सर्व ग्रुप धारकांना मिळकतीचा अस्तीत्वाचा पुरावा सादर केल्यास ग्रुप कनेक्शन मंजूर करण्यांत यावे. असे त्या स्टॅंडिंगमध्ये पास झालेले आहे. नंतर ठराव क्र. ५२ आणलेला आहे ठराव क्र. ५२ मध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत नविन नळ जोडणी देणे बाबतचे धोरण मा. स्थायी समिती ठराव क्र. ९३ दि. १८/१/२००३ अन्वये निश्चित केलेले आहे. उपरोक्त ठरावाच्या अंतर्गत कलम (६) नुसार स्वतंत्र नळ जोडणी ऐवजी ग्रुप नळजोडणी देण्याचे उचित केले होते. याच्यात सुद्धा मंजूर केले आहे, मा. महापौर मॅडम की, स्वतंत्र नळ जोडणी देणार नाही आणि ग्रुप कनेक्शन देणार असे मंजूर केले होते. ग्रुप नळ कनेक्शनची मागणीची संख्या देखील जास्त आहे. ग्रुप नळ कनेक्शन मागणी संख्या होती त्यावेळेला आमचे स्थायी समिती सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेबांनी सांगितले होते की माझे २०० फाईल्स पेंडींग होती तर दशोरे साहेबांनी सांगितले की मला फाईलच मिळाल्या नाहीत २०० फाईलचा बंडल जर त्यांना मिळाला नाही तर ती त्यांची प्रशासनाची चुक आहे. त्यांची काही चुक नव्हती मागणी होती परंतु ते दिलेले नाही. नंतर ग्रुप नळ जोडणीची मागणीची संख्या जास्त आहे. राखीव प्रभागातील मुळ आदीवासी रहिवाशी झोपडपट्टीत स्वतंत्र नळ जोडणी देण्याचे मा. स्थायी समिती मान्यता देत आहे. त्यांचात पण मा. महापौर मॅडम राखीव प्रभागात नुसते राखीव प्रभागात, आदीवासी प्रभागात स्वतंत्र नळजोडणीस मान्यता देण्यात आली होती. त्याच्यातही आमची पार्टी बी.जे.पी चा विरोध होता की, अजुन पाण्याचा पुरवठा पुर्ण होत नाही आहे. आपण १९९५ पर्यंत कनेक्शन दिलेले आहे. १९९५ नंतरच्या ज्या काही बिल्डींग आहेत. त्यांना अजुन कनेक्शन चालू आहे. अजून १९९५ पुर्वीच्या विना परवानगीने ज्याचे कनेक्शन घेतले होते त्याचे ही अजून ही कारवाई पूर्ण झालेले नाही आहे. त्यांची दंड आकारणी अजुनही चालू आहे. तर थोडया दिवसामध्ये आपल्याला पाणी पुरवठा कमी होणार आहे. अजुनही दोन तीन भागामध्ये भाईंदर ईस्ट मध्ये तीस तासात पाणी जाते उत्तन मध्ये पाणी जास्त जात नाही. तरी सर्व गोष्टींचा विचार करून ग्रुप कनेक्शन जे पास झालेले आहे. हेच पाहिजे स्वतंत्र नळ जोडणी देण्यांस आम्ही भारतीय जनता पार्टी ह्यांचा विरोध करत आहे. ह्याच पहिला आम्ही ठराव पण मांडलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतोय प्रकरण क्र. ३९ झोपडपट्टी विभागामध्ये स्वतंत्र नळ कनेक्शन जोडणी मंजूर होणेबाबत सर्वप्रथम तर या सभागृहामध्ये जे आता ठराव त्यांनी वाचुन दाखवला. त्यामध्ये असे नमुद केले होते की ज्या विभागामध्ये ठराविक विशिष्ट आकाराची जलवाहिनी किंवा जलवाहिन्या टाकलेल्या नाहीत अशा प्रभागामध्ये मी आपल्याला एक सांगु इच्छितो की सुरूवातीला आमची मागणी होती की स्वतंत्र नळ कनेक्शन द्या म्हणुन आणि आजही आहे. आणि ती घेणार त्याला कारणे आहेत की हे जे तुम्ही झोपडपट्टीच वरती विश्लेषण लावलेले आहे. हे कितपत सत्य आहे. कारण १/१/१९९५ च्या अनधिकृत इमारती जर नक्की होत असतील कायम होत असतील बांधकाम कायम होत असतील अतिक्रमण कायम होत असतील तर एकीकडे एक न्याय आणि दुसरीकडे दुसरा न्याय लागुन चालणार नाही. मला पाणी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून या ठराव चर्चेममध्ये असे एक नमुद करून पाहिजे किंवा विषद करून पाहिजे कि आतापर्यंत एखाद्या एक्स, वाय, झेड झोपडपट्टीला कनेक्शन द्यायचे असेल तर सभागृहामध्ये नाही रेचा सुर उठतो परंतू याच सभागृहामध्ये अधिकृत टॉवर्स आणि बिल्डींगच्या ज्या बांधलेल्या आहेत ह्याच्यावर जे नळकनेक्शन देताना जे धोरण

थोडे नरम होते त्याला कारण आहे. ह्या सदस्य संख्येमध्ये बहुसंख्य लोक बिल्डर्स आहेत आणि अनेक असे आहेत की, त्यांचे एम्. आर. टी. पी. मध्ये नाव आहे. माझ्या कडे लिस्ट आहे. एम्. आर. टी. पी. ची हे त्यावरच विषद करू इच्छितो की १/१/१९९५ नंतरच्या ज्या झोपडया असतील त्या महापालिकेने पाडाव्यात नाही पाडाव्यात तरी तो त्यांचा प्रश्न आहे. आम्ही अतिक्रमण किंवा अनधिकृतपणे पाडू नका हे कधीही बोलणार नाही पण हा ठराव आणताना आपण या विभागामधील चाळी, बांधकामे, आर. सी. सी. चे बंगले ज्या सरकारी जागेवर ही सगळी अतिक्रमणे झालेली आहेत. याचा उल्लेख आपण का केला नाही? कारण या झोपडपट्टयांना पाण्याचेही प्रभाग कमी आहे म्हणून कनेक्शन नाकारणार आणि एकीकडे हजारो नळ कनेक्शन चाळींना देणार. ज्या सरकारी जागेवर बांधल्या आहेत. त्या अतिक्रमित आहेत. त्यांचे बांधकामे आजदेखील चालू आहेत. १/१/९५ गेले तेल लावत, मी आजची गोष्ट करतो आहे.

**लिओ कोलासो :-**

सरकारने ठरवले आहे की, १९९५ आणि आपण असे म्हणता की गेले तेल लावत सरकारचा कायदा मोठा आहे, की आपले शब्द मोठे आहेत असे चालणार नाही. आपण कायद्याला तेल लावायची गोष्ट करणे हे सभागृहात योग्य वाटत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी काय बोलतो ते ऐका या कायद्याची पायमल्ली शासनाकडून चाललेली आहे. याची पायमल्ली आपल्याकडून चालू आहे. हे जे मी बोलतो त्याचा अर्थ व्यवस्थीत लावून घ्या. तुम्ही जसा अर्थ लावाल तसा लागेल. हे जे १/१/९५ चे चालले आहे. याचे कोणी तुम्हांला धुप घालत नाही. कनेक्शन सरसकट चालू आहेत. पाण्याची जर आपूर्ती कमी असेल तर हे कन्ट्रोल करणे सगळीकडे तुम्हाला गरजेचे आहे. जर अतिक्रमण एखाद्या बंगल्याचे अतिक्रमण असेल तर त्याला एक इंचीचे कनेक्शन मागितले तरी तुम्ही देणार आणि जर चाळीचे असेल तर प्रत्येक रुम मागे अर्धा इंचाचे देणार आहेत. हजाराच्या संख्येने कनेक्शन दिली गेलेली आहेत. पाण्याचे प्रमाण कमी होत असेल तर कुठले नियम आणि धोरण लागून मापदंड लागून महानगरपालिकेने ही कनेक्शन दिली गेली आहेत. महापौर मॅडम मी जे बोलत आहे. त्यावर कृपया लक्ष द्यावे. कारण विषय महत्वाचा आहे. सकाळी जेव्हा आपली गटनेत्यांची सभा झाली त्यावेळी असे ठरले की, हा ठराव व्यवस्थित सुधारून सभागृहापुढे आणावयाचा होता. त्याचे धोरण ठरवायचे आहे. बांधकामाची तुम्ही स्टॅटेस्टिक ठरवा की ज्या चाळी आहेत. कारण आता काय झालेले आहे झोपडपट्टीच्या नावाने ठणाणा होतो सगळीकडे आणि चाळी आणि बंगले ज्यांनी बांधले आहेत ते सगळे अतिक्रमण त्यांनी आपापले लावून घेतले. बहुतेक ठिकाणी कनेक्शन पास होऊन लागलेली आहेत. पाण्याचे प्रमाण जर तुम्ही म्हणत असाल तर अनधिकृत इमारतीचा सुद्धा क्रायटेरिया काढा. परप्रांतीयाचे बोलत असात तर प्ररप्रांतीयांच्या नावाने शिमगा करणाऱ्या पुढाऱ्यांना धीरूभाई अंबानी चालतो. येथे रहेजा चालतो त्याच्या नंतर हिरानंदानी चालतो आणि अनेक असे सगळे चालतात. पण छोटा जो गरिब आहे तो चालत नाही. हे लक्षात ठेवा काय आलेला तो काय आलेला धांगडधिगांना रेणेका मार्क चालतो. मायकल जॅक्सन पण चालतो हे लक्षात ठेवा आणि अशा लोकांची तुम्ही वाहवा करता. पण जे गोरगरीब आहेत, कमावून खातात. १/१/९५ चे आहेत. माझ्या विभागातील सर्व कनेक्शन पास झालेली आहेत. लागली सुद्धा आहेत. सार्वजनिक स्टँडपोस्ट उद्यापासून कट करायला सुरूवात करा. आज सभागृहामध्ये मी सांगत आहे. आमच्या रिक्वायरमेंन्ट पूर्ण झाल्या आणि आमची चिंता करू नका. पण हा जो विषय आहे आणि ह्या विषयामध्ये जी भाषा मांडली आहे. त्याकरीता जर पाण्याची कमतरता भासणार असेल तर सगळया ठिकाणी जेवढे गावठणमध्ये जी अतिक्रमणे झालेली आहेत. त्याचा हिशोब कोण देणार? त्याचा हिशोब त्यामध्ये का दिला गेला नाही? आता पर्यंत याच्यावर प्रश्नदेखील महासभेमध्ये होता. चाळींना दिलेली कनेक्शन जाणूनबुजून डिलीट केली गेली आहेत. हजारोंच्या संख्येने कनेक्शन आहेत. कुठे एक-अर्धा इंचाचे दिले गेले आहेत. आता एक नवीन कनेक्शनचा प्रकार आणणार आहेत आणि त्याचे प्रयत्न आता चालू आहेत. चालू असलेल्या कन्स्ट्रक्शनला, तिकडच्या मजुरांना पिण्याचे पाणी मिळण्याकरीता एखाद्या कनेक्शनची तरतूद म्हणजे तुमचे सर्व नियम गेले. परत बोलू का? अतिक्रमण म्हणजे आता चालू कस्ट्रक्शन आणलेला प्रस्ताव आहे. चालू कंन्स्ट्रक्शनला तुम्ही देणार म्हणजे तुम्ही एकीकडे सी.सी. आणि आर.डी. च्या गोष्टी करता प्रश्न एवढाच आहे, सकाळी ठरल्यानुसार या ठरावामध्ये आपल्याला जे वैयक्तीक स्वरूपात नळ कनेक्शन द्यायचे आहे. त्याचे धोरण आपल्याला ठरवायचे आहे. त्याच्यामध्ये गावठण. सरकारी जमिनीवर जी अतिक्रमण झालेली आहेत चाळी बंगले वगैरे याचा उल्लेख आपण कुठे करणार आहात? कारण माझ्या माहितीनुसार हजार कनेक्शनच्यावर कनेक्शन निरनिराळया ठिकाणी दिले गेले. आणि

सगळे अतिक्रमणचे आहेत. काही अधिकृत वगैरे नाहीत. फक्त एवढेच आहे की, झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या माणसांनी फाटक्या तुटक्या घरामध्ये रहायचे आणि चाळीत राहणाऱ्यांनी खाली पारटेक्स लावयाचे, वर पत्रे ठेवायचे हे अगदी विरोधाभास आहे. माझे म्हणणे असे आहे की, सकाळी ठरल्यानुसार हा ठराव व्यवस्थित धोरणात्मक निर्णय काय काय तुम्ही घेणार आहात? गाडी, बंगले, पक्के रूम, कच्चे रूम त्याच्यानंतर १/१/९५ च्या अगोदरच्या ज्या झोपडया आहेत ह्या सगळ्यांचा विचार करून हा ठराव आणा आणि परत त्याचा विचार करावा. सन्मा सदस्य धनराज अग्रवाल यांनी सांगितले या ठरावात क्लिअर दिलेले आहे. ज्या विभागात पाईप लाईन नाही अशा ठिकाणी देऊ नयेत. आम्ही जिकडे पाईपलाईन आहे. त्या ठिकाणचे सांगत आहोत. पुन्हा एकदा सांगतो माझ्या इकडे संपूर्णपणे ग्रुप कनेक्शन लोकांनी नाईलाजास्तव लावून घेतलेली आहेत. परंतू वैयक्तीक नळ कनेक्शनचे रेट सुद्धा काही लोकांना परवडत नाहीत. जर दिले तर आम्ही घ्यायला तयार आहोत. आणि जर तुम्हाला द्यायचे असतील तर जो न्याय तुम्ही चाळींना लावलात, अतिक्रमणाला लावला तोच न्याय सगळीकडे लावा अशी माझी विनंती आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा महापौर साहेब स्थायी समितीने दिनांक २८/५/०३ रोजी ठराव क्र. ९२ अन्वये राखीव प्रभागात ग्रुप नळ जोडणी बरोबर स्वतंत्र नळ जोडणी बाबतचा जो ठराव पारीत केलेला होता. तर मला वाटते सन्मा सदस्य धनराज अग्रवाल यांनी तेव्हा मनाचा मोठेपणा तेव्हापण दाखविलेला की, आमच्या या प्रकरणाला संपूर्ण विरोध राहिल आणि सन्मा सदस्य मिलन म्हात्रे तेव्हाच स्थायी समितीमध्ये भूमिका क्लिअर करायला पाहिजे होती की, पाणी देताना आपण या प्रभागात वेगळा न्याय, त्या प्रभागात वेगळा न्याय असे करायला पाहिजे. जर मी स्थायी समितीचा सदस्य असतो तर अशा चुकीच्या ठरावाला मी ठाम विरोध केला असता. कारण पाणी सर्वांना द्यायला पाहिजे. गरिबांना वेगळा न्याय द्यायचा, श्रीमंतांना वेगळा न्याय द्यायचा. आपण विरोध करायला पाहिजे होता.

**मिलन म्हात्रे :-**

त्यावेळी क्लिअर करून दाखले सांगितले होते की दाखला देईल त्याला कनेक्शन द्या रिझर्वेशनला आमचा विरोध आहे. आरक्षण भाग इलेक्शन.

**जोत्सना हसनाळे :-**

मा. महापौर मॅडम आरक्षणाचा भाग निवडणुकीपुरता नाही मॅडम. कारण आरक्षणात त्यावेळी होते.

**आसिफ शेख :-**

पाण्या बद्दल कोणालाही आरक्षण नाही. पाणी देण्याचे काम हे अत्यंत पवित्र काम आहे. पुण्याचे काम आहे. आपल्याकडे कोण पाहुणा जरी आला तरी आपण पाणी विचारतो. कोण मरायला टेकला असेल तरी आपण पाणी पाजतो. पुण्याई मिळते असे हे पवित्र काम आहे आणि असा भेदभाव करून आपल्याला चालेल का? आमच्या प्रभागात पण झोपडपट्ट्या आहेत. सन्मा. सदस्य. श्री. मिलन म्हात्रे यांच्या प्रभागात पण झोपडपट्ट्या आहेत व इतर सन्मा. सदस्यांच्या प्रभागातसुद्धा झोपडपट्या आहेत. मग त्या झोपडपट्ट्यांना तुम्ही पाणी देणार की नाही? आणि असा जो अर्धवट ठराव आहे. तो चुकीचा होता आणि आता जो महासभेला ठराव आलेला आहे. तर माझे असे स्पष्ट मत आहे की मी या ठिकाणी ठराव मांडतो की सन १९९५ पूर्वीच्या ज्या झोपडपट्ट्यां आहेत. त्या सर्व झोपडपट्ट्यांना स्वतंत्र नळ जोडणी देण्यांत यावी असा मी ठराव मांडत आहे.

**जोत्सना हसनाळे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अनंत पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, माझापण त्याला पाठिंबा आहे. आता या झोपडपट्टीच्या पाणीपुरवठ्या विषयी जो काही प्रश्न उपस्थित झालेला आहे या पाणीपुरवठया संदर्भात झोपडपट्टी मध्ये जे राहणारे लोक आहेत. ते आपलेच भाऊबंद आहेत. आणि अशांना पाणी कनेक्शन देणे हे महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य आहे. आतापर्यंत आपण ज्याला मागेल त्याला पाणी. राहिल त्याला घर असे जे आपले धोरणात्मक धोरण आहे. आणि त्या धोरणाप्रमाणेच प्रत्येकाला वैयक्तीक कनेक्शन द्यायला हरकत नसावी. तसेच आतापर्यंत जे आता परप्रांतीय जे लोक येत आहेत. त्या परप्रांतीयाबद्दल आम्हाला निश्चितच आदर आहे. परंतु आलेल्या लोंढ्यांना थांबविणे हे एक आमचे धोरण आहे. परंतु मायकल जॅक्सन नावाच्या एका कलाकाराने तुम्हाला कला बघायची हौस असेल तर भोंदुगिरीसारखे करुन चालणार नाही. तुमचे भोंदुत्व नको आम्हाला हिन्दुत्व आवश्यक आहे. म्हणुन मी त्या संदर्भात बोलतो

आहे की या संदर्भामध्ये पाण्याचा प्रश्नच निर्माण करा. लोकांना पाणी मिळेल असेच धोरण आखा. एवढेच मी सांगू इच्छितो.

**शुभांगी नाईक :-**

महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते ज्याप्रमाणे तुम्ही झोपडपट्टी रहिवाशांना जसे नळ कनेक्शन देता त्याचप्रमाणे माझ्या प्रभागामध्ये काही कारखाने आहेत. त्या कारखानदारांनासुद्धा पाण्याची आवश्यकता आहे. हे पण लक्षात ठेवुन त्यांना कनेक्शन दयायचे.

**जयंत पाटील :-**

आता जो सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी जो ठराव मांडला माझा त्या ठरावाला आणि आमच्या काँग्रेस पक्षाचा त्या ठरावाला संपूर्ण विरोध आहे.

**मा. महापौर :-**

तो ठराव मला स्थायी समितीमध्ये पाठवायचा होता. तुम्ही चर्चा करा.

**जयंत पाटील :-**

तुम्ही स्थायी समितीमध्ये जावूच शकत नाही. हा धोरणात्मक येणार आहे धोरणात्मक निर्णय या सभागृहाला घ्यायचा आहे. या सभागृहामध्ये तो निर्णय ठरेल. याचा परिणाम या शहरावर कायमचा होणार आहे.

**मा. महापौर :-**

मला स्थायी समितीमध्येच पाठवायचा होता.

**जयंत पाटील :-**

तुम्ही पाठवा स्थायी मध्ये पण मला जरा बोलु द्या. मी त्या दिवशी बोललो होतो की प्रचंड प्रमाणात टॅक्स देणाऱ्या ज्या इमारती आहेत त्यांना काय आपण स्वतंत्र नळ कनेक्शन दिलेले आहे का? पंधरा ते वीस जणांना मिळुन एक नळ कनेक्शन दिलेले आहे रेशो तोच आहे. इमारतीमध्ये राहणाऱ्या लाखो रुपये टॅक्स देणाऱ्या लोकांना पंधरा-वीस रेशो पकडुन आपण एक कनेक्शन देतो. त्या अधिकाऱ्यांना विचारा. आणि नवीन झालेली झोपडपट्टी तर दहा-वीस रुपये तुम्हाला वर्षाला टॅक्स मिळत नाही. त्यांना आपण अर्धा कनेक्शन देता. तसा जर निर्णय घ्यायचा असेल तर प्रत्येक इमारतीतील प्रत्येक फ्लॅटला तुम्हाला अर्धे-अर्धे इंचाचे कनेक्शन दयावे लागेल. आणि हा निर्णय तुम्हाला मान्य करावा लागेल. कारण फ्लॅटमध्ये राहणाऱ्या लोकांच्या पैशावर ही नगरपालिका चालते. हे तुम्हाला मान्य करावे लागेल. आणि जर वीस फ्लॅटची बिल्डिंग असेल तर त्याला एक नळ कनेक्शन आपण देतो. आणि ह्यांचा जर तुम्ही रेशो पकडला तर त्यांना तुम्हाला दहा कनेक्शन दयावे लागतील. आपली यावर मंजुरी आहे का? आपण यावर आम्हाला निर्णय दया. आणि किती अर्ध्याची कनेक्शन लागणार आहेत. याचे काहीही स्टँडर्ड नाही. काही प्रमाण नाही. एवढी हजारो कनेक्शन या शहरामध्ये लागली. पाणी सर्वांना दया. कोण नाही म्हणत नाही. ग्रुप कनेक्शन दया ना. पाणी दयायला आमचा विरोध नाही. त्यांना पंधरा कनेक्शन ग्रुप कनेक्शन दयायचे आपण मान्य केलेले आहे. त्याप्रमाणे तुम्ही त्यांना पाणी जरुर दया. ती आपलीच लोक आहेत. ग्रुप कनेक्शन तुम्ही बिल्डिंगलाही देत आहात. टॉवर्समध्ये राहणाऱ्या लोकांना सुद्धा आपण ग्रुप कनेक्शन देत आहात आणि झोपडपट्टीबद्दल एवढे प्रेम कुणाला कसे काय निर्माण झाले आहे. माझ्या प्रभागातसुद्धा झोपडपट्टी आहे. पाणी देऊ नका असे मी म्हणत नाही परंतु चुकीचा निर्णय जर या सभागृहात झाला तर त्याचा परिणाम कायमचा या शहरावर राहील याचा आज आपण अंदाज घ्या. आणि त्याप्रमाणे निर्णय घ्या.

**महापौर :-**

मी हे कंटीन्यु केलेले होते. चर्चाकरा व त्यानंतर स्थायी समितीमध्ये घेऊ म्हणुन आणि सर्व गटनेत्यांची बैठक सुद्धा झाली.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम एक गोष्ट मी सभागृहाच्या निर्दशनास आणू इच्छितो की एकदा गटनेत्यांची बैठक झाली. गटनेत्यांची बैठक झाल्यानंतर त्याच्यावर चर्चा करुन निर्णय घ्यायचे ठरल्यानंतर सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख यांनी ठराव मांडणे बरोबर नाही.

**आसिफ शेख :-**

२८/५/०३ रोजी ठराव क्र. ९२ अन्वये जे राखीव प्रभागात आपण स्वतंत्र नळ कनेक्शन दिले आहे. माझे असे मत आहे की, एका प्रभागात वेगळा न्याय दुसऱ्या प्रभागात वेगळा न्याय असे असु नये. नळ कनेक्शन दयायची तर सर्वांना द्या.

**मा. महापौर :-**

सकाळी आमची चर्चा झाली होती. स्थायी समितीमध्ये आम्ही घेऊ.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

महापौर मॅडम, केवळ न्यायासाठी हा विषय महासभेपुढे येतो आहे तर न्याय दयायचा सोडुन तुम्ही विरोध का करता? मग सगळ्यांना कनेक्शन दयायचे असेल तर दया. आपण झोपडपट्टी म्हणतो. ती दलित वस्ती म्हणुन तिचा सुधार करण्यासाठी आपण अनेक योजना आपण आखतो. रस्ता, लाईट, पाणी, शौचालय या व्यवस्था आपण महापालिकेतर्फे करायच्या आहेत. बिल्डिंगमध्ये ते राहू शकत नाही. म्हणून ते झोपडपट्टीमध्ये राहतात. आणि तुम्ही म्हणता ते स्थायी समितीपूढे सादर करा.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सकाळी महापौरांच्या समोर गटनेत्यांची सभा झाली. तिथे चर्चा झाली.

**आसिफ शेख :-**

मी या ठिकाणी झोपडपट्टीला स्वतंत्र नळ कनेक्शन देण्यासंदर्भात ठराव मांडलेला आहे. तर त्यामध्ये फक्त झोपडपट्टी नाहीतर मी माझ्या बोलण्याचा उद्देश की पाणी सर्वांना दया. बिल्डिंगमध्ये राहतात त्या सर्वांना पण दया. पाणी देण्यामध्ये भेदभाव करु नका. विषय जरी झोपडपट्टीचा आला असला तरी इमारतींना पण पाणी दया.

**चंद्रकांत वैती :-**

महापौर मॅडम आपल्याकडे ५० एम.एल.डी. पाणी योजनेनंतर ३१ एम.एल.डी. पाणी आणि हे धरुन ८१ एम.एल.डी. पाणी हे ८१ एम.एल.डी. पाणी डिसेंबर २००२ मध्ये आपल्याला पूर्णपणे मिळायला पाहिजे होते. या शहराला ८१ एम.एल.डी. पाणी आपल्या महापालिकेला डिसेंबर २००२ मध्ये पूर्णपणे मिळुन आज वितरीत करायला पाहिजे होते. परंतु आता आपल्याकडे फक्त ७३-७४ एम.एल.डी. पाणी येते. आज आपल्याला जी निवास संकुले आहेत. त्यांना पाणी पुरवठा दयायचा आहे. शांतीनगरला ५ एम.एल.डी. अतिरिक्त पाणी पुरवठा द्यायचा आहे आणि हे सगळे होत असताना आज शहरामध्ये जे वातावरण आहे. सगळीकडे पुरेसा पाणीपुरवठा नाही. महापौर मॅडम, सकाळी आपल्या गटनेत्यांच्या सभेमध्ये सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी सांगितले पुर्व पट्टीमध्ये पाण्याचा अतिशय दुर्भिक्ष्य निर्माण झाल्यासारखी परिस्थिती आहे. चाळीस तासानंतर पाणी मिळते, ही परिस्थिती आहे. झोपड्यांना कनेक्शन दयायचे असतील तर स्थायी समितीच्या सदस्यांना मी सांगु इच्छितो की स्थायी समितीसमोर हा विषय आला होता. त्यावेळी दलित वस्ती, आदिवासी वर्ग जिथे राहतो. यासाठी आपण असे निकष लावा कि ते आदिवासी आहेत ते या क्षेत्रामध्ये किती सालापासुन रहात आहेत. त्यांची कॅपॅसिटी आहे का? नाहीतर सरसकट आपण सर्व झोपड्यांना कनेक्शन दयायचा ठराव केला तर या शहरामध्ये भविष्यात नागरिक राहण्यासाठी घाबरतील कारण पाण्याची अडचण अशीच राहणार आहे. आज आपल्याकडे पुरेसे पाणी आल्यानंतर देखील आज ७४ एम.एल.डी. पाणी आपल्याकडे आहे. तरीपण या ठरावामध्ये कोणी सांगत नाही की, आज पाण्याचा प्रश्न मिटलेला आहे. म्हणून आपण हा विषय पुन्हा फेरविचारात आणावा. असा मोगम ठराव पास करु नये.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आपके परवानगीसे बोलती हुँ की मिरा भाईंदर क्षेत्र के अंदर ९३ से कनेक्शन बंद किये गये थे। फिलहालही चालु किये गये है। जब चालीस फ्लॅट मिल के दो इंच के दो कनेक्शन से पानी पि सकते है। तो पाच झोपडेवाले एक इंच के कनेक्शनसे पानी क्यु नही पा सकते। ये हमारे पास जो ठराव लाया है। वो किस हिसाब से लाया गया है? ये टोटल गलत लाया गया है। इस के लिए मैं उसका विरोध करती हुँ। और इस तरह झोपडे को क्या फ्लॅट को भी वैयक्तीक कनेक्शन नही दिया जाए। ऐसा मैं ठराव मांडती हुँ।

**शानु गोहिल :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम आज ज्या पद्धतीने सभागृहामध्ये एकदा गटनेत्याच्या मिटींगमध्ये ठरल्यानंतर आणि त्याचे विषयांतर करुन या सभागृहामध्ये गोंधळ घालतात हे बरोबर नाही. जेव्हा सभागृह नेता, गटनेता आपल्या मिटींगमध्ये ठरले. त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख या पद्धतीने ठराव मांडुन दिशाभुल करतात. हे सभागृहाची, आपली, गटनेत्याची मानहानी केली असे माझे मत आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब मानहानी करण्यांचा प्रश्नच नाही. मी सांगितले की झोपडपट्टींना कनेक्शन दया. फ्लॅटधारकांना पण कनेक्शन दया सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी जो मुद्दा मांडला तो बरोबर आहे. आम्ही चुकीचे कुठे बोलत आहोत. त्यांना पाणी दयायचे नसेल तर विरोध करण्यांचे त्याचे प्रत्येक गोष्टीत विरोध चालला आहे. सकाळपासुन संध्याकाळपर्यंत प्रत्येक गोष्टीस विरोध केला. गटनेत्यांची तुमची मिटींग झाली असेल तर प्रत्येक विषयामध्ये खेळीमेळीचे वातावरणात सभा पार पाडली पाहिजे होती. एवढी चर्चा कशाला झाली मा. सभागृहाची दिशाभुल आम्ही या ठिकाणी करत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जे आमच्या गटनेत्यांनी सांगितले ते मी सांगितलेले आहे. आणि ठराव एक झालेला आहे.

**आसिफ शेख :-**

गटनेत्यांची मिटींग कशाला घेतो आपण सन्मा. महापौर साहेब सभागृहातले कामकाज संसदीय पद्धतीने झाले पाहिजे. व्यवस्थितपणे झाले पाहिजे. आणि त्यासाठी आपण प्रत्येक वेळी सभागृह नेते, महापौरांच्या अध्यक्षतेखाली सर्व गटनेत्यांची मिटींग घेतो तर का घेतो? कारण प्रत्येक विषय जो विषय पटलावर आणतो त्यावर सर्व संमतीने निर्णय घ्यायचा असतो. पण तसे काही होत नाही आपण फक्त जिथे गटनेत्यामध्ये वेगळी भुमिका, आणि सभागृहात वेगळी भूमिका अशी दुटप्पी भूमिका तुम्हीच घेत आहात. आम्ही घेत नाही. आम्ही या ठिकाणी सांगितले की सर्वांना कनेक्शन द्या. प्लॅटमध्ये रहातात त्यांनाही द्या व झोपडपट्टीत रहातात त्यांनाही द्या. आणि सर्व काही विचार करुन मा. महापौरांनी योग्य तो निर्णय घ्यावा.

**मा. महापौर :-**

हा विषय आपण मा. स्थायी समितीत घेऊ या आणि आता सभा संपली.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख यांचे जे बोलणे आहे त्यात सर्व गटनेत्यांचा अपमान आहे.

**प्रकरण क्र. ३९ :-**

मा. स्थायी समितीने शिफारस केलेले प्रकरण - झोपडपट्टी विभागात स्वतंत्र नळ जोडणी मंजूर करणेबाबत.

**ठराव क्र. २६ ब :-**

मा. महापौरांच्या आदेशनुसार सदरचा विषय स्थायी समिती सभेत घेण्यांत येईल.

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रतन पाटील :-**

एक शोक प्रस्ताव आहे. शिवसेनेच्या नगरसेविका शुंभागी सिताराम नाईक यांच्या मातोश्री श्रीम. शुभदा तुकाराम गावडे यांचे अल्पशा आजाराने दि. २९/८/२००३ रोजी निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. तसेच लक्ष्मण काशिनाथ पाटील व परशुराम शिवराम पाटील यांच्या सुद्धा निधनाचा शोक प्रस्ताव मी येथे मांडतो आहे.

**आसिफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महेंद्र चमडिया आमच्या अग्रवाल समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते अध्यक्ष आणि या भाईंदरला नेहमी समाजसेवक म्हणून पुढे असणारे चमडिया यांचेही नांव या प्रस्तावात घेण्यात यावे.

**दुखवटा ठराव क्र. २७ क :- शोक प्रस्ताव**

सन्मा. नगरसेविका सौ. शुभांगी सिताराम नाईक यांच्या मातोश्री शुभदा तुकाराम गावडे यांचे दिनांक २९/८/२००३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. तसेच लक्ष्मण काशिनाथ पाटील व परशुराम शिवराम पाटील यांचेही निधन झाले आहे. त्याचप्रमाणे अग्रवाल समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते महेंद्र चमडिया यांचे निधन झाल्याने या सर्व मृतात्म्यास चिरशांती लाभो अशी इश्वरचरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा शोक व्यक्त करीत आहे.

**सुचक :- श्री. रतन पाटील.　　　　　अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. प्र. सचिव अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ**
**सायं. ०५.४५ वाजता**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपलिका**